इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - ३३५ ▸ गुरूवार, ता. ९ एप्रिल २०२६ ▸ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं. 63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

www.emahasatta.com   e-mail : mahasatta@gmail.com   mahasattaadvt@gmail.com   किंमत ₹ ५.००



# अमेरिका-इराणमध्ये चौदा दिवस युद्धविराम

■ वॉशिंग्टन,ता.८–

**इराणवर होऊ शकणारे संभाव्य बॉम्ब हल्ले सध्या दोन आठवड्यांसाठी स्थगित करण्यात आले आहेत. अशी मोठी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, हा 'दोन्ही बाजूंनी लागू होणारा युद्धविराम असेल. म्हणजेच या कालावधीत ना अमेरिका हल्ला करेल, ना इराण कोणतीही आक्रमक कारवाई करेल. मात्र या करारासाठी एक महत्त्वाची अट ठेवण्यात आली आहे इराणने तात्काळ, पूर्णपणे आणि सुरक्षित पद्धतीने होर्मुज सामुद्रधुनी जहाज वाहतुकीसाठी खुली करावी लागेल.**

ट्रम्प यांच्या मते, अमेरिकेने आधीच आपली अनेक लष्करी उद्दिष्टे साध्य केली असून आता इराणसोबत दीर्घकालीन शांतता करारासाठी वेगाने चर्चा सुरू आहे. त्यांनी सांगितले की इराणकडून १० मुद्यांचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याला चर्चेचा आधार मानले जात आहे. ट्रम्प यांनी दावा केला की अमेरिका आणि इराण यांच्यातील जुन्या वादांपैकी बहुतांश मुद्यांवर सहमती झाली आहे. पुढील दोन आठवड्यांत अंतिम करार करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सर्व काही नियोजनानुसार झाले, तर पश्चिम आशियातील दीर्घकाळ चालत आलेला तणाव कमी करण्याच्या दिशेने हा मोठा टप्पा ठरेल, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करत स्पष्ट इशारा दिला होता की, इराणने लवकरात लवकर होर्मुज सामुद्रधुनी खुली केली नाही आणि करार मान्य केला नाही, तर त्याला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले होते, 'मंगळवार रात्री ८ वाजता (ईस्टर्न टाइम)!' यापूर्वी त्यांनी इशारा दिला होता की मार्ग खुला न केल्यास अमेरिका इराणची ऊर्जा व्यवस्था आणि पायाभूत सुविधा पूर्णपणे उद्ध्वस्त करू शकते. त्यांनी असेही म्हटले होते की, 'होर्मुज सामुद्रधुनी खुली झाली नाही, तर इराणमधील वीज प्रकल्प आणि पूल हे लक्ष्यावर असतील.'

ट्रम्प यांनी यापूर्वी इराणला ४८ तासांचा अल्टिमेटम दिला होता, मात्र नंतर ही मुदत अनेकदा वाढवण्यात आली आणि शेवटी ती ८ एप्रिलच्या रात्रीपर्यंत वाढवण्यात आली. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की कराराची शक्यता अजूनही कायम आहे; पण चर्चा अपयशी ठरल्यास ते 'सर्व काही संपवतील' असा इशाराही त्यांनी दिला होता. तसेच, इराणमधील सामान्य नागरिक त्यांच्या सरकारवर नाराज असून अमेरिकेच्या कारवाईला पाठिंबा देऊ शकतात, असा दावा देखील ट्रम्प यांनी केला होता.



### युद्धविरामानंतर काही तासांतच इराणच्या तेल रिफायनरीवर हल्ला

**युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच इराणच्या लावन बेटावरील तेल रिफायनरीवर हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणी सरकारी दूरदर्शनच्या हवाल्याने ही बातमी दिली आहे. अहवालानुसार, अग्निशमन दल आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहे. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. मात्र हा हल्ला नेमका कुणाकडून करण्यात आला, याबाबत अद्याप माहिती देण्यात आलेली नाही.**

# उत्खनन रॉयल्टी, बिनशेती प्रक्रिया डिजिटल होणार

## बांधकाम क्षेत्राला दिलासा; महसूलमंत्री बावनकुळेंनी क्रेडाईचे प्रश्न लावले मार्गी



■ मुंबई,ता.८(प्रतिनिधी)–

**बांधकाम करताना उत्खनन करण्यात आलेले गौण खनिज त्याच जागी वापरले तर त्याला रॉयल्टी माफ करण्यात आली असून, बिनशेतीसाठी आता जिल्हाधिकारी यांच्याकडे जाण्याची आवश्यकता नाही, ही प्रक्रिया दहा दिवसात ऑनलाईन करण्यात येणार आहे. याबरोबरच महापालिका आणि मिळकतपत्रावरील नोंदीबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्याचे आश्वासही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.**

राज्यभरातील बांधकाम व्यावसायिकांना भेडसावणारे प्रश्न आणि प्रलंबित मागण्यांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात क्रेडाईच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. बांधकाम क्षेत्राला गती देण्यासाठी आणि प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

बांधकाम करताना होणाऱ्या खोदकामासाठी आकारल्या जाणाऱ्या रॉयल्टीबाबत क्रेडाईने मांडलेले प्रश्न महसूलमंत्र्यांनी मार्गी लावले आहेत. सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे, उत्खनननंतर निघालेले गौणखनिज जर त्याच बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी वापरले जात असेल, तर त्यावर कोणतीही रॉयल्टी आकारली जाणार नाही.

यामुळे प्रकल्पाचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच, रॉयल्टी भरण्याची प्रक्रिया आता अधिक सुटसुटीत करून ती सहा महिन्यांच्या कालावधीसाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बिगरशेती (एनए) परवान्यासाठी लागणारा वेळ व क्लिष्ट प्रक्रिया कमी करण्यासाठी महसूल विभागाने कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. एनएची संपूर्ण पद्धत येत्या दहा दिवसांत पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. यामुळे गृहप्रकल्पांच्या कामात येणारे प्रशासकीय अडथळे दूर होतील.

**पुणे पॅटर्नचा राज्यभर विचार; डिजिटल ट्रेकिंगवर भर**

पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी राबवलेली डिजिटल ट्रेकिंग प्रणाली यशस्वी ठरली आहे. हीच पारदर्शक प्रणाली आता राज्यभर राबवण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. याशिवाय, कोणत्याही कागदपत्राचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) झाल्यास त्याची नोंद तातडीने मिळकत पत्रिकेवर (प्रॉपर्टी कार्ड) झालीच पाहिजे, ही क्रेडाईची मागणीही मंत्र्यांनी तत्वतः मान्य केली आहे.

या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली गतिमान झाल्या आहेत. याचाच भाग म्हणून मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे आणि जमाबंदी आयुक्त रविंद्र बिनवडे यांच्यासोबत स्वतंत्र बैठकांचे आयोजन करण्यात आले असून, तांत्रिक बाबी लवकरात लवकर सोडवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील रिअल इस्टेट क्षेत्राला मोठी चालना मिळेल, असा विश्वास क्रेडाईकडून व्यक्त करण्यात आला.

# युद्धविरामाच्या घोषणेनंतर सोने-चांदीच्या दरात वाढ

■ मुंबई,ता.८ –

**मागच्या काही दिवसापासून सोने आणि चांदी दरात मोठी चढ–उतार सुरु आहे. आखाती देशांमधील युद्धामुळे दोन्ही धातूंच्या दरात घसरण दिसून आली. मात्र आता इराण आणि अमेरिका यांच्यात दोन आठवड्यांच्या शस्त्रसंधीची घोषणा झाल्यानंतर जागतिक बाजारात मोठी हालचाल दिसून आली आहे. या घडामोडींचा थेट परिणाम भारतातील सराफा बाजारावर झाला असून आज बाजार उघडताच सोनं आणि चांदीच्या दरात मोठी वाढ नोंदवली गेली आहे.**



या घडामोडींचा थेट परिणाम जळगावच्या सराफा बाजारावर दिसून आला असून सोनं आणि चांदीच्या दरात पुन्हा मोठी उसळी पाहायला मिळाली आहे. बुधवारी सकाळी बाजार उघडताच सोन्याच्या दरात सुमारे ३ हजार रुपयांची वाढ नोंदवली गेली, तर चांदीच्या दरातही १० हजार रुपयांची वाढ झाली आहे.सध्या जळगाव बाजारात जीएसटीसह सोन्याचा दर सुमारे १ लाख ५६ हजार ४५ रुपयांवर पोहोचला आहे, तर चांदीचा दर २ लाख ५४ हजार ४१० रुपयांपर्यंत गेला आहे.

# रेपो दर कायम; ग्राहकांना दिलासा पण महागाईची चिंता मात्र कायम

■ मुंबई,ता.८ –

**भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) ने एप्रिल २०२६ च्या चलनविषयक धोरण बैठकीत रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला असून 'न्यूट्रल' भूमिका जाहीर केली आहे. जागतिक पातळीवरील अनिश्चितता, विशेषतः पश्चिम आशियातील संघर्ष आणि वाढत्या ऊर्जा किमतींचा विचार करून आरबीआयने हा निर्णय घेतला आहे. महागाई सध्या नियंत्रणात असली तरी ऊर्जा दरवाढ आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे पुढील काळात जोखीम वाढण्याची शक्यता असल्याचे आरबीआयने स्पष्ट केले आहे. त्यामुळे व्याजदरात तातडीने बदल करण्याऐवजी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**





या निर्णयामुळे ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.इनक्रेड मनीच्या विश्लेषणानुसार, मागील दरकपातीचा परिणाम अद्याप कर्जदरांमध्ये दिसून येत असून सध्या कर्जदारांवर अतिरिक्त व्याजाचा भार पडणार नाही. सध्याची परिस्थिती ही मागणीपेक्षा पुरवठ्याशी संबंधित असल्यामुळे व्याजदर कमी करून त्यावर तातडीने परिणाम होणार नाही, असेही त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे गृहकर्ज, शिक्षण कर्ज आणि ग्राहक कर्ज घेणाऱ्यांसाठी स्थिरता कायम राहणार आहे.

दरम्यान, महागाईबाबतची चिंता अद्याप कायम आहे. इनक्रेड मनीच्या मते, शहरी ग्राहकांच्या महागाईच्या अपेक्षा सुमारे ८.५ टक्क्यांपर्यंत वाढल्या आहेत, तर सध्याचा महागाई दर जवळपास ३.२ टक्के आहे. यावरून भविष्यातील किंमतवाढीबाबतची चिंता स्पष्ट होते. ग्रामीण भागातही अन्न आणि इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे महागाईचा परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

# वाद सोडवायला गेलेल्या व्यक्तीवर लोखंडी गजाने हल्ला

■ कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**नवीन वाशी नाका येथील महालक्ष्मीनगर परिसरात शेजाऱ्यांमधील वाद मिटविण्यासाठी गेलेल्या व्यक्तीवरच लोखंडी गजाने हल्ला झाल्याची घटना घडली. या प्रकरणी करवीर पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

धनाजी शंकर पाटील (वय ४९, रा. नवीन वाशी नाका) असे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी रात्री साडेनऊच्या सुमारास ही घटना घडली. पाटील हे जेवणानंतर कुत्र्याला फिरविण्यासाठी बाहेर पडले असता, कॉलनीमध्ये संतोष चौगुले आणि विलास किल्लेदार यांच्यात वाद सुरू होता. हा वाद थांबविण्याच्या उद्देशाने पाटील पुढे गेले असता, संतोष बाबूराव चौगुले (रा.नवीन वाशी नाका) याने लोखंडी गजाने त्यांच्यावर हल्ला केला. या घटनेत पाटील जखमी झाले असून, त्यांना जिवे मारण्याची धमकीही देण्यात आली.

# भारताने साधला इराणशी संपर्क

■ नवी दिल्ली,ता.८–

**पश्चिम आशियामध्ये इराण आणि अमेरिका यांच्यात जाहीर झालेल्या युद्धविरामानंतर लगेचच बुधवारी भारताने इराणशी संपर्क साधला आहे, जेणेकरून होर्मुज सामुद्रधुनीच्या पश्चिम भागात अडकून पडलेल्या भारताच्या तेल व गॅस वाहतूक जहाजांना तातडीने स्वदेशात परत आणता येईल.**

सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार, युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारताच्या ऊर्जा सुरक्षेबाबत निर्माण झालेली चिंता आता काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. सध्या भारताची एकूण १६ जहाजे होर्मुजच्या पश्चिम भागात अडकलेली आहेत. यापैकी बहुतांश जहाजे तेल आणि गॅस वाहतुकीशी संबंधित आहेत. या जहाजांमध्ये सुमारे दोन लाख टनांहून अधिक एलपीजी साठा आहे, ज्याची भारताला तातडीची गरज आहे. ही जहाजे सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी भारत सरकार इराणशी सातत्याने संपर्कात आहे.

**अडकलेली १६ जहाजे आणण्याची तयारी सुरू**

भारत आपल्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के तेल आयात करतो, ज्यापैकी जवळपास ६० टक्के पुरवठा पश्चिम आशियातून येतो. त्यामुळे होर्मुज जलडमरूमध्यातील कोणतीही अस्थिरता भारताच्या ऊर्जा पुरवठ्यासह अर्थव्यवस्थेसाठी गंभीर धोका ठरू शकते. पश्चिम आशियातील संघर्ष सुरू झाल्यापासून सरकारच्या प्रयत्नां नंतरही उद्योग क्षेत्राला गॅस पुरवठ्यावर परिणाम जाणवला असून एलपीजी पुरवठाही प्रभावित झाला आहे.

# मंदिर परिसरातील ओटी विक्रेत्यांमध्ये हाणामारी

■ कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**करवीर निवासिनी अंबाबाई मंदिराच्या पूर्व दरवाजाजवळ ओटी विक्रीवरून दोन विक्रेत्यांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर थेट हाणामारीत झाले. महिला आणि पुरुषांनी एकमेकांना शिवीगाळ करत नारळ फेकून मारहाण केल्याने मंदिर परिसरात काहीकाळ गोंधळ उडाला. या घटनेत एका महिलेसह दोघे जखमी झाले. हा प्रकार मंगळवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडला.**

याप्रकरणी पद्मा शरद नरवडे (वय ५०, रा. टेंबलाईवाडी) यांच्या फिर्यादीनुसार रामा कात्रट (रा.लक्षतीर्थ वसाहत), दीपा गायकवाड (रा. बुधवार पेठ) आणि आदिनाथ जाधव (रा.साने गुरुजी वसाहत) यांनी पद्मा नरवडे आणि आदित्य महेश जाधव (रा.फुलेवाडी) यांच्यावर जुना राजवाडा पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

नरवडे यांचे अंबाबाई मंदिराच्या पूर्व दरवाजाजवळ ओटी विक्रीचे दुकान आहे. शेजारी रामा कात्रट याचेही दुकान आहे. ओटी विक्रीवरून दुपारी नरवडे यांचा मुलगा प्रसाद आणि कात्रट यांच्यात वाद झाला होता. त्याच वादाचा जाब विचारण्यासाठी सायंकाळी नरवडे गेल्या असता वाद पुन्हा चिघळला. यावेळी रामा कात्रट, दीपा गायकवाड, आणि आदिनाथ जाधव) यांनी पद्मा नरवडे आणि आदित्य महेश जाधव (रा. फुलेवाडी) यांना मारहाण केली. ओटीतील नारळ एकमेकांवर फेकण्यात आल्याने नरवडे आणि आदित्य जाधव जखमी झाले.

# एमपीएससी २०२४ चा अंतिम निकाल जाहीर

■ मुंबई,ता.८ –

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे २७ ते २९ मे २०२५ दरम्यान घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा–२०२४ चा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला असून तो आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या परीक्षेत विविध २० संवर्गांतील एकूण ४६१ पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे.**

या परीक्षेत सोलापूर जिल्ह्यातील विजय नागनाथ लामकाने यांनी सर्वसाधारण तसेच मागासवर्ग गटातून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील आरती परमेश्वर जाधव या महिला खुल्या प्रवर्गामधून राज्यात प्रथम आल्या आहेत.

उमेदवारांचा सविस्तर निकाल तसेच प्रत्येक प्रवर्गासाठीचे सीमांकन गुण आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले असल्याचे आयोगाने स्पष्ट आहे.

वैद्यकीय तपासणी पूर्ण न केलेल्या उमेदवारांचा अंतिम निकालात समावेश करण्यात आलेला नाही. तसेच हा निकाल न्यायालयीन प्रकरणांतील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

आरक्षित प्रवर्गांतील उमेदवारांची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडून पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येणार असल्याचेही आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले केले आहे.

# युवतीचा पाठलाग करून अपघात घडवला

## तुंग येथील युवकाविरुद्ध सांगलीत गुन्हा

■ सांगली,ता.८(प्रतिनिधी)–

**महाविद्यालयीन विद्यार्थिनीचा पाठलाग करून तिच्या मोपेडची चावी काढून घेतली. युवतीने विरोध केल्यानंतर तिच्या मोपेडला पाठीमागून लाथ घालून तिला पाडून अपघात केल्याचा प्रकार घडला आहे. यामध्ये पीडित युवतीचा हात फ्रॅक्चर झाला आहे. याप्रकरणी संशयित विशाल शिवाजी पवार (रा.तुंग,ता.मिरज) याच्याविरुद्ध संजयनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित युवती मिरज तालुक्यातील एका गावात राहते. ती सांगलीत शिक्षण घेत असून दुपारी चारच्या सुमारास मोपेडवरून घरी निघाली होती. विश्रामबाग येथील रमाई उद्यानाजवळ विशाल याने तिला अडवून मोपेड बाजूला घेण्यास सांगितले. तिने मोपेड बाजूला घेतली नाही. ती तशीच पुढे निघाल्यानंतर त्याने पाठलाग सुरू केला.

माधवनगर रस्त्यावरील डेक्कन हॉलसमोरून जाताना विशालने पाठीमागून येऊन तिच्या मोपेडची चावी काढून घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पाठीमागून तिच्या मोपेडला लाथ घातली. त्यामुळे युवती मोपेडवरून खाली पडली. तिचा हात फ्रॅक्चर झाला. अपघातानंतर उपचार घेऊन तिने संजयनगर पोलिसात विशाल याच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे. त्यानुसार विशालविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# चांदी पोहोचविण्यासाठी आलेल्या व्यापाऱ्याचा मृत्यू

## हुपरीतील घटना; पोलिसांत नोंद; व्हिसेरा राखून ठेवला

■ हुपरी,ता.८(वार्ताहर) –

**येथील विशालनगर भागात चांदी देण्यासाठी आलेल्या एका २५ वर्षीय युवकाचा अचानक चक्कर येऊन पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शिवम निवास जाधव (वय २५, रा.घोटी बुद्रुक, जि. सांगली) असे या मृत युवकाचे नाव आहे. याप्रकरणी हुपरी पोलीस ठाण्यात अनैसर्गिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.**



हुपरी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आशिष आण्णासो मोरे (वय २६,रा.हुपरी) यांचा चांदीचा व्यवसाय आहे. मयत शिवम हा सेलम येथून चांदीची देवाण–घेवाण करण्याचा व्यवसाय करत होता. बुधवारी, ८ एप्रिल रोजी सकाळी पावणे नऊच्या सुमारास शिवम हा आशिष मोरे यांच्याकडे चांदी पोहोच करण्यासाठी आला होता. मोरे यांच्या घराच्या दारात उभा असतानाच शिवमला अचानक चक्कर आली आणि तो जागीच कोसळला.

या अनपेक्षित प्रकारानंतर आशिष मोरे यांनी तात्काळ शिवमला उपचारासाठी हुपरी येथील एका खासगी हॉस्पिटलमध्ये नेले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. सायंकाळी हुपरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शिवमच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी त्याचा ''व्हिसेरा'' राखून ठेवण्यात आला आहे. या घटनेची वर्दी आशिष मोरे यांनी हुपरी पोलिसांत दिली असून, हुपरी पोलीस ठाण्यात अनैसर्गिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# मस्साजोग: अश्विनी देशमुख अर्ज भरणार

बीड,ता.८–

**जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला वर्षाचा कालावधी उलटला असून या प्रकरणातील आरोपी तुरुंगात आहेत. दुसरीकडे आता, येथील ग्रामपंचायतीत सरपंच पदासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून मस्साजोगचा नवा सरपंच कोण याची उत्सुकता सर्वांनाच आहे. मस्साजोगच्या सरपंच पदासाठी दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.**

# शेंद्रे हद्दीत चार लाखाचे हेरॉईन जप्त

## कोल्हापुरच्या दोघांना अटक

■ सातारा,ता.८(प्रतिनिधी)–

**सातारा तालुका पोलीस ठाणे हद्दीत शेंद्रे येथे कोल्हापूर येथून विक्रीसाठी आणलेले ४ लाख ८० हजार रूपये किंमतीचे हेरॉईन पकडले. याप्रकरणी अक्षय पाटील आणि अलंकार मुळीक (रा.दोघेही कोल्हापूर) यांना अटक करण्यात आली आहे.**

याबाबत माहिती अशी की, सातारा तालुका पोलीस ठाणे कडील पोलिस हवालदार राजु शिखरे यांना शेंद्रे गावच्या हद्दीत ड्रग्ज विक्री करण्यास दोन इसम येणार असल्याची गोपनिय माहिती मिळाली. त्यानुसार पथक तयार करुन सापळा रचून कारवाई केली.

शेंद्रे ते बोगदा जाणारे रोडला टोयाटो इटिओस कार (क्र एमएच ४७ के १६१९) ही थांबवून गाडीतील इसमांकडे चौकशी केली. तेव्हा गाडीतील इसमाने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने तसेच सदर गाडीची तपासणी करणेस आडकाठी केल्याने गाडीची दोन पंचासमक्ष तपासणी केली. यावेळी ४ लाख ८० हजार रुपये किंमतीची ब्राऊनिश हेरॉईन ड्रग्ज, २० हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल व अंदाजे ४ लाख रूपये किंमतीचे चारचाकी वाहन असा एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करणेत आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक अभिजीत गुरव हे करीत आहेत.



हेरॉईन कारवाई प्रकरणी दोन कोल्हापूरच्या दोघांना पोलिसांनी मुद्देमालासहीत ताब्यात घेतले, यावेळी पोलिस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, तालुका पोलीस निरीक्षक निलेश तांबे व पथक.

डॉ. सटाले केंद्र, कोल्हापूर यांचे मार्फत
कंबरदुखी सायटीका मणक्याचा त्रास
यावर एआय मशीनद्वारे तपासणी, हर्बल लेप व औषधे, ३२ वर्षाचा अनुभव
सांध्याचे आजार : लिगामेंट गुडघ्याची गादी फाटणे, मानेची नस दबणे, चकती सरकणे, पायाची आखड वेदना
आज - रोटरी क्लब, दाते मळा, इचलकरंजी. सकाळी १० ते ५ वा.
फॅटीलिव्हर, मुतखडा, स्वादूपिंड, पित्ताशयातील खडा, फ्रोजन शोल्डर इ. टाच दुखी, मुळव्याध, पित्ताचा त्रास

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक
# महासत्ता
कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव







श्री शंभुतीर्थ स्मारक कामाच्या बिलाबाबत महानगरपालिकाच्या पदाधिकाऱ्यांवर प्रश्नाचा भडिमार करताना हिंदूत्ववादी कार्यकर्ते (छाया- छोटूसिंग)

## श्री शंभुतीर्थ स्मारक कामाचे बिल देण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ

### हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांकडून प्रश्नांचा भडिमार

इचलकरंजी,ता.८-

**येथील कॉ. मलाबादे चौकात साकारण्यात आलेल्या श्री शंभुतीर्थ स्मारक कामाचे बिल देण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात आहे. वारंवार पाठपुरावा करुनही बिल मिळत नसल्याने आणि श्री शंभुतीर्थचे दुसऱ्या टप्प्यातील काम थांबल्याने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे पदाधिकारी आणि मक्तेदार यांनी महापौर, उपमहापौरांची भेट घेतली. अखेर चर्चेअंती देयक देण्याच्या कामाला गती देण्यासह लवकरच दुसऱ्या टप्प्यातील काम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

चार महिन्यांपूर्वी कॉ. मलाबादे चौकात श्री शंभूतीर्थ साकारण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडला. वारंवार पाठपुरावा करुनही मक्तेदारास कामाचे देयक देण्यास टाळाटाळ केली जात आहे. शिवाय शंभूतीर्थचे दुसऱ्या टप्प्यातील कामही सुरु होण्यास विलंब होत आहे. या पार्श्वभूमीवर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे पदाधिकारी आणि मक्तेदार यांनी महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या यांची भेट घेतली.

यावेळी प्रसाद जाधव, मंगेश मस्कर, सुनील इंगळे, संतोष सावंत, अभिजीत शेळके, अवधूत बाबर, धनंजय सूर्यवंशी, विशाल पवार, विनायक पवार, सतीश घोरपडे, प्रताप घोरपडे, उदय यादव, निशांत साळी, उत्तम यादव, प्रणव होगडे यांनी लोकप्रतिनिधींनी सांगूनही अधिकाऱ्यांकडून कामाचे देयक का दिली जात नाहीत? यासह प्रश्नांचा भडीमार सुरु केला. महिला मक्तेदारानेही आपली व्यथा मांडत तीव्र संताप व्यक्त केला. त्यामुळे महापौर धातुंडे यांनी स्वत: शिष्टमंडळासोबत बांधकाम विभागात जाऊन सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर झालेल्या चर्चेअंती देयक देण्याच्या कामाला गती आली आणि लवकरच दुसऱ्या टप्प्यातील काम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी स्थायी समिती सभापती सतिश मुळीक उपस्थित होते.

# अप्पर तहसीलदार कार्यालयात नागरिकांची हेळसांड

## कार्यालयात एजंटांचा सुळसुळाट; लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज

इचलकरंजी,ता.८-

**शहरातील अप्पर तहसीलदार कार्यालय हे नागरिकांच्या विविध शासकीय कामांसाठी अत्यंत महत्त्वाचे केंद्र मानले जाते. मात्र, गेल्या काही महिन्यापासून या कार्यालयातील कामकाजाबाबत गंभीर तक्रारी समोर येत असून सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषत: रेशनकार्ड, डोमेसाईल (निवास प्रमाणपत्र), उत्पन्न दाखले, मोजणी, जमीन नोंदी, वारस दाखले यांसारखी अत्यावश्यक कामे वेळेत पूर्ण होत नसल्याने नागरिक हवालदिल झाले आहेत.**

कार्यालयात कोणतीही मोठी प्रशासकीय अडचण नसतानाही कामे लांबणीवर टाकली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. अनेकांना साध्या कागदपत्रांसाठी वारंवार चकरा माराव्या लागत असून दिवसेंदिवस एजंटांचा सुळसुळाट वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. काही ठिकाणी एजंटमार्फतच कामे लवकर पूर्ण होतात, असा समज नागरिकांमध्ये निर्माण झाल्याने सर्वसामान्य लोकांची अडचण अधिकच वाढत आहे.

कार्यालयातील काही प्रक्रियांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून अर्ज सादर केल्यानंतरही कामाचा पाठपुरावा करण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागते. परिणामी वेळ आणि पैशाचा मोठा अपव्यय होत आहे. विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना दिवसभर रांगेत थांबूनही अपेक्षित सेवा मिळत नसल्याची तक्रार नागरिकांतून केली जात आहे.

रेशनकार्ड संदर्भातील कामे, नाव समाविष्ट करणे, नाव कमी करणे, नवीन रेशनकार्ड मंजुरी, दुरुस्ती यासाठी नागरिकांना अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. त्याचप्रमाणे डोमेसाईल प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, जातीचे दाखले, मोजणी संदर्भातील प्रक्रिया, जमीन नोंदवही उतारे यांसारख्या महत्त्वाच्या कामांमध्ये देखील अनावश्यक विलंब होत असल्याचेही नागरिकांतून बोलले जात आहे.

याप्रकारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश, शासकीय योजना, शिष्यवृत्ती, नोकरी अर्ज, बँक कर्ज प्रक्रिया यावर परिणाम होत असून अनेकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. काही नागरिकांनी तर एजंटमार्फत आर्थिक लुटमार होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

कार्यालयात पुरेसे कर्मचारी उपलब्ध असूनही कामांची गती समाधानकारक नाही. अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यासाठी ऑनलाइन प्रणाली असतानाही प्रत्यक्षात नागरिकांना कार्यालयीन प्रक्रियेत अडथळे येत असल्याचे दिसते. अनेक वेळा कागदपत्रे पूर्ण असूनही किरकोळ कारणांवर अर्ज प्रलंबित ठेवले जात असल्याची तक्रार देखील पुढे येत आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक आमदार, खासदार तसेच इतर लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. प्रशासनातील कामकाज पारदर्शक व वेळेत पूर्ण व्हावे, एजंट पद्धतीला आळा बसावा आणि नागरिकांना कोणत्याही प्रकारचा मानसिक त्रास सहन करावा लागू नये, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**कार्यालयीन कामकाजाची नियमित पाहणी करून प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेणे, अर्ज प्रक्रिया सुलभ करणे, निश्चित कालमर्यादा जाहीर करणे आणि एजंटांच्या हस्तक्षेपावर नियंत्रण ठेवणे यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. शासनाने नागरिकाभिमुख सेवा देण्याचा उद्देश ठेवला असताना प्रत्यक्षात नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याने संबंधित यंत्रणेने तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे.त्यासाठी आमदारांनी लक्ष घालावे अशी मागणी होत आहे.**

**सामान्य नागरिकांना वेळेत सेवा मिळाल्यास प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. अन्यथा वाढत्या तक्रारींमुळे नाराजी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अप्पर तहसीलदार कार्यालयातील कामकाज सुरळीत, पारदर्शक व वेळेत होण्यासाठी संबंधित विभागाने तात्काळ लक्ष घालण्याची गरज असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.**

# यड्राव फाटा बनला मृत्यूचा सापळा

## लोकप्रतिनिधी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

तारदाळ,ता.८(वार्ताहर)-

**यड्राव फाटा परिसर सध्या वाहनचालकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत असून, रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अपघातांची मालिका सुरू आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेली रहदारी, अवजड वाहनांची सततची वर्दळ आणि खराब रस्त्याची अवस्था यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, सदर रस्त्याच्या कामासाठी १० तारखेला यड्राव फाटा येथे तिरडी आंदोलन करण्याचा इशारा यड्राव परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदनाद्वारे हातकणंगले सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आहे.**

या फाट्यावरून दररोज शेकडो लहान-मोठी वाहने प्रवास करत असतात. विशेषतः अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्त्याची दुरवस्था अधिकच वाढली आहे. ठिकठिकाणी पडलेले मोठे खड्डे वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असून, रात्रीच्या वेळी हे खड्डे न दिसल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

याशिवाय, सतत होणाऱ्या वाहतुकीमुळे या ठिकाणी वारंवार ट्रॅफिक जामची समस्या निर्माण होत आहे.

अचानक वाहनांची गर्दी वाढल्याने वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक वेळा आपत्कालीन सेवांनाही याचा फटका बसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

तरी संबंधित विभागाने तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत, तसेच वाहतूक व्यवस्थापनासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. अन्यथा एखादा मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


सांगली रोडवरील यड्राव पेट्रोल पंपासमोरील मुख्य रस्त्यावर पडलेले खड्डे (छाया: गजानन खोत)

**खोतवाडी चौक ते यड्राव फाटा परिसरात दररोज अपघातांची मालिका सुरू आहे .तसेच शालेय विद्यार्थ्यांसह प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. मात्र ,याकडे लोकप्रतिनिधी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष आहे.असा आरोप सामाजिक कार्यकर्ते दिपक खोत यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना केला.**

## जागेच्या वादातून महिलेस धमकी

सांगली,ता.८(प्रतिनिधी)-

**जमिनीच्या वादातून महिलेस जातीवाचक शिवीगाळ करून तिला व मुलांना संपवून टाकण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे.**

याप्रकरणी संशयित शरद तानाजी देशमुख (रा. सांगलीवाडी), विद्या महेंद्रकुमार चौधरी, संगीता सतीश चौधरी (दोघे रा. आप्पासाहेब पाटीलनगर) व अनोळखी व्यक्ती अशा चौघांविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात 'अ‍ॅट्रॉसिटी' चा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत वैशाली रवींद्र वायदंडे (रा. एकता चौक, सांगलीवाडी) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी वैशाली वायदंडे यांची वडिलोपार्जित १९ गुंठे जमीन शरद देशमुख यांनी वायदंडे यांचे सासरे देवदास वायदंडे यांना पैशाचे आमिष दाखवून नोटरी करारपत्र करून घेतली आहे. याबाबत सांगलीतील दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे.

# गोकुळ संचालक अपात्र, निवडणुकीबाबत सुनावणी

## सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश

कोल्हापूर, ता. ८ (प्रतिनिधी)-

**जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) संचालक अपात्रता प्रकरण आणि दूध संस्थांच्या निवडणुकांबाबत दाखल असलेल्या याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचसमोर महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने राज्य सरकारला या दोन्ही प्रकरणांत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.**

न्यायमूर्ती माधव जामदार आणि न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, न्यायालयाने दोन वेगवेगळ्या सत्रांत यावर युक्तिवाद ऐकून घेतला.

सकाळच्या सत्रात गोकुळच्या संचालकांना अपात्र ठरवण्याबाबतच्या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्ते महादेव दूध संस्थेचे वकील सतीश तळेकर यांनी युक्तिवाद केला की, गोकुळच्या चाचणी आणि विशेष लेखापरीक्षणामध्ये संबंधित संचालकांवर ठपका ठेवण्यात आला आहे. यावर न्यायालयाने राज्य सरकारला २१ एप्रिलपर्यंत आपले प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ एप्रिल रोजी निश्चित केली आहे.

दुपारच्या सत्रात दूध संस्थांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांवर एकत्रित सुनावणी झाली. यामध्ये निवडणूक प्रक्रिया राबवणे, काही ठराविक १२०० संस्थांना प्रक्रियेतून वगळणे किंवा निवडणूक तूर्तास न घेणे अशा परस्परविरोधी मागण्या विविध संस्थांकडून करण्यात आल्या आहेत. या गोंधळावर स्पष्टता येण्यासाठी न्यायालयाने सरकारला २२ एप्रिलपर्यंत प्रतिज्ञापत्र देण्यास सांगितले आहे. या विषयावर २८ एप्रिल रोजी पुन्हा सुनावणी होणार आहे.

न्यायालयातील या कामकाजात अ‍ॅड. सतीश तळेकर, अ‍ॅड. अनिल साखरे, अ‍ॅड. एस. एस. पटवर्धन, अ‍ॅड. ऋतुराज पवार, अ‍ॅड. धीरज पाटील, अ‍ॅड. सचिन पाटील आणि सरकारी वकील विशाल माळी यांनी विविध पक्षांची बाजू मांडली.















■ संपादकीय ■

# युद्धविराम झाला; पण...

आखातातील युद्धाला अचानक दोन आठवड्यांचा 'विराम' मिळणे, ही जगातील अब्जावधी नागरिकांसाठी वर्तमान काळातील सर्वांत मोठी दिलासादायक वार्ता ठरली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या पायाभूत सुविधांवर विशेषतः वीज प्रकल्प आणि पुलांवर हल्ला करण्याची आपली धमकी तूर्तास मागे घेतली आहे. त्या बदल्यात, इराणने जगासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'होर्मुझची सामुद्रधुनी' हा सागरी मार्ग पुन्हा सुरू करण्याचे मान्य केले आहे. ही घडामोड म्हणजे जागतिक राजकारणातील एका मोठ्या तणावाचा तात्पुरता शेवट असला, तरी यातून खरा शांतता करार प्रत्यक्षात येईल का, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. येणारे दोन आठवडे केवळ अमेरिका आणि इराणसाठीच नव्हे, तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि राजकीय स्थिरतेसाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. या दोन आठवड्यांच्या काळात दोन्ही देशांना एका ठोस शांतता करारावर पोहोचायचे आहे. मात्र, यात सर्वात मोठा अडथळा म्हणजे दोन्ही बाजूंचे एकमेकांशी न जुळणारे प्रस्ताव. इराणने मांडलेला १० कलमी प्रस्ताव हा प्रामुख्याने नुकसानभरपाई आणि अमेरिकेच्या लष्करी माघारीवर आधारित आहे. इराणच्या मागणीनुसार, अमेरिकेने युद्धादरम्यान झालेल्या हानीची भरपाई द्यावी, देशावरील सर्व निर्बंध त्वरित उठवावेत, गोठवलेली इराणी मालमत्ता मुक्त करावी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अमेरिकन फौजांनी या संपूर्ण क्षेत्रातून माघार घ्यावी. ही मागणी पूर्ण करणे अमेरिकेसाठी अत्यंत कठीण आहे, कारण यामुळे मध्यपूर्वेतील अमेरिकेचा लष्करी प्रभाव संपुष्टात येईल. दुसरीकडे, ट्रम्प प्रशासनाचा १५ कलमी आराखडा इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला पूर्णपणे लगाम घालण्यावर लक्ष केंद्रित करतो. यामध्ये इराणने आपले क्षेपणास्त्र कार्यक्रम मर्यादित करणे आणि आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या देखरेखीखाली राहणे अनिवार्य आहे. इराणने हा प्रस्ताव दोन आठवड्यांपूर्वीच फेटाळून लावला होता. मात्र, आता ट्रम्प यांनी इराणच्या १० कलमी प्रस्तावाला वाटाघाटीसाठी एक व्यवहार्य आधार म्हटले आहे. हे विधान ट्रम्प यांच्या भूमिकेत झालेला एक मोठा बदल मानला असून तो कदाचित तोडगा काढण्याच्या उद्देशाने असावा. तरीही, निर्बंध उठवण्यासारख्या मुद्द्यावर अमेरिकेतील अंतर्गत राजकारण आणि इस्रायलचा दबाव ट्रम्प यांना किती सवलत देऊ देईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. या युद्धविरामाचा मुख्य उद्देश होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणे हा होता. गेल्या पाच आठवड्यांपासून इराणने या मार्गाची नाकेबंदी केल्यामुळे जागतिक बाजारात इंधनाचे दर गगनाला भिडले होते. इराणने आता हा मार्ग खुला करण्याचे मान्य केले असले, तरी त्यासोबत काही कडक अटी जोडल्या आहेत. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी स्पष्ट केले आहे की, या मार्गावरून जाणाऱ्या जहाजांना इराणच्या सशस्त्र दलांशी समन्वय साधावा लागेल. याचा अर्थ असा की, या सागरी मार्गावर इराणचा पूर्ण ताबा असेल. तसेच, इराणने या मार्गावरून जाणाऱ्या प्रत्येक जहाजाकडून २ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स एवढे शुल्क आकारण्याचे सूतोवाच केले आहे. या पैशांचा वापर देशाच्या पुनर्बांधणीसाठी केला जाईल, असा इराणचा दावा आहे. हे शुल्क म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारावर इराणने लादलेला एक प्रकारचा 'टॅक्स' आहे, जो अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देशांना कितपत मान्य होईल, यावर शंका आहे. जर जहाजांच्या वाहतुकीत अडथळे आले, तर हा युद्धविराम कोणत्याही क्षणी कोसळू शकतो. डोनाल्ड ट्रम्प यांनी या युद्धविरामाचे वर्णन आपल्या लष्करी यशाचा भाग म्हणून केले आहे. आम्ही आमची सर्व लष्करी उद्दिष्टे साध्य केली आहेत, असे त्यांनी सोशल मीडियावरून जाहीर केले. मात्र, ही उद्दिष्टे नेमकी काय होती, यावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. इराणची क्षेपणास्त्र क्षमता संपवणे, त्यांचे नौदल नष्ट करणे आणि अण्वस्त्रांपासून त्यांना रोखणे, अशी ट्रम्प यांची घोषित उद्दिष्टे होती. ट्रम्प यांना युद्धाच्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी एक सुरक्षित मार्ग हवा होता. युद्ध लांबल्यास त्याचा फटका अमेरिकन अर्थव्यवस्थेला बसला असता, जो ट्रम्प यांच्या लोकप्रियतेसाठी घातक ठरला असता. म्हणूनच, मिशन अकंप्लिश्ड किंवा मोहीम फत्ते अशी घोषणा करून ते आता शांततेच्या प्रक्रियेत सहभागी होत आहेत. मात्र, दोन आठवड्यांचा हा काळ फार कमी आहे. डोळ्याचे पाते लवते ना लवते तोवर हा काळ संपून जातील, त्यामुळे आता खऱ्या मुत्सद्देगिरीची गरज आहे. या युद्धविरामाचा परिणाम केवळ बाह्य राजकारणावरच नाही, तर इराणच्या अंतर्गत स्थितीवरही होईल. बाह्य युद्ध थांबल्यामुळे इराणची राजवट आता देशांतर्गत बंडखोर आणि विरोधकांना चिरडण्यासाठी आपली शक्ती वापरू शकते.युद्धाच्या नावाखाली लोकांचे लक्ष भरकटवले गेले होते, पण आता शांततेच्या काळात इराणी जनता राजवटीला जाब विचारू शकते, ही भीती तेहरानच्या नेत्यांना नक्कीच असेल.थोडक्यात सांगायचे तर,अमेरिका आणि इराणमधील हा युद्धविराम म्हणजे एका मोठ्या वादळापूर्वीची शांतता आहे. पुढचे १४ दिवस जागतिक मुत्सद्देगिरीची खरी परीक्षा घेणारे ठरतील.

# निवडणुकांमधील खेळी

**'एक देश, एक निवडणूक' हा भाजपचा पुढचा अजेंडा राहणार आहे. देशात सध्या समान नागरी कायदा (यूसीसी) आणि 'एक देश, एक निवडणूक' यावर सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त कार्यकर्त्यांना आभासी पद्धतीने संबोधित करताना स्पष्ट केले. यूसीसी आणि 'एक देश, एक निवडणूक' हे विषय भाजपच्या अजेंड्यावरील महत्त्वाचे अधुरे कार्य असल्याचे मोदी म्हणाले.**



भाजपच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. पंतप्रधान म्हणाले,भाजप कार्यकर्त्यांनी आणीबाणीसारख्या काळाचा सामना केला असून काँग्रेसच्या राजवटीत अनेक संकटे झेलली आहेत. पश्चिम बंगाल आणि केरळसारख्या राज्यांचा उल्लेख करत मोदी म्हणाले, या राज्यांमध्ये हिंसाचाराला राजकीय संस्कृतीचे स्वरूप दिले गेले आहे. तेथे अनेक भाजप कार्यकर्त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. भाजप हा एकमेव असा पक्ष आहे जिथे कार्यकर्ता पक्षाला आपली माता मानतो. म्हणूनच पक्षाचा स्थापना दिन हा केवळ राजकीय कार्यक्रम नसून प्रत्येक कार्यकर्त्यासाठी तो एक भावनिक क्षण आहे. देशासमोर असलेल्या प्रत्येक आव्हानाचा भाजप खंबीरपणे सामना करत असून, भविष्यातही याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. 'एक देश, एक निवडणूक' (लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेणे) आणि 'समान नागरी कायदा' (विवाह, दत्तक विधान इत्यादीसाठी सर्वांना समान कायदा) यावर देश सकारात्मक दिशेने पुढे जात आहे. ब्रिटिश काळातील कालबाह्य कायदे रद्द करणे, नवीन संसद भवनाची उभारणी, सवर्णामधील गरिबांना १० टक्के आरक्षण, तिहेरी तलाक बंदी, सीएए आणि अयोध्या राम मंदिर निर्मिती या भाजपच्या उपलब्धी आहेत, हे वास्तव आहे. नरेंद्र मोदी म्हणाले,देशाला माहीत आहे की, प्रत्येक आव्हानाचा सामना करण्यासाठी भाजप मनापासून प्रयत्न करत आहे आणि भविष्यातही आम्ही असेच प्रयत्न करणार आहोत. भूतकाळात आम्हाला सकारात्मक परिणाम मिळाले आहेत आणि भविष्यातही आम्हाला असेच यश मिळत राहील. कायद्याद्वारे 'ट्रिपल तलाक'वर बंदी घालणे, नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) लागू करणे आणि अयोध्येत राम मंदिराची उभारणी करणे ही भाजपच्या प्रामाणिक प्रयत्नांची काही उदाहरणे आहेत. मात्र पक्षाचे हे कार्य अजूनही सुरूच आहे. कारण समान नागरी संहिता (यूसीसी) आणि 'एक देश, एक निवडणूक' यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सध्या देशभरात गांभीर्याने चर्चा सुरू आहे. आरएसएसच्या विशाल आणि पवित्र वटवृक्षाच्या छायेखाली आम्हाला शुद्ध हेतूने व सचोटीने राजकारणात प्रवेश करण्याची प्रेरणा मिळाली असे सांगताना मोदी म्हणाले, सुरुवातीच्या काही दशकांमध्ये आम्ही आमची ऊर्जा संघटनेसाठी धोरणे आखण्यात समर्पित केली. त्यानंतर असा काळ आला जेव्हा भाजपने स्वतःला एक मजबूत आणि कार्यकर्त्यांवर आधारित पक्ष म्हणून उभारण्यात स्वतःला पूर्णपणे झोकून दिले,असो. भाजपचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत यात शंका नाही.

दैनंदिनी

भाजपच्या रणनीतीचे ताजे उदाहरण म्हणजे,पश्चिम बंगालमध्ये फायद्यासाठी भाजपकडून महिला आरक्षणाची खेळी करण्यात आली आहे. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या केवळ आठवडाभर आधी संसदेच्या तीन दिवसांच्या अधिवेशनामध्ये महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्याचा घाट घालून केंद्र सरकारने महिला मतदारांना भाजपकडे आकर्षित करण्याची खेळी केली आहे. आचारसंहिता लागू असताना घाईघाईने घटनादुरुस्तीला काँग्रेस व तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांनी विरोध केल्याने राजकीय संघर्ष तीव्र झाला आहे. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन स्थगित न होता तहकूब करण्यात आले असून १६ ते १८ एप्रिल दरम्यान 'नारी शक्ती वंदन अधिनियम' या कायद्यामध्ये घटनादुरुस्ती केली जाणार आहे. या घटनादुरुस्तीद्वारे २०२९ च्या लोकसभा निवडणुकी मध्येच महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवल्या जातील. त्यासाठी मतदारसंघाची फेररचना करावी लागणार आहे. पण, २०२७ च्या जनगणनेची वाट न पाहताच २०११ च्या जनगणनेनुसार ही फेररचना लागू केली जाईल. घटनादुरुस्तीसारखा अत्यंत महत्त्वाचा निर्णय एकतर्फी, विरोधकांशी चर्चा न करताच घेण्यास काँग्रेस व तृणमूल काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. तसे पत्र काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधानांना लिहिले होते. शिवाय, सर्वपक्षीय बैठक घेऊन निर्णय घेण्याचेही आवाहन केले होते. मात्र, या पत्राला तसेच सर्वपक्षीय बैठकीच्या मागणीला केंद्र सरकारने प्रतिसाद दिला नाही. 'नारी शक्ती वंदन अधिनियम'कायद्यातील दुरुस्तीच्या वेळेवर तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी शंका उपस्थित केली आहे. पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस व भाजप यांच्यातील लढाई तीव्र झाली असून दोन्ही पक्षांसाठी महिला मतदार निर्णायक असल्याने त्यांना आकर्षित करण्याचे प्रयत्न दोन्ही पक्षांकडून केले जात आहेत. भाजपने मध्य प्रदेश,महाराष्ट्र, बिहार या राज्यानंतर पश्चिम बंगाल निवडणुकीतही महिला मतदार केंद्रित प्रचाराच्या रणनीतीवर भर दिला आहे. याआधी झालेल्या राज्यांतील विधानसभा निवडणुकीत लाडली बहेना,लाडकी बहीण अशा नावाखाली महिलांच्या हाती रोख रक्कम देणाऱ्या रेवड्यांचा लाभ निवडणुकांमध्ये भाजपला झाला होता. आता पश्चिम बंगालमध्ये महिला आरक्षणाच्या कायद्यात बदल करून निवडणूक काळात नवी रेवडी वाटण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.



**महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अखेर राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (एनईपी)च्या अंमलबजावणीचा पुढचा टप्पा गाठला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यातील विद्यापीठांमध्ये चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील चौथे वर्ष 'ऑनर्स' आणि 'संशोधनासह ऑनर्स' सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.**

# शिक्षणाची नवी चतुःसूत्री

केवळ पदवीच्या प्रमाण पत्रासाठी महाविद्यालयाची पायरी चढणाऱ्या पिढीला आता खऱ्या अर्थाने संशोधक बनवण्याची ही एक मोठी संधी आहे.गेली अनेक दशके आपल्याकडे तीन वर्षांच्या पदवीचे साचेबद्ध स्वरूप होते. मात्र, जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी आणि संशोधनाला चालना देण्यासाठी पदवी शिक्षणाची पुनर्रचना करणे काळाची गरज होती. या नव्या धोरणानुसार, पदवीचे चौथे वर्ष दोन महत्त्वाच्या मार्गांनी विभागले गेले आहे. ज्या विद्यार्थ्यांना आपल्या मुख्य विषयात अधिक प्राविण्य मिळवायचे आहे, त्यांच्यासाठी ऑनर्सचा मार्ग असेल. तर, ज्यांना भविष्यात जागतिक स्तरावर संशोधनात करिअर करायचे आहे, त्यांच्यासाठी १२ क्रेडिट्सचा स्वतंत्र संशोधन प्रकल्प किंवा शोधनिबंध अनिवार्य असेल.

या धोरणातील सर्वात महत्त्वाचा आणि स्वागतार्ह बदल म्हणजे क्रेडिट फ्रेमवर्क आणि मल्टिपल एन्ट्री-एक्झिटची सुविधा. यामुळे विद्यार्थ्याला कौशल्याधिष्ठित शिक्षणासोबतच लवचिकता मिळणार आहे. संशोधनासह ऑनर्ससाठी ७.५ सीजीपीएची अट ठेवून गुणवत्तेचा दर्जा राखण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. तसेच, पीएचडी मार्गदर्शकांच्या उपलब्धतेनुसारच या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ठरवली जाणार असल्याने, संशोधनाचा दर्जा खालावणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. परंतु, हे धोरण कागदावरून प्रत्यक्ष वर्गात उतरवताना अनेक आव्हाने समोर उभी आहेत. सर्वच महाविद्यालयांकडे आवश्यक पायाभूत सुविधा किंवा अनुभवी प्राध्यापक आहेत का? ज्या महाविद्यालयांकडे स्वतःचे पदव्युत्तर विभाग किंवा संशोधन केंद्र नाही, तिथे हे चौथे वर्ष कसे राबवले जाईल, हा कळीचा मुद्दा आहे. शासनाने अशा महाविद्यालयांसाठी विद्यापीठांच्या माध्यमातून लॅटरल एन्ट्रीचा पर्याय दिला असला, तरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या शहरात किंवा विद्यापीठात जाऊन हे वर्ष पूर्ण करणे आर्थिकदृष्ट्या किती परवडणारे असेल, याचा विचार करावा लागेल. दुसरीकडे, अभियांत्रिकी शिक्षणातही सिंगल मेजर, डबल मायनर सारखे पर्याय देऊन विद्यार्थ्यांना बहुआयामी बनवण्याचा प्रयत्न आहे. ऑनलाइन शिक्षणासाठी ४० टक्क्यांपर्यंतची सवलत देऊन आधुनिक तंत्रज्ञानाची जोडही देण्यात आली आहे.

थोडक्यात सांगायचे तर, पदवीच्या चौथ्या वर्षाचा हा निर्णय केवळ शैक्षणिक वर्षाची वाढ नसून, तो मानसिकतेतील बदलाचा श्रीगणेशा आहे. पदवी घेणारा प्रत्येक तरुण केवळ नोकरीच्या मागे न धावता, त्याने स्वतःचे ज्ञान आणि संशोधनाच्या जोरावर नवी क्षितिजे पादाक्रांत करावीत, हाच यामागचा मुख्य उद्देश आहे. मात्र, या धोरणाची यशस्विता ही विद्यापीठांची स्वायत्तता आणि अंमलबजावणीतील सुसूत्रता यावरच अवलंबून असेल. शिक्षण क्षेत्रातील हा बदलाचा वारा केवळ घोषणांपुरता न राहता, तो विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी ठरावा, हीच अपेक्षा.

■ डॉ.प्रकाश मुंज

# भारत-नेपाळ संबंध सुधारतील?

**नेपाळ हा भारताचा शेजारील देश असून भारताच्या मित्र देशांपैकी एक देश आहे. भारत आणि नेपाळची संस्कृतीही जवळपास सारखीच आहे. जगातील एकमेव हिंदू देश अशी नेपाळची ओळख आहे. भारततातही बहुसंख्य हिंदुधर्मीय लोक असून भारताचा सर्वाधिक विश्वासार्ह देश अशी नेपाळची ओळख आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच नेपाळशी आपले मैत्रीचे आणि सौहार्दाचे संबंध राहिले आहेत.**

नेपाळमधील कोणताही नागरिक व्हिसाशिवाय भारतात प्रवेश तसेच व्यवसायही करू शकतो. नेपाळचे लाखो नागरिक आज भारतात वास्तव्यास आहेत. दोन्ही देशात रोटीबेटीचा व्यवहार देखील होतो असे असले तरी तरी गेल्या काही वर्षात नेपाळ आणि भारतात प्रचंड कटुता निर्माण झाली आहे. दोन्ही देशातील सौहार्दपूर्ण संबंध बिघडले आहेत. एकेकाळी भारताला सच्चा मित्र मानणारा नेपाळ आता भारताला स्पर्धक समजू लागला आहे. के पी ओली शर्मा हे नेपाळचे पंतप्रधान बनले तेव्हापासून दोन्ही देशातील कटुता वाढत गेली. के पी ओली शर्मा हे नेपाळचे पंतप्रधान बनल्यावर त्यांनी भारताशी असलेले सौहार्दाचे संबंध तोडून टाकले आणि भारताला आपला प्रतिस्पर्धी म्हणून घोषित केले अर्थात याला चीन जबाबदार आहे. के पी ओली शर्मा चीन धार्जिणे होते. चीनच्या नादी लागून त्यांनी भारताच्या सतत खोड्या काढण्याचा उद्योग केला. कधी त्यांनी भारताचा भूभाग नेपाळच्या नकाशात दाखवला तर कधी नेपाळच्या चलनी नोटांवर भारताचा भूभाग छापून भारताला चिथावले.अर्थात हा सर्व चीनच्या रणनीतीचा भाग होता.त्यांनी भारताला थेट आव्हान दिले त्यामुळे दोन्ही देशात कटुता निर्माण झाली.

आता मात्र चित्र बदलत आहे कारण चीन धार्जिणे के पी ओली शर्मा यांच्या भ्रष्ट कारभाराविरोधात नेपाळच्या जेन झीने मागीलवर्षी मोठा उठाव केला त्यात के पी ओली शर्मा यांना आपली खुर्ची सोडावी लागली. के पी ओली शर्मा पदभ्रष्ट झाल्यानंतर नेपाळमध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकीत ३५ वर्षाच्या बालेंद्र शहा उर्फ बालेन यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने (आरएसपी) बहुमत मिळवले आणि त्यांच्या पक्षाने बालेंद्र शहा यांची नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून घोषणा केली. राम नवमीच्या मुहूर्तावर बालेंद्र शहा यांनी नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.



बालेंद्र शहा यांनी नेपाळची सूत्रे हाती घेतल्यामुळे भारत आणि नेपाळ यांच्यातील संबंध पूर्वीप्रमाणे सौहार्दाचे होतील अशी आशा निर्माण झाली आहे. कारण पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून त्यांनी भारताविरुद्ध एकही वक्तव्य केले नाही अर्थात काठमांडूचे महापौर असताना त्यांनी भारत विरोधी भूमिका घेत ग्रेटर नेपाळचे समर्थन करत भारताला दुखावले होते आता मात्र त्यांची ती भूमिका बदलेल अशी आशा करायला हरकत नाही कारण बालेंद्र शहा पंतप्रधान बनल्यावर आपल्या पंतप्रधानांनी त्यांचे अभिनंदन केले त्यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत दोन्ही देशात मैत्रीचे संबंध निर्माण होतील अशी ग्वाही दिली. भारतानेही कुटनितीक पावले टाकून बालेंद्र शहा यांना भारताकडे वळवण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे दोन्ही देशात बिघडलेले संबंध पूर्ववत होतील आणि दोन्ही देशात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील.

■ श्याम ठाणेदार

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**गुरुवार ता.९.४.२०२६**,विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४८,परामव नाम संवत्सरे उत्तरायणे, वसंत ऋतो,चैत्र मासे, कृष्ण पक्षे,सप्तमी तिथी,२१.२० नंतर अष्टमी तिथी,मुळ नक्षत्र, ८.५० नंतर पूर्वाषाढा नक्षत्र,धनु रास, परिघ योग,१७.५८ नंतर शिवयोग,विष्टी करण ८.१३ नंतर,बव करण २१.२० पर्यंत,दिनमान १२.१८,सुर्योदय ६.२६, सुर्यास्त १८.४४ (कोल्हापूरचे)राहू काळ दुपारी १.३० ते ३, दादा महाराज सांगवडेकर पु.दि.कोल्हापूर भद्रा, ८.१३ पर्यंत, सकाळी ९ नंतर स्थावर खरेदी, विक्री,कूपनलिका.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष**–कामाच्या ठिकाणी आज तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळेल. रिकाम्या वेळेचा योग्य वापर करणे तुम्हाला शिकावे लागेल.वडिलांच्या आरोग्यासाठी धन खर्च होईल.

**वृषभ**– महत्त्वाच्या कामाची फाईल सर्व बाबतीत चोख आणि परिपूर्ण असल्याची तुम्हाला खात्री असल्याशिवाय वरिष्ठांच्या हाती सोपवू नका.

**मिथून**–अतिखाणे टाळा, तुमच्या वाढत्या वजनावर सातत्याने लक्ष असू द्या. आज या राशीतील काही बेरोजगार लोकांना नोकरी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

**कर्क**– तुमच्यासाठी धन कमावण्यासाठी बरीच संधी मिळेल. अनपेक्षित जबाबदारी आल्यामुळे तुमचे दिवसभराचे बेत रखडतील. विचारपूर्वक निर्णय घ्या.

**सिंह**– तुमचा मोकळा वेळ मुलांच्या सहवासात घालवा - मग त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा वेगळी क्लृप्ती करावी लागली तरी चालेल. प्रवासास जाणे टाळा.

**कन्या**– घरातील लहान-लहान गोष्टींवर आज तुमचे खूप धन खर्च होऊ शकते ज्यामुळे तुम्ही मानसिक तणावात येऊ शकता. इतरांच्या सूचनांप्रमाणे काम केल्यास उत्तम.

**तुळ**– आजचा दिवस लाभदायक असून, तुम्हाला तुमच्या दीर्घ आजारापासून सुटका मिळण्याची शक्यता आहे. आर्थिक मदत करताना विचार करा.

**वृश्चिक**–रात्री ऑफिस मधून घरी येण्याच्या वेळी आज सावधानतेने वाहन चालवा. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांची मदत मिळेल. दिवस आनंदात जाईल.

**धनु**– भागीदारी तत्त्वावर नवीन व्यवसाय सुरू करायला चांगला दिवस. पण भागीदारांशी करार करण्यापूर्वी पुन्हा एकदा विचार करा. आज अचानक कुठे यात्रेवर जावे लागू शकते.

**मकर**– जुना मित्र आज व्यवसायात नफा मिळवण्यासाठी तुम्हाला सल्ला देऊ शकतो जर तुम्ही हा सल्ला अंमलात आणला तर तुम्हाला धन लाभ नक्कीच होईल.

**कुंभ**– तुमच्या पुढे जाण्यासाठी कुणीतरी तुमचा मूड बिघडविण्याचा प्रयत्न करेल परंतु तुम्हाला त्रास देण्याचा हा प्रयत्न तुम्ही यशस्वी होऊ देऊ नका. वादविवाद टाळा.

**मीन**–तुमच्या जोडीदाराचे धाडस आणि निष्ठेमुळे तुम्हाला आनंद मिळेल. आज या राशीतील काही बेरोजगार लोकांना नोकरी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### मुद्रित साहित्याला पर्याय नाही!

सार्वजनिक ग्रंथालयांना घरघर लागल्याची बातमी महाराष्ट्रासारख्या राज्याला निश्चितच भूषणावह नाही, हे खरेच आहे. इंटरनेट नावाच्या माहितीच्या महाजालावर सर्व काही उपलब्ध असले तरी मुद्रीत साहित्याला पर्याय नाही. हवं ते, हवं तेव्हा अशा साहित्याचा बारकाईने सखोल अभ्यासासाठी ग्रंथ व पुस्तकेच कामाला येतात. अभ्यासू वृत्तीने ज्ञान वाढवायचे तर वाचनाचा ध्यास,वाचनाची आस,वाचनाची गोडी हवी. वाचनाचे सुख म्हणजे काय हे वाचायला लागाल त्याचवेळी समजेल ना?प्रवासात सहज खिडकीबाहेर डोकावल्यानंतर, शहरात खेड्यात फेरफटका मारताना वृत्तपत्र वा पुस्तक हातात घेऊन वाचनात दंग असलेल्या सरस्वतीच्या लेकरांचे दृश्य पाहून खरेच मन सुखावून जाते. मोठमोठे जड ग्रंथ अभ्यास,संशोधन करणारे वाचतीलच परंतु नाममात्र किंमतीत मिळणारे किमान एखादे मराठी वृत्तपत्र तरी प्रत्येकाच्या घरी असायलाच हवे.घरात एखादे नियमित वृत्तपत्र असणे हे सुसंस्कृतपणाचेच लक्षण होय. सकाळच्या प्रहरी कर्ती माणसे वाचतीलच शिवाय दुपारच्या फावल्या वेळात गृहिणी (त्या सुद्धा कर्त्याच आहेत!) सुद्धा रोजच्या दैनिक वृत्तपत्र वाचनाचा आनंद खासच घेऊ शकतात. त्या वाचनाने आपल्या ज्ञानाची भूक भागवू शकतील आणि वाढवूही शकतील. या वाचनाच्या गोडीने मन आणि विचार प्रगल्भ होईल किंबहुना जगण्याच्या लढाईचे सामर्थ्य सुद्धा त्यांना लाभू शकेल, एवढी प्रचंड ताकद एका वृत्तपत्रात आहे. म्हणूनच प्रत्येकाने वृत्तपत्र वाचनाची गोडी लावून घ्यायलाच हवी. पुन्हा अशी सवय होईल की वृत्तपत्र वाचल्याशिवाय चैनच पडणार नाही. ही वृत्तपत्र वाचनाची सवय मोठमोठे ग्रंथ वाचायला प्रवृत्त करेल. रोजच्या राजकीय,सामाजिक घडामोडी, आजूबाजूला घडणाऱ्या बऱ्या वाईट घटना शिवाय इतर ज्ञान, मनोरंजन आणि प्रबोधनपर वाचनाने विचारसंपन्नता येऊन चांगले लोकशिक्षणही होईल! एक मात्र खरे मुद्रित साहित्याला पर्याय नाही! आणि म्हणूनच ग्रंथालयांनाही पर्याय नाही! ग्रंथालये टिकायलाच हवीत!

■ श्रीकांत जाधव

### एआय डेटा सेंटर्सचा पर्यावरणावर गंभीर परिणाम

केंब्रिज विद्यापीठाच्या संशोधनानुसार जगभर आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) झपाट्याने वाढणाऱ्या वापरामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याचे समोर आले आहे. या संशोधनानुसार जगभरातील सहा हजारहून अधिक एआय डेटा सेंटर्सच्या परिसरात झालेल्या हवामानातील बदलांचा सखोल अभ्यास आणि विश्लेषण करण्यात आले आहे. जागतिक तापमानवाढीसाठी कारणीभूत असलेले घटक बाजूला ठेवून केवळ डेटा सेंटर्सच्या पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास केला असता तापमान २ अंश सेल्सिअसपर्यंत वाढल्याचे दिसून आले आहे. शास्त्रज्ञांनी या परिणामाला 'डेटा हीट आयलंड इफेक्ट असे नाव दिले असून यामध्ये एआय सर्व्हर्स आणि कूलिंग सिस्टिम्समधून २४ तास मोठ्या प्रमाणात निघणाऱ्या उष्णतेमुळे केवळ डेटा सेंटर्सच्या आसपासच नाहीतर डेटा सेंटर्सपासून १० किलोमीटरच्या परिसरातही तापमानात वाढ झाल्याचे दिसून आले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञान प्रगत आणि बहु उपयोगी असले तरी प्रत्यक्षात प्रचड खर्चिक आणि ग्लोबल वॉर्मिंगचा ताण वाढवणारे आहे.

■ प्रदीप मोरे

### गर्दी नियंत्रणासाठी उपाययोजना हव्यात

बिहारच्या नालंदामधील शितळादेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत आठ महिला भाविकांचा मृत्यू झाला. खरोखर ही अतिशय दुर्दैवी घटना आहे.यापूर्वीही अशा चेंगराचेंगरीच्या घटना देशभरात घडल्या आहेत.यातून आपण बोध घेण्याची आवश्यकता आहे. बहुतांश ठिकाणी अतिगर्दीमुळे चेंगराचेंगरीच्या घटना घडलेल्या आहेत. खरं म्हणजे जेथे गर्दीची ठिकाणे असतील. अशा ठिकाणी योग्य ती खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. देशभरातील गर्दीच्या ठिकाणी गर्दी नियंत्रणासाठी प्रशासनाने उपाययोजना केल्या पाहिजेत. तसेच नागरिकांनी देखील पुरेशी खबरदारी घेतली पाहिजे. शिस्तीचे पालन केले पाहिजे.तसेच गर्दी नियंत्रणासाठी योग्य ती खबरदारी घेतल्यास अशा घटना टाळता येतील.

■ संतोष शिंदे

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# पाणीपुरवठ्यासाठी तातडीने उपाययोजना करा

## प्रादेशिक आयुक्त जानकी के. एम. यांच्या सुचना

बेळगाव,ता.८

......................

**उन्हाळा सुरू होताच पिण्याच्या पाण्याची समस्या तीव्र होण्याची शक्यता असते. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन बेळगाव विभागातील समस्याग्रस्त गावांची ओळख पटवावी. स्थानिक पातळीवर उपलब्ध संसाधनांचा वापर करून तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याठिकाणी टँकर व जवळील खासगी कूपनलिकांच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यासाठी सुक्ष्म योजना तयार करावी, असा आदेश प्रादेशिक आयुक्त जानकी के. एम. यांनी दिला.**



महसूल विभागासंदर्भात विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. जानकी म्हणाल्या, ज्या गावांमध्ये पाणीटंचाई अधिक जाणवते. तेथे गरज पडल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची तयारी ठेवावी. याशिवाय नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दर आठवड्याला आढावा बैठका घेऊन परिस्थितीवर लक्ष ठेवावे.उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात यावा, अशी सूचनाही त्यांनी दिली.

जनगणनेच्या कामकाजाबाबतही बैठकीत आढावा घेण्यात आला.ग्रामीण भागात व्यापक जनजागृती सुरू असून शहरी भागात व्हिडिओ प्रदर्शनाद्वारे नागरिकांना माहिती दिली जात आहे. सध्या स्वयंगणना प्रक्रिया सुरू असून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून ही प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करावी. ई-पेमेंटबाबत ता. ७ मार्च २०२६ च्या शासकीय परिपत्रकानुसार प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. शासनाने मार्गदर्शक सूचना सुलभ केल्या असून या प्रक्रियेला गती देणे आवश्यक आहे. सर्व महसुली व्यवहार पारदर्शक आणि जलद व्हावेत, यासाठी ई-पेमेंटचा व्यापक वापर करावा.संबंधितांनी ई-पेमेंटची अंमलबजावणी तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश जानकी यांनी दिले.

शासकीय जमिनींच्या बाबतीत त्यांचे योग्य वर्गीकरण आणि निश्चितीकरण करण्यासाठी तात्काळ कारवाई करावी.भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींची पाहणी करून त्यांचे योग्य वर्गीकरण व नोंदणी करण्यासाठी तातडीने कारवाई करावी. तसेच बेळगाव विभागातील प्रलंबित शासकीय जमिनी व तलावांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी कठोर उपाययोजना राबवाव्यात. २७८० ए-१० जीयू-०२ए तसेच ८७२ए - ९जीयू-११ए या जमिनींवरील अतिक्रमण तात्काळ हटविण्याचा आदेशही त्यांनी दिला.

ग्रामपंचायती आणि ग्रामप्रशासक यांनी टॅगिंग प्रक्रियेत जोडण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. महसूल न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करून नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने सक्रिय भूमिका बजावावी. पाणीटंचाई निवारण, जनगणना, ई-व्यवहार, जमिनींचे व्यवस्थापन आणि प्रलंबित प्रकरणांचा निपटारा या सर्व बाबींमध्ये प्रशासनाने अधिक जबाबदारीने, समन्वयाने आणि गतिमान पद्धतीने काम करण्याची सूचनाही जानकी यांनी दिली.

# आगामी निवडणुकीत जोल्ले दाम्पत्याच्या पाठिशी रहावे

## बाळासाहेब कदम; बेनाडी येथे रस्ता कामाचा शुभारंभ

कोगनोळी,ता.८(प्रतिनिधी)-

......................

**बेनाडी बिरोबा माळ ते हंचिनाळ-सुळकुड मुख्य रस्ता डांबरीकरण कामासाठी आमदार शशिकला जोल्ले व बेळगाव जिल्हा बँकेचे अध्यक्ष आण्णासाहेब जोल्ले यांच्या विशेष प्रयत्नातून ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.**

या कामाचा शुभारंभ हालसिद्धनाथ सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन एम.पी.पाटील, संचालक प्रकाश शिंदे, समित सासणे, पीएलडी बँकेचे संचालक कल्लाप्पा नाईक व मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व कुदळ मारुन करण्यात आला. तत्पूर्वी उपस्थित महिलांच्या हस्ते जेसीबी मशीन पूजन करण्यात आले.प्रारंभी अरुण जावीर यांनी स्वागत करुन जोल्ले दाम्पत्यानी बेनाडी गावामध्ये राबविलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी बोलताना ग्रामीण भाजपाध्यक्ष बाळासाहेब कदम म्हणाले, बेनाडी गावामध्ये आमदार शशिकला जोल्ले यांच्या निधीतून अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत.



**बेनाडी येथे रस्ता कामाचे उद्घाटन करताना हालशुगरचे चेअरमन एम.पी.पाटील शेजारी संचालक प्रकाश शिंदे, समित सासणे,कल्लाप्पा नाईक,बाळासाहेब कदम व मान्यवरह्न**

याशिवाय निपाणी मतदारसंघात त्यांनी भरीव निधी आणून मतदारसंघाचा चौफेर विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. येणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत आपण सर्वांनी एक दिलाने काम करुन जोल्ले दाम्पत्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे,असे त्यांनी सांगितले.याप्रसंगी ग्रामपंचायत अध्यक्ष सत्यापा हजारे, श्रीकांत बन्ने यांनीही आपल्या मनोगतातून जोल्ले दाम्पत्याच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी हालशुगरचे संचालक रमेश पाटील-खेमान्ना, आर.एल.चौगुले, आडी ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी अध्यक्ष बबन हवालदार, माजी ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब जनवाडे, जक्कापा हजारे, आप्पासो बन्ने, अनिल जिरगे, मायाप्पा बन्ने, सागर क्षीरसागर, अविनाश हजारे, जिल्हापंचायत अभियंता व्ही.बी.मोगले यांच्यासह भाजपा कार्यकर्ते,धनगर समाजबांधव व ग्रामस्थ उपस्थित होते.

# भोजवाडी येथे पाणंद रस्त्याचा शुभारंभ

बारवाड,ता.८(वार्ताहर)-

......................

**भोजवाडी-शिवापूरवाडी रस्त्यापासून ते सरकारी गड्ड्यापर्यंत असलेल्या पाणंद रस्त्यासाठी आमदार शशिकला जोल्ले व जिल्हा बँकेचे संचालक आण्णासाहेब जोल्ले यांनी आपल्या विशेष प्रयत्नाने पीआरइडी खात्यामार्फत ३० लाखाचा निधी मंजूर केला असून या निधीतून या पाणंद रस्ता कामाचा शुभारंभ करण्यात आला.**

प्रारंभी निपाणी ग्रामीण भाजप अध्यक्ष बाळासाहेब कदम यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.त्यानंतर हालशुगर संचालक श्रीकांत बन्ने, विनोद संकपाळ, शिवगोंडा पाटील, शेतकरी संघटना अध्यक्ष रमेश पाटील, अशोक कमते, संजय तोडकर, चंद्रकांत बाबर, लक्ष्मण पाटील आदींच्या हस्ते श्रीफळ वाढवून व मलगोंडा पाटील, प्रकाश परीट, प्रशांत मगदूम आणि मान्यवरांच्या हस्ते कुदळ मारून शुभारंभ करण्यात आला.



**पाणंद रस्त्याच्या शुभारंभप्रसंगी बाळासाहेब कदम व इतर मान्यवर.**

यावेळी बाळासाहेब कदम म्हणाले की, भोज,भोजवाडी येथील शेतकरी वर्गासाठी खडकोळ धरणापासून महत्वाचा असलेल्या पाणंद रस्त्यासाठी आम. शशिकला जोल्ले व आण्णासाहेब जोल्ले यांनी ३० लाखाचा निधी मंजूर करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करून या परिसरातील शेतकऱ्यांना होणारी अडचण दूर केली आहे.यावेळी श्रीकांत बन्ने यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी प्रकाश परीट, विजय कमते, दादा मुराबट्टे, महादेव कमते, रविंद्र परीट, दादा तोडकर, भरत गुरव, रामू कमते, रामा कडोले, जग्गू कमते, कुमार मतिवाडे, शेकाप्पा बेटगिरी यांच्यासह भोज,भोजवाडी येथील भाजप कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# निपाणीत 'ब्लॅक स्पॉट'उपक्रमातून स्वच्छतेचा संदेश

## स्वच्छ भारत मिशनला बळ

निपाणी,ता.८(प्रतिनिधी)-

......................

**देशभर राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ भारत मिशन या महत्त्वाकांक्षी अभियानाचा उद्देश स्वच्छता, आरोग्य आणि नागरिकांचा सहभाग वाढवणे हा आहे. उघड्यावर शौचमुक्त भारत, कचरा व्यवस्थापन आणि जनजागृती या माध्यमातून स्वच्छ व सुंदर परिसर निर्माण करण्यावर या अभियानात भर दिला जातो.**

याच पार्श्वभूमीवर निपाणी नगरपालिकेकडून शहर स्वच्छ व आकर्षक ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असून,



**निपाणीः स्वच्छ भारत अभियानप्रसंगी पालिका अधिकारी.**

त्याअंतर्गत शहरातील अस्वच्छ ठिकाणी 'ब्लॅक स्पॉट' विकसित करण्यात आले आहेत.

या ठिकाणी भिंतींवर आकर्षक चित्रकला साकारून स्वच्छतेचा संदेश दिला जात आहे. या चित्रांमधून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात येत असून, संबंधित ठिकाणी कोणत्याही प्रकारचा कचरा टाकू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी आरोग्य अधिकारी विनायक जाधव, नियाज नालबंद, महादेव चचडी, जितेंद्र जासूद, अविनाश माळगे, इंद्रजीत बगाडे, चिंतामणी मुक्तारे, सदानंद चचडी, हिम्मत सिंग राजपूत,लहू मधाळे, शिवानंद कांबळे तसेच एसबीएमचे पदाधिकारी, सौ.ज्योती पोळ, दिपाली मोहिते, रूपाली जासूद, सुषमा राजपूत, प्रियांका नाईक, स्नेहल किनेकर, रेणुका धारवाडकर पालिका सफाई कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

**भित्तीचित्रांच्या माध्यमातून जनजागृती-गुड्डन्नावर**

निपाणी नगरपालिकेचे पर्यावरण अभियंता चंद्रकांत गुड्डन्नावर यांनी सांगितले की, शहरातील अस्वच्छ भागांची ओळख करून त्यांना 'ब्लॅक स्पॉट' म्हणून विकसित केले जात आहे. भित्तीचित्रांच्या माध्यमातून जनजागृती करून नागरिकांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'स्वच्छ परिसर, सुंदर परिसर' हे स्वप्न साकार करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. शहरात कुठेही कचऱ्याचे साम्राज्य निर्माण होऊ नये, यासाठी नगरपालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## संकेश्वरात निबंध लेखन स्पर्धेला प्रतिसाद

संकेश्वर,ता.८(प्रतिनिधी)-

......................

**भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त गौतम कन्नड शाळेत आयोजित निबंध लेखन स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला.**

येथील डॉ.बी. आर. आंबेडकर सर्कल भिम नगर आणि श्रीमती गोदाबाई गोविंद कर्निंग मेमोरियल प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत २७७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.श्रीमती गोदाबाई गोविंद कर्निंग मेमोरियल फौंडेशनचे मार्गदर्शक नवीन गंगरेड्डी यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी श्रीमती तारा,नागराज कर्निंग, प्रविण कर्निंग, अमित माळगे, अप्पासाहेब दोड्डलिंग, राघवेंद्र जयकर, बसवंत सत्यनाईक, सुनील खातेदार व मान्यवर उपस्थित होते.

## || थोडक्यात

### रंगराव बन्ने यांना पुरस्कार जाहीर

निपाणी,ता.८(प्रतिनिधी)-

......................

**बारवाड येथील सुपुत्र,पत्रकार व साहित्यिक रंगराव बन्ने यांना ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी.फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित राष्ट्रीय पातळीवरील ' महाराष्ट्र साई पद्मश्री' हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला असल्याचे पत्र ओम साई विकास प्रतिष्ठान बी.बी. सी.फिल्म प्रोडक्शनचे अध्यक्ष सुदाम संसारे शिर्डी यांनी पत्राद्वारे कळविले आहे.**



हा पुरस्कार येत्या २ मे रोजी शिर्डी येथे परिवार लॉन्स, बॅंकेट हॉल, न्यू रिंग रोड सिटी मार्केट शेजारी सिने कलावंत तसेच अन्य मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.तरी या भव्य दिव्य पुरस्कार सोहळ्याचे लाईव्ह प्रसारण करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

### निपाणीत रविवारी शिवकालीन शस्त्र प्रदर्शन

निपाणी,ता.८(प्रतिनिधी)-

......................

**निपाणीसह सीमा भागातील समस्त धारपवार परिवारातील बंधू-भगिनींचा एकत्रीकरण बैठक व परिचय मेळावा रविवार ता.१२ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता वाल्मिकी भवन साखरवाडी निपाणी येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती मुख्य प्रवर्तक डॉ.भालचंद्र पवार व गोविंदराव पवार यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. या कार्यक्रमात परिचय चर्चा मनोगत व शिवकालीन शस्त्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.**

निपाणी शहरासह सीमाभागातील धारपवार परिवाराचे एकत्रीकरण करण्याच्या उद्देशाने श्रीमंतराजे पवार घराणे सामाजिक प्रतिष्ठानतर्फे परिचय चर्चा मनोगत व शिवकालीन शस्त्र प्रदर्शन असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमंत राजेपवार घराणे सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्रचे अध्यक्ष सागरदादा पवार हे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून बेळगावचे माजी महापौर मंगेश पवार हे उपस्थित राहणार आहेत.शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन श्रीमंत दादाराजे देसाई-निंबाळकर सरकार यांच्या हस्ते होणार आहे.कार्यक्रमास कोल्हापूर शिवसेना उपनेते संजय पवार, पुरातन आणि शास्त्र शत्र संग्रह व अभ्यासक अमरसिंह पाटील धारपवार उपस्थित राहणार आहेत. शस्त्र प्रदर्शन नामदेव भवन साखरवाडी येथे तर स्नेहमेळावा वाल्मिकी भवन साखरवाडी निपाणी येथे होणार आहे.तरी समस्त धारपवार घराण्यातील समस्त बंधू-भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ.भालचंद्र पवार व गोविंदराव पवार यांनी केले आहे.

### बेडकिहाळात १२ रोजी ढोल वादन स्पर्धा

बेडकिहाळ,ता.८(वार्ताहर)-

......................

**येथे १२ व १३ रोजी मलकारसिद्ध व महालक्ष्मी यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्ताने १२ रोजी दुपारी दोन वाजता सिद्धेश्वर मंदिरमध्ये भव्य ढोल वादन स्पर्धा होणार आहेत.**

यासाठी अनुक्रमे ११०००, ७०००, ५०००, ४०००, ३००० अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत.तसेच यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.


# जय जिनेंद्र सौहार्द संघास १ कोटी २५ लाखाचा नफा-खोत

बेडकिहाळ,ता.८(वार्ताहर)-

......................

**शमनेवाडी येथील श्री जय जिनेंद्र सौहार्द सहकारी संघास आर्थिक वर्षात १ कोटी २५ लाखाचा निव्वळ नफा झाल्याची माहिती संघाचे अध्यक्ष बाबासाहेब खोत यांनी दिली.उपाध्यक्ष धनपाल धनापगोळ व संचालक मंडळाचे सदस्य यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीप्रसंगी स्वागत आर.बी खोत यांनी केले.**

पुढे माहिती देताना अध्यक्ष बाबासाहेब खोत म्हणाले, संघाचे १३७१ सभासद असून, शेअर भांडवल ५० लाख ८ हजार आहे,तर १० कोटी ७५ लाख निधी असून, गुंतवणूक १९ कोटी ४५ आहे.तर ठेवी ३३ कोटी १२ लाख आहे.तर संघाच्या वतीने १९ कोटी ८८ लाख रुपये कर्ज देण्यात आले आहे.संघाचे खेळते भांडवल ४७ कोटी ५० लाख असून,संघास आर्थिक वर्षात १ कोटी २५ लाख रुपये निव्वळ नफा झाला असून,९२ टक्के कर्ज वसुली प्रमाण आहे. तर वार्षिक उलाढाल १७७ कोटी झाली आहे.यावेळी संचालक मंडळाचे सदस्य उदयकुमार तपकिरे, तात्यासाहेब खोत, आप्पासाहेब गाडवे, चंद्रकांत मुन्नोळे, कुमार बोणे, दीपक खोत, सुनील नारे, आदित्य खोत, सतीश सोनवणे, शकुंतला खोत, देवकी आदींसह व्यवस्थापक कुमार गाढवे यांच्यासह इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.संचालक पार्श्वनाथ नारे यांनी आभार मानले.



**बेडकिहाळःपत्रकार बैठकीत माहिती देताना बाबासाहेब खोत, बाजूला धनपाल धनापगोळ व संचालक मंडळ.**

# अलाटवाडीत विशेष मार्गदर्शन शिबीर संपन्न

पट्टणकोडोली,ता.८(प्रतिनिधी)-

......................

**कोल्हापूर येथील पद्मिनी येशुवा फाऊंडेशनतर्फे अलाटवाडी (ता.हातकणंगले) येथे तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण भागातील नागरिक आणि विद्यार्थ्यांनी सुरक्षित राहून प्रगती करावी या उद्देशाने एआय तंत्रज्ञानाचा वापर आणि सायबर सुरक्षा या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिर पार पडले. या उपक्रमात युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.**

यावेळी क्षितिजा उबाळे, पृथ्वीराज पोवार व अनोश कामत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एआय हा २४ तास उपलब्ध असणारा शिक्षक कसा ठरु शकतो. तसेच चॅटबॉटच्या माध्यमातून कठीण शैक्षणिक संकल्पना मराठीत कशा समजून घ्याव्यात याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. करिअरच्या संधी आणि प्रभावी रेझ्युमे निर्मितीवरही यावेळी चर्चा झाली.



**अलाटवाडी येथे मार्गदर्शन करताना पद्मिनी येशुवा फाऊंडेशनच्या क्षितिजा उबाळे समोर उपस्थित महिला,युवक व नागरिक.**

वाढत्या सायबर गुन्ह्यांवर भाष्य करताना मार्गदर्शकांनी फिशिंग, ऑनलाईन टास्क स्कॅम आणि लोन ॲप फ्रॉड यापासून सावध राहण्याचे आवाहन केले. सायबर क्राईमपासून वाचण्यासाठी आपला ओटीपी कधीही कोणाला सांगू नये, अनोळखी लिंकवर क्लिक करु नये आणि सोशल मीडियासाठी टू-फॅक्टर ऑथेंटिकेशनचा वापर करावा, असे महत्त्वपूर्ण कानमंत्र देण्यात आले. फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. डिजिटल साक्षरता आणि नैतिकतेने तंत्रज्ञानाचा वापर केल्यास ग्रामीण भागाचा कायापालट होईल असा विश्वासही मार्गदर्शकांनी व्यक्त केला.

# समाधान हीच निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली-डॉ.तारळकर

## गारगोटी उपजिल्हा रुग्णालयात जागतिक आरोग्य दिन साजरा

गारगोटी,ता.८(प्रतिनिधी)-

......................

**सकस आहार,मानसिक सकारात्मकता, आवश्यक तितके श्रम, योग्य झोप, पुरेशी झोप, आनंदाने केलेले काम, आणि समाधान हीच निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली आहे,असे मत गारगोटी उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका डॉ पल्लवी तारळकर यांनी व्यक्त केले. उपजिल्हा रुग्णालय गारगोटी येथे जागतिक आरोग्य दिन उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमात डॉ.तारळकर बोलत होत्या.**

डॉ. पल्लवी तारळकर यांनी शारीरिक, मानसिक आरोग्य यावर मार्गदर्शन केले. निरोगी राहण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या उपजिल्हा रुग्णालयातील सर्व सोयीसुविधांचा लाभ सर्वांनी घ्यावा,असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तसेच ग्रामीण जनतेला एकंदरीत दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने सुरु झालेल्या 'माझं गाव,आरोग्यसंपन्न गाव 'या महत्वाकांक्षी प्रकल्पाबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली.



**गारगोटी उपजिल्हा रुग्णालयात जागतिक आरोग्य दिनी मार्गदर्शन करताना डॉ. पल्लवी तारळकर,बाजूस डॉ.स्नेहल कुलकर्णी,डॉ.सविता शेट्टी,डॉ.वृषाली खोत आदी.**

प्रास्ताविक आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ.स्नेहल कुलकर्णी यांनी केले. दंतरोगचिकित्सक डॉ. वृषाली खोत यांनी शारीरिक, मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी आवश्यक जीवनपद्धती यावर मार्गदर्शन केले तसेच त्यांनी मौखिक आरोग्याविषयी उत्तम माहिती दिली. आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ. सविता शेट्टी यांनी मानसिक आरोग्य आणि सकारात्मक जीवनपद्धती याविषयी मार्गदर्शन केले.

वैद्यकीय अधिकारी डॉ. पद्मसिंह पाटील यांनी महिलांमधील रक्तक्षय आणि त्यावरील उपाययोजना याविषयीची अत्यंत सूक्ष्म निरीक्षणे नोंदवत महिलांना आरोग्यपूर्ण आयुष्यासाठी महत्वाच्या टिप्स दिल्या. 'टी. बी. हारेगा देश जितेगा',असा नारा देत रुपाली पाटील यांनी टी. बी. आजाराची व त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांची सविस्तर माहिती दिली.सध्या सुरु असलेल्या टी. बी. मुक्त भारत अभियान १०० दिवस मोहीम या अंतर्गत त्यांनी १४ वर्षावरील सर्व व्यक्तींची टी.बी.साठी तपासणी करुन घेण्याचे आवाहन केले तसेच सर्व उपस्थितांना टी. बी. मुक्ततेची शपथ दिली.या कार्यक्रमाच्या निमित्ताने रुग्णालयातील दाखल सर्व रुग्णांना दंतचिकित्सा विभागामार्फत ओरल हाय झीन किटचे वाटप करण्यात आले.डॉ. सविता शेट्टी यांनी आभार मानले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सूरज पेडणेकर यांच्यासह गारगोटी उपजिल्हा रुग्णालयाचा सर्व स्टाफ उपस्थित होता.

## ढोणेवाडीत रविवारी हिंदू संमेलन

ढोणेवाडी,ता.८(प्रतिनिधी)-

......................

**ढोणेवाडी (ता. निपाणी) येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने येत्या रविवार, ता. १२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता बसवेश्वर चौक येथे भव्य विराट हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून प्रखर राष्ट्रवादावर आधारित व्याख्यान आणि रणरागिणींचे प्रात्यक्षिके होणार आहेत.**

हिंदू धर्म आणि राष्ट्राप्रती आपले कर्तव्य बजावण्यासाठी सर्व बांधवांनी मोठ्या संख्येने संघटित व्हावे, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी ओंकार बंकापुरे, ओंकार माळगे, रावसाहेब माळी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नवीन आखणीच्या शक्तीपीठ महामार्गालाही विरोध-शेट्टी

सांगली,ता.८ (प्रतिनिधी )-

**शक्तीपीठ विरोधात आंदोलन उभारून सांगली परिसरातून हा महामार्ग पिटाळण्यात यशस्वी झालो आहोत. नवीन आखणीतूनही हा महामार्ग होऊ देणार नाही, असा इशारा स्वाभिमानीचे नेते राजू शेट्टी यांनी बुधवारी सांगलीत पत्रकारांशी बोलताना दिला आहे.**

स्वाभिमानी कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. संघटनेचे संदीप राजोबा यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. शेट्टी म्हणाले, पुर्वीचा शक्तीपीठ १२ जिल्ह्यातून होता. त्यात आता साताऱ्यांची भर पडली. हा महामार्गच अव्यवहार्य असून, या प्रकल्पातून तब्बल ७० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होण्याची शक्यता आहे. या महामार्गामुळे शिराळा तालुक्यात पुन्हा पूरस्थिती निर्माण होऊ शकते. धार्मिक कारण पुढे करून रस्त्यांच्या कामातून पैसे कमावणे हा एकमेव उद्देश आहे.शक्तीपीठच्या भरावामुळे सांगली परिसरातील महापूर टळला आहे. आता नव्या मार्गाने कराडपासून ते पाटणपर्यंतच्या गावांना महापुराचा फटका बसणार आहे.

नागपूर-गोवा प्रवासाचे उदाहरण देत महामार्गाच्या उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला ते म्हणाले,' नागपूर ते गोवा विमानाचे तिकीट साडेतीन हजारात आणि प्रवास दोन तासात होते. पण कारने गेल्यास केवळ डिझेलवर ११ हजार रुपये खर्चुन आठ तास महामार्गावरून का जाईल? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एका उद्योगपतीच्या खनिज वाहतुकीसाठी महाराष्ट्रातील जनतेला वेठीस धरण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

### कर्जमाफीचा गरजूंना लाभ नाही

**राज्य सरकारने दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जमाफीची घोषणा केली असली,तरी त्याचा लाभ खऱ्या अर्थाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार नाही. यावर्षी पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीपाचे मोठे नुकसान झाले. त्या काळात अनेक शेतकऱ्यांनी खरीप पिकांसाठी कर्ज काढले. त्यांना कर्जमाफीची सर्वाधिक गरज आहे. मात्र, या शेतकऱ्यांचे कर्ज थकीत नसल्याने ते कर्जमाफीच्या निकषात बसत नाहीत. मध्यम मुदतीत कर्जे घेणाऱ्यांनाही ती लागू करावी तसेच नियमित कर्ज भरणाऱ्यांना दीड लाख प्रोत्साहन अनुदान द्यावे असेही शेट्टी म्हणाले.**

## बुध्द गार्डन येथे झालेल्या अवैध वृक्षतोडी संदर्भात

# संबंधित ठेकेदारावर गुन्हा नोंद करा; हिंदू विधीज्ञ परिषदेची मागणी

कोल्हापूर,ता.८ (प्रतिनिधी)-

**केएमटी वर्कशॉप येथे 'इलेक्ट्रिक बस'साठी 'चार्जिंग केंद्र' बनवण्यासाठी महापालिकेची अनुमती न घेता वृक्षतोड करण्यात आली. वृक्ष तोडतांना ठेकेदाराने ८३० झाडे लावणे अपेक्षित असतांना त्यापैकी एकही झाड लावलेले नाही, तसेच अनामत रक्कम प्रत्येक वृक्षासाठी ५००० रुपये प्रमाणे ४ लाख १५ सहस्र रुपये जमा करणे अपेक्षित असतांना ती भरली नाही. तरी या प्रकरणी संबंधित ठेकेदारावर गुन्हा नोंद करावा, अशा मागणीचे निवेदन हिंदू विधीज्ञ परिषदेच्या वतीने कोल्हापूर महापालिकेच्या महापौर सौ. रूपाराणी निकम आणि महापालिका आयुक्त राजेंद्र भारुड यांना दिले. निवेदन स्वीकारल्यावर दोघांनीही या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.**

या प्रसंगी अधिवक्ता समीर पटवर्धन,अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर,अधिवक्ता प्रीती पाटील, अधिवक्ता प्रदीप पुजारी, बाबासाहेब भोपळे उपस्थित होते.या संदर्भात महापौरांना अधिक माहिती देतांना अधिवक्ता समीर पटवर्धन म्हणाले,सदरची घटना वृक्षतोड प्राधिकरण समिती सदस्य उदय गायकवाड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना लक्षात आणून दिल्यावर तत्कालीन प्रशासकांनी कारवाईच्या अनुषंगाने नोटीसेस देण्याचे आदेश दिले असे इतिवृतात लिहिले आहे. यात कार्योत्तर संमतीमध्ये अवैध वृक्षतोड असल्याने भरपाई करून घेण्याचे आदेशही दिले होते. या प्रकरणी पोलीस स्थानकात गुन्हा नोंद करणे अपेक्षित असतांना तो केलेला नाही. तरी या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा नोंद करण्यासमवेत ८३० झाडे ज्या ठेकेदाराकडून लावून घेणे अपेक्षित आहे. त्याचा पाठपुरावा करावा. संबंधित वृक्ष अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.या संदर्भात बाबासाहेब भोपळे म्हणाले, अशी वृक्षतोड सामान्य नागरिकाने केल्यास महापालिका प्रशासन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करते. याउलट या प्रकरणी १ वर्ष उलटूनही संबंधित ठेकेदारावर महापालिकेने कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे सामान्य नागरिकाला एक न्याय आणि ठेकेदार, तसेच संबंधित महापालिका अधिकारी यांच्यासाठी वेगळा न्याय का ? या संदर्भात योग्य ती चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन महापौरांनी दिले.

# जिल्हा न्यायालयात आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

कोल्हापूर,ता.८ (प्रतिनिधी)

**जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे मंगळवारी ता.७ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा न्यायालय, जिल्हा बार असोसिएशन व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले.**

शिबिराचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती कविता अग्रवाल यांच्या हस्ते झाले. या उपक्रमात न्यायालयीन अधिकारी, वकील, जिल्हा सरकारी अभियोक्ता कार्यालयातील कर्मचारी, कौटुंबिक न्यायालयातील कर्मचारी तसेच न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आरोग्य तपासणी करून घेतली.शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, ईसीजी, नेत्रतपासणी, किडनी तपासणी आदींची विनामूल्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी हृदयविकार, संतुलित आहार व तणाव नियंत्रण याबाबत मार्गदर्शन केले. न्यायालयीन कामकाजाच्या धावपळीत आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला.या वेळी जिल्हा न्यायाधीश क. १ श्रीमती आर. व्ही. अदोने, विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती दिपाली डोईफोडे, बार असो.चे अध्यक्ष व्ही. आर. पाटील व पदाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर, अधिकारी राजेश मदने, महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पुलकीत खंबायते, सेवा रुग्णालयाचे डॉ. मनीष पाटील, प्रभारी प्रबंधक श्रीकांत संकपाळ तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

## महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त शेकापच्यावतीने शनिवारी व्याख्यान

कोल्हापूर,ता.८ (प्रतिनिधी)-

**महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त शेतकरी कामगार पक्ष आणि श्री शाहू सत्यशोधक समाज यांच्या वतीने शनिवार दिनांक ११ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता शेतकरी कामगार पक्ष शहर कार्यालयात व्याख्यान आयोजित केले आहे.**

या कार्यक्रमाचे वक्ते प्रा. अरुण शिंदे असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य जी. पी. माळी हे भूषवणार आहेत तरी या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन शेकापचे शहर चिटणीस भाई बाबुराव कदम यांना केले आहे.

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. ३२५ पैकी क्षेत्र - १८५-० चौ. मी. खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - सदर गट नं.ची शिल्लक मिळकत, पश्चिमेस - १० फुट रस्ता, दक्षिणेस-२० फुट रस्ता, उत्तरेस- अनुसे यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही दिपाली अनिल धनवडे, विशाल कबीर भडकुंबे, जयश्री कबीर भडकुंबे व स्वप्निल कबीर भडकुंबे रा. कोरोची यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.म्हणुन दिली नोटीस सही ता.०८/०४/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**

पत्ता- गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी, मो.७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मौजे शहापूर येथील गट नं. ११३ याचा सि.स.नं. १८८२९/७ चे क्षेत्र १४९.९५ चौ.मी. ची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा- पुर्वेस - प्लॉट नं. ८, पश्चिमेस - प्लॉट नं. ६ दक्षिणेस - गट नं. ११४, उत्तरेस- रस्ता, सदरची मिळकत ही श्री. सौरभ कुंदन शिंदे व स्वप्निल कुंदन शिंदे रा. टाकवडे यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात दि. इचलकरंजी मर्चंट्स को ऑप बँक इचलकरंजी या बँकेव्यतिरिक्त कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता ०७/०४/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मोबा.नं.९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे यड्राव येथील गट नंबर ७१ / ३ पैकी क्षेत्र हे ०.२३.५० आर ची शेत जमिन ची मिळकत यासि चतुः सिमा-पुर्वेस - श्री. चवगोंडा व श्री. महावीर पाटील यांची मिळकत, पश्चिमेस - १०० फुट रुंदीचा पार्वती इंडस्ट्रीयल इस्टेट मधील रस्ता. दक्षिणेस - श्री. पाटील यांची मिळकत व त्या पलीकडे श्रीकांत मंत्री यांची मिळकत, उत्तरेस- पार्वती इंडस्ट्रीयल इस्टेट यांची मिळकत. सदरची मिळकत श्री. प्रकाश आण्णासो ऐतवडे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. ०७/०४/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मोबा.नं.९४२०७७६४८६

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

१) ता. हातकणंगले पैकी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील इचलकरंजी येथील रि.स.नं.६४८ याचा सि. स.नं. १७५५८/२२, एकुण क्षेत्र १९०.९५ चौ. मी . म्हणजेच २०५४.६२ चौ. फुटाची खुली मिळकत यांसी चतु:सिमा पुर्वेस :- ६.०९ मीटर रूंदीचा रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट नं. २३ ची मिळकत दक्षिणेस :- प्लॉट नं. २१ ची मिळकत व उत्तरेस :- रि.स.नं. ६४९ पै ची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील खूली प्लॉट मिळकत. २) वरील मिळकत ही १. विजया चिदानंद कुरबिट्टे २. अरविंद चिदानंद कुरबिट्टे ३. सुजाता व्हिस्पी एडीबाम यांचे मालकी वहीवाटीची असून सदरील मिळकतीसंदर्भात त्यांनी आमच्या अशिलांशी संचकरारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क, करार, तारणगहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कागदपत्रासह कळवावे. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता.०८/०४/२०२६

**ॲड. पंकज आ. पाटील**

ऑफीस - श्री दत्त अपार्टमेंट, गाळा नं. १, सांगली नाका, इचलकरंजी मो. न. ९०२१२३७६८७

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नंबर ७४ पैकी नवीन लाटकर प्लॉट पैकी प्लॉट नंबर ए-२ चे क्षेत्र १५०० चौ.फुट ची मिळकत. यासी चतुः सिमा- पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - श्री रावण खोत यांची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नं. ए - १ मिळकत, उत्तरेस - प्लॉट नं. ए- ३ ची मिळकत. सदरची मिळकत ही श्री. संदिप दत्तात्रय कांबळे (लाटकर) रा. खोतवाडी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्री सागर चांगदेव पाटील रा. इचलकरंजी यांना करून दिलेले असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात आजरा अर्बन को. ऑप. बँक लि. आजरा शाखा कबनूर या बँकेव्यतिरिक्त कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही. ता. ०७/०४/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मोबा.नं.९४२०७७६४८६

# सुळगाव येथे आज गहिनीनाथ उरुसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

कोगनोळी,ता.८ (प्रतिनिधी)-

**सुळगाव (ता. निपाणी) येथे गहिनीनाथ उरुस गुरुवार दि. ९ आणि शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी साजरा होत असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

गुरुवार दि. ९ रोजी सकाळी ८ वाजता भव्य घोडागाडी शर्यत होणार असून यामध्ये जनरल घोडागाडी शर्यतीसाठी अनुक्रमे ५००० रुपये, ३००० रुपये, २००० रुपये, नवतर व हलका गट घोडागाडी शर्यतीसाठी अनुक्रमे ५००० रुपये, ३००० रुपये, २००० रुपये, एक्का घोडागाडी शर्यतीसाठी अनुक्रमे ४००० रुपये, ३००० रुपये, २००० रुपये, आदत घोडा-बैल शर्यतीसाठी अनुक्रमे ५००० रुपये, ३००० रुपये, २००० रुपये व ढाल अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.दुपारी ३ वाजता हातात कासरा धरुन बैल पळविणे स्पर्धा आयोजित केल्या असून विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे १५०१ रुपये, १००१ रुपये, ८०१ रुपये व ढाल असे बक्षिस देण्यात येणार आहे.रात्री ८ वाजता गंध चढविणे आणि ९ वाजता महाराष्ट्राची संस्कृती व लोककला जोपासणारा मराठमोळा नृत्याविष्कार हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवार दि. १० रोजी सकाळी ८ वाजता रिव्हर्स ट्रॅक्टर स्पर्धा घेण्यात येणार असून यासाठी अनुक्रमे २००० रुपये, १५०० रुपये, १००० रुपये अशी बक्षिसे दिली जाणार आहेत.



# वडणग्याच्या अस्मिता लांडगेचे एमपीएससी परीक्षेत यश

कोल्हापूर,ता.८ (प्रतिनिधी)-

**करवीर तालुक्यातील वडणगे येथील सामान्य कुटुंबातील अस्मिता लांडगे हीने जिद्द आणि चिकाटीने सातत्यपूर्वक अभ्यास करुन महाराष्ट लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत कर सहाय्यक आणि मंत्रालय सहाय्यक या पदासाठी निवड झाली आहे, अस्मिताच्या यशाबद्दल डी.वाय.पाटील पॉलिटेक्नीकचे प्राचार्य डॉ. महादेव नरके यांनी तिचा सत्कार करुन तिला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

या यशाबद्दल अस्मिता लांडगे हिच्या चेहऱ्यावर प्रचंड आत्मविश्वास व आनंद दिसून आला. अस्मिताने खूप कष्ट घेतले असून जिद्द आणि चिकाटीने अभ्यास करुन स्पर्धा परिक्षांना सामोरे गेली. सातत्यपूर्ण अभ्यासामुळे तीला हे यश मिळाल्याचे वडील भगवान लांडगे यांनी सांगितले. अस्मिताचे यश हे सामान्य कुटुंबातील अनेक मुला मुलींना प्रेरणादायी ठरेल असा विश्वास प्राचार्य महादेव नरके यांनी व्यक्त केला.

## तीन गाई दगावल्या

शिराळा,ता.८(प्रतिनिधी)-

वाकुर्डे बुद्रूक पैकी पडवळवाडी (ता. शिराळा) येथे शेतकरी विष्णू जाधव व महादेव जाधव यांच्या गोठ्यातील ३ गाईंना तिवाना कंपनीच्या पशुखाद्य दिले व त्यातून विषबाधा होऊन तिन्ही गाईंचा मृत्यू झाला. जिल्हा परिषद श्री. विराज नाईक व यशवंत ग्लुकोजचे अध्यक्ष श्री. रणधीर नाईक यांनी भेट दिली.या वेळी पंचायत समिती सदस्य रवी आढाव व अन्य उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ७५६ पैकी क्षेत्र ९६६ चौ. फुट यासी चतु:सिमा- पुर्वेस - पूनम पाटील यांची मिळकत, पश्चिमेस - याच गटापैकी मिळकत, दक्षिणेस- रस्ता, उत्तरेस - गुंडाराम पाटील यांची मिळकत. सदर मिळकत ही श्री. विठ्ठल कोंडीबा सावंत रा. तारदाळ यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता ०७/०४/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मोबा.नं.९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

१. मिळकतीचे वर्णन - अ) जि. कोल्हापूर ता. शिरोळ पैकी मौजे मजरेवाडी येथील क.ग.नं.५० क्षेत्र ३ हे ३९ आर आकार रू. २९.०६ पै. पैकी क्षेत्र १ हे ७६ आर आकार रू. १५.०८ पै.

ब) जि. कोल्हापूर ता. शिरोळ पैकी मौजे मजरेवाडी येथील क.ग.नं. ५० क्षेत्र ३ हे ३९ आर आकार रू. २९.०६ पै. पैकी क्षेत्र ० हे ८० आर आकार रू. ६.८६ पै. अशी एकूण क्षेत्र २ हे ५६ आर ची संपुर्ण शेतजमिन यासी चतु:सिमा पुर्वेस-पट्टेकरी यांची मिळकत, पश्चिमेस - मोमीन यांची मिळकत, दक्षिणेस- पल्लखे व तोडकर यांची मिळकत व उत्तरेस - खराडे यांची मिळकत यातील तंदगभुत वस्तुसह व सर्व प्रकारच्या इजमेंटच्या हक्कासह.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत अ) ही श्री. अरूण आप्पासो डांगे व ब) ही मिळकत विवेक व ज्ञानेश अरूण डांगे रा. भैरववाडी, कुरुंदवाड यांच्या मालकीची असून त्यांनी सदर मिळकत ही आमच्या अशिलांना निर्वेध, निष्कर्जी व निर्जोखमी असलेचे सांगून खरेदी देण्याचे ठरवून संचकार रक्कम स्विकारली आहे.

३) सबब सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध तारण, गहाण, दान, बोजा, हिस्सा, वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात ७ दिवसांचे आत खालील पत्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी कळवावा. मुदतीनंतर कोणाचीही क़सलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस. ता. ३/४/२०२६.

**ॲड.संजय र. गजबी.**

नोटरी (भारत सरकार) ऑफिस - ७/७१, लक्ष्मी मार्केट, निवास - कमलकुंज, ८/१५२०/१/१, मधुबन हौ. सोसा. जवळ, इचलकरंजी. मो. बा. ९४२२०५१९८३.

## जाहीर इशारा वजा नोटीस

मयत बाबासो रूपा कांबळे तर्फे वारस संगीता बाबासो कांबळे आणि नियती बाबासो कांबळे पैकी संगीता बाबासो कांबळे तर्फे वटमुखत्यार श्री. संतोष अण्णासो पाटील रा. चिपरी यांनी दिले माहितीवरून, दाखविले कागदपत्रांवरून व दिले अधिकारावरून तमाम लोकांना या जाहीर नोटीसव्दारे कळविणेत येते की,

१) मिळकतीच वर्णन - जिल्हा-कोल्हापूर, तालुका हातकणंगले पैकी खोतवाडी येथील शेतजमीन गट नं. ५५, क्षेत्र हे. ३.४७.०० आर, आकार रू. ४.९५ पैसे यांपैकी क्षेत्र हे.१.१३.६६ आर, आकार रु. १ =६२ पैसे ची मिळकत

२) वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत इचलकरंजी येथील सि.ज.ज्यु.डी. यांचे कोर्टात रे. दि. नं. २४/२०१५ चा दावा प्रलंबीत आहे. सदरचा दावा वाटपासाठी दाखल केलेले असून तो प्रलंबीत आहे. तसेच रे. दि.मु.नं. ३०६/२०१६ रे.दि.मु.नं. ४४/२०१७ तसेच रे. दि.मु.नं. १२२ / २०२२ असे वेगवेगळे दावे प्रलंबीत आहेत. प्रस्तुत कामी मे. कोर्टाने दावा मिळकतीवर नमुद मिळकतीवर आहे तशी परिस्थिती ठेवणेबाबत आदेश केलेला आहे. त्यामध्ये कोणताही खरेदी विक्री व्यवहार कोणताही अन्य स्वरूपाचा करार करू नये असा आदेश केलेला आहे.

३) अद्याप सदर मिळकतीमध्ये कोणत्याही हिस्सेदाराचे हिस्से अद्याप ठरलेले नाहीत तसेच सर्व वारसांची नावे नोंदवलेली नाहीत, यावरून मे. कोर्टात वाद प्रलंबित आहे.

४) अशी परिस्थिती असताना निकेत बाबासो कांबळे, अक्काताई उर्फ कोकीळा बाबासो कांबळे, निलिमा बाबासो कांबळे हे त्यांचे नावे नमूद क्षेत्र हे.१.१३.६६ आर या मिळकतीची विक्री करणेचा व लोकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरी जाहीर नोटीसीने सर्वांना कळविणेत येते की सदर जमीनींच्या बाबत कोणत्याही प्रकारचा करार, खरेदी विक्रीचा व्यवहार, गहाण, तारण, अशा प्रकारचे व्यवहार करू नये. तरी वरील सर्व नमुद वर्णनाच्या मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा वारसा हक्क हितसंबंध असून आमचे अशिलांचे संमतीशिवाय व मे. कोर्टाचे परवानगीशिवाय कोणीही, कोणत्याही प्रकारचे व्यवहार करू नयेत, केलेस ते आमचे अशिलांचे मिळकती मधील हक्क व अधिकारावर बंधनकारक राहणार नाहीत, तरी कोणाची फसगत होवू नये दिली जाहीर नोटीस वजा इशारा सही ता.८/०४/२०२६.

**ॲड.वैभव आर.पवार**

फ्लॅट नं.९,गणेश भवन जवळ रामजानकी हॉल नदीवेस रोड, इचलकरंजी-४१६११५, जिल्हा कोल्हापूर मो.नं.९९६०२३९६९६

# जाहीर नोटीस

तमाम लोकांना विषेश करून यड्राव ता. शिरोळ, जि. कोल्हापूर गावचे हद्दीतील व परीसरातील पंचक्रोशीतील लोकांना तसेच सहकारी संस्था, पतसंस्था, बँका, वित्तीय संस्था, खाजगी वित्तीय संस्था यांना आमचे अशिल १) श्री. राजेंद्र तातोबा मुळीक, २) श्री. अरूण नामदेव मोरे, ३) श्री. विश्वजित विनोद माने, ४) श्री. गजानन बसलिंगाप्पा अडीमणी, ५) श्री. किशोर तानाजी हसबे सर्व रा. संभाजी कॉलनी टिंबर एरीया, सांगली प्रस्तुत जाहीर नोटीसीने कळवू इच्छीतात ते खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा तुकडी कोल्हापूर तालुका व पोट शिरोळ पैकी यड्राव गावचे हद्दीतील बागायत शेतजमिन भुमापन क्र./गट नं. ७५ याचे एकूण क्षेत्र हे. ८-९१ आर अधिक पो.ख. हे. ०-३३ आर एकूण क्षेत्र हे. ९-२४ आर, आकार रू. १६-०० पैसे या पुरा हिस्से नंबरातील हे. ०-४१.३४ आर क्षेत्राची जमीन मिळकत यासी चतु:सिमा:-पूर्वेस :- रस्ता, दक्षिणेस :- गट नं. ६३ ची मिळकत, पश्चिमेस :- गट नं. ७१, ७३, ७०, व ५४ च्या मिळकती, उत्तरेस :- गट नं. ७६ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेतजमिन मिळकत तदंगभूत वस्तूंसह व जाणे येणेच्या व सर्व प्रकारचे इजमेंटचे हक्क अधिकारांसहची मिळकत. सदर मिळकतीचे करारपत्रावरून खरेदीपत्र होवून मिळण्याकरीता आमचे अशिलांनी जयसिंगपूर येथिल मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तरसाो यांचे न्यायालयात स्पे.दि.मु.नं. १८/२०१५ चा दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दि. २६/०७/२०१९ रोजी गुणदोषावर निकाली होवून दावा मे. न्यायालयाने मंजूर केला असून वर नमूद मिळकतीबाबत दाव्यातील प्रतिवादी नं. ३ श्री. अभिजित राजेंद्र जेधे यांनी करून घेतलेले खरेदीपत्र हे आमचे अशिलांचे न्याय हक्कावर लागू व बंधनकारक नाही असा निकाल केला आहे. सदर मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिलांनी न्यायालयाचे आदेशानुसार कायदेशीर कारवाई सुरू केलेली आहे. आमचे अशिलांचे नुकतेच असे निदर्शनास आले आहे की, वर नमूद मिळकतीच्या सातबारा पत्रकी श्री. अभिजित राजेंद्र जेधे यांच्या नावाची पोकळ नोंदीच्या आधाराने ते वरील नमूद मिळकत त्रयस्थ इसमास तबदील करण्याच्या प्रयत्नात आहेत. मुळात स्पे.दि.मु.नं. १८/२०१५ चे कामी झालेल्या निकालपत्रानुसार श्री. अभिजित राजेंद्र जेधे यांना वरील नमूद मिळकतीबाबत कसलेही व्यवहार करण्याचे अधिकार शिल्लक नाहीत. तरी तमाम लोकांना, संस्था, सहकारी संस्था, सोसायट्या, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था, खाजगी वित्तीय संस्था, यांना या नोटीसीद्वारे सुचीत करणेत येते की, वरील नमूद मिळकतीसंदर्भात श्री. अभिजित राजेंद्र जेधे यांचे बरोबर कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउप्पर कोणीही तसे कोणतेही व्यवहार केल्यास ते सर्व व्यवहार हे बेकायदेशीर ठरणार असून आमचे अशिलांचे कायदेशीर हक्क अधिकारांवर बंधनकारक राहू शकत नाहीत. सदर व्यक्तीच्या कथनांना कोणीही बळी पडून वरील नमूद मिळकतीबाबत व्यवहार करू नयेत. कोणाचीही, कोणत्याही प्रकारे फसगत होऊ नये या सद्भावनेने आमचे अशिल प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत. म्हणून दिली जाहीर नोटीस.

सांगली

दिनांक :-०८/०४/२०२६

**ॲड.एच.आर पाटील**

ऑफिस - गुलमोहोर अपा., फ्लॅट नं. २, माळी थिएटरचौक, गुलमोहर कॉलनी, सांगली मोबाईल नं. ८०५५३४४७७१, ९४२२४११०८१

# अल्पसंख्याक दर्जा सोडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही

## ललित गांधी

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–



**अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या "जैन धर्म हा हिंदू संस्कृतीचा भाग आहे आणि त्याने अल्पसंख्याक दर्जा सोडण्याचा विचार करावा" या विधानावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.**

ललित गांधी म्हणाले, "हे विधान अज्ञानातून केलेले आहे किंवा एखाद्या ठरवून आखलेल्या भूमिकेचा भाग आहे. जैन धर्म हा भारतातील एक स्वतंत्र, प्राचीन आणि वैज्ञानिक तत्त्वज्ञान आहे.त्याचे स्वतःचे तीर्थंकर, स्वतःची तत्त्वमीमांसा आणि मोक्षपरंपरा आहे. आम्ही हिंदू संस्कृतीचे पालनकर्ते आहोत, परंतु शाखा किंवा उपशाखा नाही. धर्म आणि संस्कृती या पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत.

अल्पसंख्याक दर्जा हा कोणतीही भीक नसून आमचा घटनात्मक अधिकार आहे. तो आमच्या वेगळ्या ओळखीचा सन्मान आहे. हा दर्जा सोडणे म्हणजे स्वतःच्या अस्तित्वालाच नाकारणे होय. अशा कोणत्याही विचारसरणीला आम्ही सर्व स्तरांवर विरोध करू. राष्ट्रीय स्तरावर अल्पसंख्याक दर्जा मिळण्यापूर्वीच विविध राज्यांमध्ये सुमारे २५ वर्षांपूर्वी जैन समाजाला हा दर्जा मिळालेला होता. या दीर्घ काळात जैन धर्मपरंपरा आणि हिंदू संस्कृती यामध्ये कोणताही फरक पडलेला नाही.आमची सांस्कृतिक परंपरा जशी पूर्वी होती, तशीच आजही जपली जात आहे.जैन समाजातील अग्रणी न्याय विषारद व माजी राजदूत एल.एम.सिंघवी, खासदार वीरेंद्र हेगडे, माजी खासदार विजय दर्डा, माजी केंद्रीय मंत्री प्रदीप जैन (आदित्य), माजी मंत्री सुरेशदादा जैन, शांतीलाल मुथा, बाळ पाटील,माजी केंद्रीय मंत्री दिलीप गांधी, डी.ए.पाटील आदी विविध मान्यवरांच्या दीर्घ प्रयत्नांनंतर आणि संघर्षानंतर हा घटनात्मक अधिकार मिळवण्यात आला आहे. आर्थिक फायद्यांपेक्षा आमच्या अधिकारांचे आणि अस्तित्वाचे संरक्षण अधिक महत्त्वाचे आहे.

हा घटनात्मक अधिकार काढून घेण्याचा कोणताही प्रयत्न पूर्ण ताकदीने हाणून पाडला जाईल. हा दर्जा जैन समाजाच्या ऐक्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. श्री लोढा यांनी हे समजून घ्यावे की जैन समाज आता शांत बसणार नाही. त्यांचे विधान आमची एकता अधिक बळकट करेल.ललित गांधी यांनी सर्व जैन पंथांना एकत्र येऊन अशा प्रयत्नांना ठामपणे विरोध करण्याचे आवाहन केले आहे.

# टोपला विकास निधी कमी पडू देणार नाही

## - सोनाली सावंत

टोप,ता.८(प्रतिनिधी)–

**"टोप गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटीबद्ध असून, जरी सध्या सत्तेत नसलो तरी विकास निधी खेचून आणण्याची कुवत माझ्यात आहे. टोपच्या विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही," अशी ठाम ग्वाही नूतन कोल्हापूर जिल्हा परिषद सदस्या सौ. सोनाली सावंत यांनी दिली.**



टोप येथे नूतन पदाधिकाऱ्यांच्या सत्कारप्रसंगी जि.प.सदस्या सोनाली सावंत व इतर.

टोप येथे वारकरी संप्रदायामार्फत आयोजित नूतन पदाधिकाऱ्यांच्या सत्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.विविध मान्यवरांचा सत्कार सोहळ्यात विविध क्षेत्रांतील नूतन पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला.सौ.सोनाली सावंत यांचा सत्कार कलेश्वर महिला भजनी मंडळ यांच्या हस्ते करण्यात आला.

तसेच नूतन पंचायत समिती सदस्य मुकुंद पाटील, नूतन तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश पाटील, उपाध्यक्ष सचिन भोसले, उद्योजक उत्तम पाटील यांचाही गावातील ज्येष्ठ वारकरी प्रतिनिधींच्या हस्ते सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सर्व सत्कारमूर्तींनी तसेच विकास पाटील, संतोष पाटील आणि के. के.कुंभार यांनी वारकरी संप्रदायाचे आभार मानले.

यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले की, "टोप गावातील वारकरी संप्रदाय दरवर्षी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पारायण सोहळा आयोजित करतो. हा सोहळा म्हणजे गावाची आध्यात्मिक ओळख आहे. ही परंपरा अशीच अविरतपणे चालू ठेवावी, त्यासाठी आमचे नेहमीच सहकार्य लाभेल."या कार्यक्रमाला गावातील वारकरी मंडळी, भजनी मंडळाच्या महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ऑलिम्पियाड स्पर्धेत यश मिळविलेल्या साई स्कूलच्या विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक शिक्षक,शिक्षिका

# साई इंग्लिश स्कूलचे ऑलिम्पियाड स्पर्धेत यश

इचलकरंजी,ता.८–

**येथील साई शिक्षण संस्थेच्या साई इंग्लिश स्कूलच्या बालवाडी विभागाच्या विद्यार्थ्यांनी इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड स्पर्धा परिक्षेत उत्तुंग असे यश मिळविले.**

यामध्ये रिया, वैष्णवी, शिवांश, विराज यांनी नर्सरी विभागातून गोल्ड मेडल मिळविले. तर लहान गटातून कु. जैनब, अवेज, अन्वीत, त्रिशा, आरव, प्राप्ती, सारा यांनी गोल्ड मेडल मिळविले. मोठ्या गटातून कु. चिराग, रिया, राजवीर रेयांश यांनी गोल्ड मेडल मिळविले. तर अंशीका, इरा, वेदिका, परनीका यांनी ब्राँझ मेडल मिळविले. सदरच्या यशस्वी विद्यार्थ्यांना सौ.कांबळे, सौ.सातपुते, सौ.प्रियांका,सौ.स्नेहा यांचे मार्गदर्शन लाभले.तर प्रशालेचे मुख्याध्यापक आर.एन.आळतेकर, मिलिंद कांबळे यांचे प्रोत्साहन लाभले.

# मलिकवाड येथे अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

मलिकवाड,ता.८(वार्ताहर)–

**मलिकवाड येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मंगळवारपासून भक्तीभावाने अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ झाला. सकाळी ध्वज पूजनाने शुभारंभ करण्यात आला.**

प्रारंभी ध्वज पूजन करून वस्ताद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दादासो कोळी आणि पोपट पोवार यांच्या हस्ते हनुमान मंदिरात पूजा करण्यात आली. त्यानंतर आण्णासाहेब केरुरे आणि निवास करजगे यांच्या हस्ते मरगुबाई मंदिरात पुष्पहार अर्पण करण्यात आला.राजेंद्र पाटील, श्रीकांत सुतार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शुभारंभ करण्यात आला. विणा पूजन कृष्णा खोत, एम.बी.केरुरे, राजेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# पथदिवे सुरू करण्याबाबत आ.डॉ.अतुल भोसले यांचे निर्देश

कराड ,ता.८(प्रतिनिधी)–

**कराड येथील कृष्णा पुलावरील पथदिवे अनेक दिवसांपासून बंद असल्या कारणाने प्रवासी व वाहनधारकांना रात्रीच्या वेळी अंधारातून पुलावरून प्रवास करावा लागत आहे.**

पुलावरील पथदिव्यांचे वीज बिल पालिकेकडून भरले जाते. दरम्यान, पुलावरील पथदिव्यांना वीजपुरवठा करणारे विद्युत मीटर जळाल्याने गेल्या अनेक महिन्यांपासून पथदिवे बंद आहेत.याबाबत भाजपा आ.डॉ.अतुल भोसले यांनी पुलावरील पथदिव्याप्रश्नी लक्ष घालत थेट पालिकेस पत्र पाठवून मीटरची त्वरित दुरूस्ती करून दिवे सुरू करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश दिले आहेत.

# नांदणी सहकारी बँकेस ४ कोटी ९८ लाखाचा नफा

जयसिंगपूर,ता.८(प्रतिनिधी)

## चेअरमन अप्पासाहेब लट्ठे यांची माहिती

**शिरोळ तालुक्यातील प्रतिथयश नांदणी सहकारी बँक लिमिटेड नांदणी या बँकेच्या सन २०२५ –२६ सालच्या आर्थिक वर्षांमध्ये सर्व बाबींमध्ये भरघोस वाढ होत बँकेने प्रगतीची घोडदौड कायम राखत ३१ मार्च २०२६ अखेर बँकेने ४०० कोटी ठेवींचा टप्पा ओलांडला आहे व ४ कोटी ९८ लाखाचा ढोबळ नफा व निव्वळ नफा ३ कोटी ८३ लाख इतका मिळवत उच्चांक केला आहे तसेच बँकेने सतत शून्य टक्के एनपीएची परंपरा कायम राखली आहे.**



बँकेच्या दहा शाखा मधून अत्यंत धोरणात्मक निर्णय घेत या सर्वच बाबींमध्ये बँकेने प्रगती साधली असून ३१ मार्च अखेरीस बँकेचे भाग भांडवल १५ कोटी ३८ लाख झाले आहे.बँकेचा राखीव निधी २७ कोटी ६३ लाख इतका वाढला असून बँकेने विविध योजनेत १६५ कोटी ६६ लाखाची सुरक्षित गुंतवणूक केली आहे.बँकेने अहवाल सालात ६५७ कोटी ०८ लाख इतका मिश्र व्यवसाय केला आहे.सर्व सभासद,ठेवीदार,कर्जदार, कर्मचारी व संचालक मंडळ बँकेचे बोर्ड मॅनेजमेंट कमिटीचे विशेष सहकार्यातून बँकेने प्रगती साध्य केली आहे, अशी माहिती बँकेचे विद्यमान चेअरमन अप्पासाहेब लट्ठे,बँकेचे व्हाईस चेअरमन बाळकृष्ण देशपांडे व मुख्य कार्यकारी अधिकारी आर.पी.कसलकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

यावेळी बँकेचे विद्यमान संचालक सर्वश्री रमेश भुजगूडे, संजय वसवाडे,बापूसो नदाफ, सचिन लट्ठे, राजेंद्र खुळ, शितल देमापुरे,चंद्रकांत कोरुचे,सूर्यकांत कुरडे, दत्तात्रय मोहिते, संतोष कलकुटगी, महेश परीट,संतोष पाटील, मनोहर माळी,सीए विद्यासागर बस्तवाडे,ॲड. जयकुमार पोमाजी, संचालिका श्रीमती साधना कोळी,सौ.त्रिशला धुळा सावंत, बँकेचे व्यवस्थापन समितीचे चेअरमन ज्ञानेश्वर बुबणे, सर्व सदस्य, शाखा सल्लागार, सुलतान अपराध, रुस्तम मुजावर, सर्व ऑफिसर्स व शाखांचे शाखाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# मनुष्यरूपी देहाला चांगला परमार्थ हवा-तेजस घोरपडे

साके,ता.८(वार्ताहर)–

**मानवी जीवनात मनुष्यरूपी देहाला खऱ्या अर्थाने चांगल्या परमार्थाची जोड हवी. संतांच्या जीवनात स्वतःचा असा कोणताही वेगळा स्वार्थ नसतो, तर जगाचे कल्याण हाच त्यांचा खरा परमार्थ असतो.आजच्या काळात मानवाकडे माहिती खूप आहे, मात्र सत्ताधारित ज्ञान केवळ सद्‌गुरूच देऊ शकतात. हे ज्ञान म्हणजेच प्रत्यक्ष ईश्वरी ज्ञान होय,असे मार्गदर्शन ह.भ.प.तेजस घोरपडे (प्रचारक, सातारा) यांनी केले.**

साके (ता.कागल) येथे आयोजित करण्यात आलेल्या २३ व्या निरंकारी विशाल संत समागम सोहळ्यात ते मार्गदर्शन करत होते. या संत समागम सोहळ्याचे आयोजन संत निरंकारी मंडळ (रजि.दिल्ली), ब्रांच सिद्धनेर्ली अंतर्गत साके निरंकारी मंडळाच्यावतीने करण्यात आले होते. यावेळी विविध भक्तांनी आपल्या सुमधुरवाणीने भगवंत ज्ञानाची सेवा सादर केली. विजयजी मडगावकर यांनी ब्रह्मज्ञान प्राप्तीची ओळख करून दिली. या सत्संग सोहळ्याला पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी मोठी गर्दी केली होती.

# मुस्लिम प्रीमियर लीगची यशस्वी सांगता

दत्तवाड,ता.८(वार्ताहर) –

**शेर ए हिंद चषक २०२६ मुस्लिम प्रीमियर लीग पर्व ४ थे यशस्वीरित्या नुकतेच पार पडले..या स्पर्धेत एकूण ८ संघांनी सहभाग घेतला होता.अतिशय रोमांचक असे सर्व सामने झाले.विजेते पदासाठी भारत स्पोर्ट्स विरुद्ध ए. टी.वॉरियर्स या संघात अंतिम सामना झाला.यामध्ये ए.टी.वॉरियर्स विजेता तर भारत स्पोर्ट्स् उपविजेता ठरला.**

संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल मुस्ताक अपराध यांना मालिकावीर तसेच बेस्ट बॅटसमॅन तर अंतिम सामन्यात सामनावीर म्हणून समीर मुल्ला यांना विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.सहभागी संघांना सन्मानचिन्ह व विजेत्या संघाना विशेष ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

# महावितरणकडून 'इकॅमेक्स'मध्ये विद्युत सुरक्षेचा जागर

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

## केंद्रीय राज्यमंत्री नाईक यांच्याकडून कौतुक

**इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये 'इकॅमेक्स–२०२६' या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महावितरणच्या प्रदर्शनीला केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी भेट दिली व विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. त्यांचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी स्वागत केले व प्रदर्शनाबद्दल माहिती दिली.**



ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांचे स्वागत करताना राजेंद्र पवार.

गोरेगाव येथे 'इकॅमेक्स–२०२६'चे उद्‌घाटन केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते झाले. विद्युत कंत्राटदारांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून विद्युत क्षेत्राच्या माध्यमातून प्रगतीस हातभार लावावा असे आवाहन नाईक यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा क्षेत्रात राज्याने देशात मोठी आघाडी घेतली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी शाश्वत व स्वस्त विजेसाठी ऊर्जा परिवर्तनाचा रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठी गती दिली आहे.या तीन दिवसीय प्रदर्शनात महावितरणचे मुख्य अभियंता पंकज तगलपल्लेवार आणि विद्युत सुरक्षा मोहिमेचे समन्वयक डॉ. संतोष पाटणी यांनी विशेष सत्रात विद्युत सुरक्षेबाबत प्रबोधन केले. महावितरण प्रदर्शनीद्वारे अधीक्षक अभियंता संजय खंदारे, मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता जितेंद्र राठौर यांच्यासह अभियंता, अधिकाऱ्यांनी महावितरणच्या विविध योजना व विद्युत सुरक्षेसंदर्भात नागरिकांना माहिती दिली. यावेळी विशेष कार्य अधिकारी सुधन्वा पत्की (नवी दिल्ली), इकॅमचे अध्यक्ष देवांग ठाकूर, सरचिटणीस अमरनाथ पाटील आदींची उपस्थिती होती.

श्रीहरी
शुक्रवार, ता. ०३/०४/२०२६ पासून
दुपारी १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
वासना
जबदस्त रोमँटीक हिंदी चित्र
७ वा.
A
सेक्सी गर्लफ्रेंड
प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ३ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
स्कॅंडल सेक्स
A
फक्त प्रौढांसाठी
A

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
गर्दीचा ३ रा आठवडा
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 7 वाजल्यापासून सुरू राहील
book my show
पंचवटी वॉटसॲप ग्रुप
संपर्क : 9623150103
रोज ३ खेळ
* दुपारी १२ व ४ आणि रात्री ९ वा.




५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गुरुवार ता. १९पासून रोज ३ खेळ
११.१५ - ३.१५ - ७.१५ वा.
खास कमी केलेल्या दरात ति.दर रू. ५०




कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
गुरुवार ता.१९ पा
१२ वा., दुपारी ४ वा, रात्री ९ वा,
सुपरहिट फुल्ल ॲक्शन चित्रपट




गुरु
शुक्रवार ता.३ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ३ खेळ १२*४*९ वा.
फॅमिली गर्दीचा सुपरहिट्ट ३ रा आठवडा
आता खास कमी केलेल्या दरात




RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
book my show




" धुरंधर 2 : द रिव्हेंज " - हिंदी ( A )
09:30 AM, 10:45 AM, 12:00 PM, 02:00 PM
03:00 PM, 04:15 PM, 06:15 PM, 08:45 PM
10:00 PM, 10:30 PM
" सुपर डुपर " - मराठी ( U/A 16+ )
07:15 PM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेप्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11




धुरंधर २ (HIN) (A)
10.30am, 01.30, 03.00, 06.00, 07.30, 09.00, 10.30pm
सुपर डुपर (MAR) (U/A)
11.30am, 06.30pm
सखे गं साजणी (MAR) (U/A)
11.00am, 02.00pm
सुपर मारिओ गॅलेक्सी (3D) (HIN) (U)
04.30pm
आता पहा कोणताही शो फक्त 100 पासून पुढे

# सातारा शहरात क्रीडांगणाअभावी खेळाडूंची कुचंबणा

सातारा,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**सातारा शहराच्या वैभवशाली क्रीडा संस्कृतीची केवळ क्रीडांगणा अभावी वाताहत झाल्याचे चित्र पाहायला मिळते. साताऱ्यातील असंख्य खेळाडू क्रीडा सरावासाठी पुणे व अन्य शहरात जाऊन सराव करत आहेत.सातारा शहर व ग्रामीण भागात गुणी व होतकरू खेळाडू मोठ्या प्रमाणात असून त्यांना सरावासाठी क्रीडांगणच उपलब्ध होत नसल्याने त्यांची मोठी कुचंबणा होत आहे. चार मंत्र्यांचा जिल्हा म्हणून संपूर्ण राज्यभर ओळख असणाऱ्या सातारा शहरात सुसज्ज व अद्यावत क्रीडांगण नाही ही खरी तर नामुष्कीची बाब आहे.**

क्रीडा सरावासाठी खेळाडूंना पुणे व अन्य शहरांकडे धाव घ्यावी लागते यामुळे त्यांना शारीरिक,मानसिक व आर्थिक ताणाला सामोरे जावे लागत आहे. मन, मेंदू आणि मनगटाच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडांगणाकडे चला ही शासनाची भूमिका असताना मात्र साताऱ्यात या विषयाला



हरताळ फासला जात आहे. उपलब्ध क्रीडांगणाच्या जागेवर खासगी व्यावसायिक अकॅडमी वाल्यांनी कब्जा केल्याने व विविध शासकीय उपक्रमाचे सातत्याने सराव असल्याने खेळाडूंना सरावासाठी इतरत्र भटकंती करावी लागते ही दुर्दैवी बाब आहे. सातारा शहरात एकमेव शाहू स्टेडियम हे विकसित करताना या ठिकाणी खेळाडूंचा उत्कर्ष हा दृष्टिकोन ठेवून या ठिकाणी स्टेडियमची उभारणी केलेली होती.प्रारंभीच्या काळात या ठिकाणी खेळाडूंसाठी अद्यावत सुविधा उपलब्ध होत होत्या तसेच या क्रीडांगणावर राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा ही मोठ्या प्रमाणात होत होत्या. या ठिकाणी क्रिकेटचे रणजी स्तरावरील सामने नियमितपणे होत असल्याने त्या काळात

> तब्बल चार मंत्र्यांचा बहुमान सातारा जिल्ह्याला लाभला आहे. त्यात ना एकनाथ शिंदे यांच्या रूपाने उपमुख्यमंत्री पदाची ही माळ सातारा जिल्ह्याला लाभली आहे. एवढी मोठी संधी जिल्ह्याला प्राप्त होऊन ही सातारच्या खेळाडूंची सरावासाठी भटकंती काही संपेना. हा जिल्हा यशवंत विचारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो तसाच क्रीडा रत्नाची खाण म्हणूनही हा जिल्हा ओळखला जातो. सातारकरांना या लोकप्रतिनिधीकडून मोठ्या अपेक्षा आहेत. सत्तेचा वापर हा जनहितासाठी व्हावा ही अपेक्षा आहे. डोक्यात सत्तेची हवा असली तरी मनात मात्र सेवाभाव वृत्ती हवी तरच विकास व प्रगतीचे चक्रे गतिमान होतात हे जिल्ह्याच्या यशवंत नितीने सिद्ध करून दाखवून दिले आहे.
>
> **श्रीरंग काटेकर,सातारा.**

सातारचे अनेक खेळाडूंनी रणजी क्रिकेट स्पर्धेत चमकदार कामगिरी करून दाखवली आहे.सध्या साताऱ्यात खेळाडूंसाठी क्रीडांगणच उपलब्ध नसल्याने क्रिकेट, फुटबॉल, ॲथलेटिक्स या खेळाचे मोठे नुकसान होत आहे. यामुळे खेळाडूंमध्ये तीव्र नाराजीची भावना आहे. केवळ क्रीडांगणा अभावी खेळाडूंचे होत असलेले नुकसानीमुळे सातारकर नागरिकांमध्येही तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. अनेक गुणवंत व होतकरू खेळाडूंना आपली गुणवत्ता यामुळे सिद्ध करता येत नाही. केवळ क्रीडांगण नसल्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून सातारा शहरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा होऊ शकल्या नाहीत. त्याचप्रमाणे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने क्रिकेटचे रणजी स्तरावरील स्पर्धा ही होऊ शकल्या नाहीत ही दुर्दैवी बाब आहे. याबाबत लोक प्रतिनिधीना ही खंत नाही.साताऱ्यात क्रीडांगण उपलब्ध नसल्यामुळे नियमितपणे या ठिकाणी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करता येत नाही ही क्रीडा संघटनेपुढील मोठी समस्या आहे. सातारच्या खेळाडूंसाठी व क्रीडांगण उपलब्धीसाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा, अशी सातारकरांची मागणी आहे. अनेक गुणी व होतकरू खेळाडू साताऱ्यात

### सरावासाठी अन्य शहरात जाण्याची वेळ

### लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज

असून त्यांना केवळ क्रीडांगण उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या गुणवत्तेवर व करियरवर परिणाम होत आहे. सातारच्या क्रीडा परंपरेचा वैभवशाली इतिहास निर्माण करण्यासाठी राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून कार्यरत असणाऱ्या सातारच्या मंत्र्यांनी यामध्ये पुढाकार घेणे आता गरजेचे वाटू लागले आहे. खेळाडूंच्या वेदना व व्यथा हे त्यांनी जाणून सातारमध्ये सुसज्य व अद्यावत क्रीडा संकुल उभारणीसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा की ज्यामुळे सातारच्या खेळाडूंना अन्य शहरातील क्रीडांगणावर अवलंबून राहता येणार नाही.

## विटा बसस्थानकासाठी १० कोटींचा अतिरिक्त निधी मंजूर

विटा,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**विटा (ता. खानापूर) येथील बसस्थानकाच्या विकासाला आमदार सुहास बाबर यांच्या पुढाकारामुळे मोठी गती मिळाली असून, प्रकल्पाच्या दुसऱ्या मजल्याच्या उभारणीसाठी तब्बल १० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर झाला आहे.**



यापूर्वीच या प्रकल्पासाठी सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता.आता मिळालेल्या अतिरिक्त निधीमुळे विटा बसस्थानक अधिक भव्य स्वरूपात उभा राहणार आहे. विटा हे सांगली जिल्ह्यातील एक महत्त्वाचे व्यापारी व दळणवळणाचे केंद्र आहे.येथील बसस्थानकाचे बांधकाम सध्या सुरू असून, वाढत्या प्रवासी संख्येमुळे अधिक आधुनिक आणि विस्तृत सुविधांची गरज निर्माण झाली होती. ही गरज ओळखून आ.

### आ.सुहास बाबर यांची माहिती

सुहास बाबर यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत हा अतिरिक्त निधी मंजूर करून घेतला. या निधीतून उभारण्यात येणारे बसस्थानक अत्याधुनिक आणि सर्व सोयींनियुक्त असणार आहे.

यावेळी आमदार सुहास बाबर म्हणाले की, विटा बसस्थानकाचा विकास हा प्रवाशांच्या सोयी-सुविधांना केंद्रस्थानी ठेवून केला जात आहे.

वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून दुसऱ्या मजल्यासाठी अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला आहे. येणाऱ्या काळात विटा बसस्थानक हे जिल्ह्यातील आदर्श व सुसज्ज बसस्थानक ठरेल. सांगली जिल्ह्यातील एक मॉडेल बसस्थानक म्हणून विटा शहराची ओळख निर्माण होईल, असा आमचा विश्वास आहे.

# विकास कामांसाठी सत्तेसोबत जाणार-भालके

### अनिल सावंत,भगिरथ भालके शिवसेनेत प्रवेश करणार

पंढरपूर,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**पंढरपूर मंगळवेढा शहर व ग्रामीण भागामध्ये आडवा आडवीची कामे होत आहेत. भविष्यातील आपल्या माणसांची, कार्यकर्त्यांची अडवणूक होऊ नये, त्यांची कामे मार्गी लागावी तसेच शहराच्या विकास कामासाठी,निधी मिळवण्याकरता सत्ते सोबत जावे लागणार आहे. यासाठी शिवसेनेत जायचं का नाही तुमचा निर्णय महत्त्वाचा आहे.**

आपणा सर्वांच्या निर्णयानंतरच हे ठरेल अशी प्रतिक्रिया तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे भगीरथ भालके व भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत यांनी कार्यकर्त्यांच्या विचार विनिमय बैठकीत व्यक्त केले. सोमवारी मंगळवेढा येथे तर मंगळवारी पंढरपूर येथे कार्यकर्त्यांची विचार विनिमयसाठी बैठक बोलावली होती. पंढरपूर येथील भालके यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीला भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत, मनसे नेते दिलीप धोत्रे, शिवसेना नेते साईनाथ अभंगराव यांच्यासह विविध गावचे सरपंच, आजी, माजी पदाधिकारी, शहर आणि



तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना भगीरथ भालके पुढे म्हणाले की, आता इथून पुढे तीन वर्षे कोणत्याही निवडणुका नाहीत, मला कोणतेही पद मिळावे म्हणूनही नाही, मला उमेदवारी मिळावी यासाठी कोणाकडे जात नाही विरोधकांना मात्र याची काळजी लागली आहे. मी पाठीमागच्या दारातून जाणाऱ्यातला नाही तर समोरून लढून जाणारा नेता आहे. भविष्यातील आपल्या लोकांच्या, कार्यकर्त्यांच्या हितासाठी मी हा निर्णय घेत आहे परंतु नानांच्या शिकवणीप्रमाणे कार्यकर्ते जनतेला विश्वासात घेऊनच निर्णय घेणार आहे. शिवसेना प्रवेश सोहळ्या दिवशी शंभर कोटींचा निधी आणून दाखवणार असा शब्दही यावेळी भगीरथ भालके यांनी दिला.

यावेळी बोलताना अनिल सावंत म्हणाले, पंढरपुरात काम करत असताना विकासाबाबत निर्णय घेऊन आम्ही सर्व एकत्र आलो. विधानसभेला काही राजकीय गोष्टी घडल्या त्याची फळे आजही आम्ही भोगतोय, आपले कार्यकर्ते माणसं स्वाभिमानी आहेत,त्यांचा स्वाभिमान टिकला पाहिजे आणि कामेही झाली पाहिजेत.राज्याचे माजी आरोग्यमंत्री माझे चुलते तानाजी सावंत हे आमच्या पाठीशी आहेत त्यामुळे शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी आपला निर्णय महत्त्वाचा आहे. आता योग्य निर्णय घेण्याची वेळ आली आहे असे सांगताच उपस्थित कार्यकर्ते पदाधिकारी यांनी हात उंचावून शिवसेना प्रवेशाला पाठिंबा दर्शविला. 'जिथं तुम्ही तिथं आम्ही' म्हणत कार्यकर्त्यांनी संमती दर्शविली.

# कर्तृत्ववान महिलांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक

### ना.शिवेंद्रसिंहराजे

सातारा,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**आज प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. चूल- मूल, संसार याबरोबरच स्त्री नोकरी, व्यवसाय करून आपल्या कुटुंबाला हातभार लावत आहे. ही अभिमानाची बाब असून प्रत्येक महिलेने सक्षम झाले पाहिजे. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचे समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान असून अशा महिलांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.**

शेंद्रे (ता.सातारा) येथील स्व. अभयसिंहराजे भोसले सांस्कृतिक भवन येथे ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या वतीने सातारा तालुक्यातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर, होम मिनिस्टर हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा असा संयुक्त कार्यक्रम उत्साहात झाला. हजारो महिलांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा देताना ना. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी आ.मनोज घोरपडे, सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष राजू भोसले, सदस्य अजित साळुंखे, सर्जेराव सावंत, पूजा मोरे, सातारा पंचायत समितीचे सभापती महेश गाडे, उप सभापती सुषमा जाधव, सदस्य



महिलांचा सन्मान करताना ना.छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले व मान्यवर.

कोमल दळवी, प्रमिला सुतार, विजया साळुंखे, मानसिंग मोरे, प्रभाकर पवार, सातारा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रम पवार,अजिंक्य तारा सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन नामदेव सावंत, डॉ. दीपक थोरात, सातारा मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. विनायक काळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात स्तनाचा कर्करोग,गर्भाशय मुखाचा कर्करोग, दंतरोग, त्वचारोग, नेत्र तपासणी, असंसर्गजन्य रोग तपासणी यासह विविध आजाराच्या तपासण्या करण्यात आल्या. या शिबिराचा लाभ सुमारे १५०० महिलांनी घेतला. याप्रसंगी अनेक महिलांनी रक्तदान केले.

## बापूसो शिंदे पतसंस्थेस १कोटी ४६लाखाचा नफा-शिंदे

आष्टा,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**येथील बापूसाहेब शिंदे पतसंस्थेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात १३२ कोटी रुपयांचा व्यवसाय केला असून १ कोटी ४६ लाखांचा ढोबळ नफा झाला असल्याची माहिती संस्थेच्या चेअरमन सौ. सरोजिनी विराज शिंदे, व्हा. चेअरमन भगवान काळे यांनी दिली.**



विराज शिंदे सौ.सरोजनी शिंदे

संस्थेचे मार्गदर्शक,विद्यमान नगरसेवक विराज शिंदे, तज्ञ संचालक आनंदराव खोत,माळवाडी सल्लागार समितीचे अध्यक्ष मोहनराव पाटील उपाध्यक्ष महेश निकम प्रमुख उपस्थित होते.विराज म्हणाले,संस्थेचे आजअखेर एकूण भाग भांडवल १ कोटी ४४ लाख रुपये, निधी २ कोटी ५० लाख रुपये, ठेवी ३४ कोटी ५० लाख रुपये, गुंतवणूक १४ कोटी रुपये,कर्जवाटप २४ कोटी ८० लाख रुपये असून कर्ज वसुली ९९ टक्के इतकी झाली आहे. संस्थेने चालू आर्थिक वर्षात १३२ कोटींचा व्यवसाय केला आहे. रेशो ६६.७५ टक्के असून संस्थेचे मुख्य शाखेचे वसुली ९९ टक्के असून शाखा माळवाडीची वसुली १०० टक्के आहे.चेअरमन सौ. सरोजिनी शिंदे म्हणाल्या,बापूसाहेब शिंदे पतसंस्था सामान्यांच्या विकासासाठी स्थापन झालेली असून संस्थेने पारदर्शक कारभाराच्या जोरावर सभासदांचा विश्वास जिंकला आहे.यावेळी संस्थेचे संचालक अमित कदम, शकील मुजावर, जगन्नाथ बसुगडे, जयदीप शिंदे, विलास जाकलेकर, विजय मोरे, सौ.वंदना माळी, दत्तात्रय ढोले, बाबासो नायकवडी, रामचंद्र औघडे ,मॅनेजर नियाजुलहक्क नायकवडी, प्रभारी मॅनेजर तानाजी हेगडे उपस्थित होते.

# धोम डाव्या कालव्याला आंदोलनानंतर सोडले पाणी

कोरेगाव,ता.८(वार्ताहर)-

..............................

**धोम धरणाच्या डाव्या कालव्याला उन्हाळी हंगामातील पहिले आवर्तन न सोडल्याने धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीच्यावतीने सातारा सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता अभय काटकर यांच्या कक्षा बाहेर आंदोलन सुरू करताच दुपारी डाव्या व उजव्या कालव्याला पाणी सोडण्यात आल्याने अखेर आंदोलन मागे घेण्यात आले.**



अधीक्षक अभियंता अभय काटकर यांच्या कक्षाबाहेर ठिय्या आंदोलन करताना संघर्ष समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीने मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सिंचन मंडळाला एक निवेदन देऊन एक एप्रिलला पहिले आवर्तन सोडण्याची मागणी केली होती.मात्र,कालवा सल्लागार समितीची बैठक झाली नसल्याचे कारण देत आवर्तन सोडले गेले नाही. त्यानंतर पाच एप्रिल पर्यंत आवर्तन सोडावे,अन्यथा सहा एप्रिलपासून त्यांच्या कक्षा बाहेर ठिय्या आंदोलन सुरू करण्याचा इशारा दिला होता.निवेदन देऊनही आवर्तन न सोडण्यात आल्याने आज सकाळी साडेदहाच्या सुमारास समितीने अधीक्षक अभियंता अभय काटकर यांच्या कक्षाबाहेर ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले. आंदोलनात समितीचे अध्यक्ष चंद्रकांत बर्गे, रणजित फाळके, एन. डी. माने, बाळासाहेब फाळके, माणिकराव भोसले,जगदीश पवार,सुधाकर बर्गे,दत्तात्रय दादा बर्गे,संजय गायकवाड, चंद्रकांत राऊत आदींनी सहभाग घेतला.

## अवास्तव भाडेपट्टी कराबाबत बैठक संपन्न

कराड,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**कराड नगरपालिकेच्या अवास्तव भाडेपट्टी करात कपात करण्यात यावी, या मागणीसाठी दिलेल्या निवेदनाचा पाठपुरावा करत नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत संबंधित प्रश्नांवर आणि चर्चा होऊन लवकरच शासनस्तरावरून मार्ग काढला जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.**

बैठकीस उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे,लोकशाहीआघाडीचे अध्यक्ष जयंत पाटील, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, सौरभ पाटील तसेच क्रेडाई कराडचे प्रतिनिधी तनय जाधव,अमित सूर्यवंशी,धनंजय कदम, दीपक रैनाक आदी उपस्थित होते. नागरिकांना पडणारा आर्थिक भार या विषयावर चर्चा करण्यात आली.

## हॉकर्स झोनबाबत सर्वांना विश्वासात घेऊनच निर्णय-नगराध्यक्ष यादव

कराड,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**शहरातील फेरीवाल्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने हॉकर्स झोन उभारणीची प्रक्रिया गतिमान केली असून, सर्व संबंधितांना विश्वासात घेऊन कायदेशीरदृष्ट्या भक्कम निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी दिली.**

अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे गेल्या नऊ दिवसांपासून हातगाडे व खोकीधारकांचा व्यवसाय ठप्प झाला आहे.या पार्श्वभूमीवर पार्किंगच्या झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे,मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर,सभापती अल्ताफ शिकलगार, नगरसेवक प्रविण पवार, ओंकार मुळे, विनायक कदम आदी उपस्थित होते. हातगाडाधारकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त करताना, कारवाई केवळ त्यांच्यावर होत असल्याचा आरोप केला. पूर्वीच्या सर्वेनुसार ओळखपत्र व जागा निश्चिती केल्यानंतरच कारवाई व्हायला हवी होती, असे संघटनेचे अध्यक्ष जावेद नायकवडी यांनी सांगितले. नगराध्यक्ष यादव म्हणाले, २०१९-२० च्या सर्व्हेक्षण ५२० हातगाडे नोंदणीकृत होते. त्यानंतर संख्या वाढल्याने जुन्या सर्वेवर निर्णय घ्यायचा की नव्याने सर्व्हेक्षण करायचे, यावर सखोल विचार होणार आहे. शहरासाठी स्वतंत्र फेरीवाला धोरण तयार करण्यासाठी संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे.

दरम्यान फेरीवाला समितीची पहिली बैठक आज ता.९ रोजी होणार असून, हॉकर्स झोन निश्चिती, सर्वेक्षण पुनरावलोकन आणि ओळखपत्र वितरणावर चर्चा होणार आहे.

## सांगली बाजार समिती त्रिभाजन विरोधात न्यायालयात जाणार

### सुजय शिंदे, आनंदराव नलवडे यांची माहिती

सांगली,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे मिरज, जत आणि कवठेमहांकाळ या तीन तालुक्यांमध्ये करण्यात आलेले त्रिभाजन हे राजकीय सूडबुद्धीतून करण्यात आले आहे. याविरोधात न्यायालयीन लढाई बरोबरच रस्त्यावरची लढाई लढवणार असल्याचे माजी सभापती सुजय शिंदे आणि आनंदराव नलवडे यांच्यासह बरखास्त झालेल्या संचालकांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले.**

राज्य शासनाने १७ एप्रिल २०२५ रोजीच्या निर्णयानुसार सांगली बाजार समितीचे तीन स्वतंत्र समित्यांमध्ये विभाजन केले आहे. याविरोधात बाजार समितीने जुलै २०२५ मध्ये याचिका दाखल केली असून सुनावणी सुरू असतानाच शासनाने विभाजनाचा निर्णय घेतला. मुख्य बाजारपेठ आणि उपबाजार एकमेकांवर अवलंबून असल्याने त्रिभाजन झाल्यास जत व कवठेमहांकाळ येथील बाजार समित्या तोट्यात जातील. त्यामुळे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. या निर्णयाविरोधात जनआंदोलन उभारले जाईल. सांगली बाजार समितीच्या आवारामध्ये हमाली करणारे जत, कवठेमहांकाळ तालुक्यातील आहेत. ते काम केलेले व्यापाऱ्यांना चालते. या भागातून आलेला शेतमाल चालतो, मग शेतकऱ्यांचे प्रतिनिधी का चालत नाहीत? असा सवाल माजी सभापती शिंदे आणि नलवडे यांनी केला.

# सांगलीत मोकाट जनावरांमुळे अपघाताला निमंत्रण

### दुचाकीस्वारांसमोर अचानक आडवे येण्याचे प्रकार; प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी

सांगली,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**सांगली शहरातील मिरज रोडवरील मराठा हॉटेल परिसरात मंगळवारी सकाळी एक अपघाताची विचित्र घटना घडली. हा केवळ एक अपघात नसून शहरातील भटक्या जनावरांच्या वाढत्या समस्येचे गंभीर चित्र पुन्हा एकदा समोर आणणारी ही घटना आहे.**

रस्त्यावर अचानक आडव्या आलेल्या घोड्यांमुळे दुचाकीस्वाराचा भीषण अपघात झाला असून तो बेशुद्ध अवस्थेत हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहे.या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मोकाट कुत्र्यांच्यामुळे जनसामान्यांचे जीव धोक्यात आले असतानाच आता मोकाट जनावरे अपघाताला निमंत्रण ठरताना दिसत आहेत.यामध्ये घोड्यांचा, गाढवांचा, कुत्र्यांचा आणि इतर प्राण्यांचा समावेश आहे. सांगली-मिरज शहरात जनावर आडवे आल्याने अपघात वारंवार घडत आहेत.अनेकवेळा निष्पाप नागरिक गंभीर जखमी झाले आहेत तर काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे. या अपघातांमध्ये फक्त माणसांचेच नव्हे तर भटक्या जनावरांचेही जीव जात आहेत. अपघातानंतर जखमी व्यक्तींना तातडीने रुग्णालयात दाखल केले जाते, मात्र जखमी जनावरांच्या बाबतीत पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते.अनेक वेळा त्या जनावरांचे मालक असूनही ते पुढे येत नाहीत, परिणामी ही जखमी जनावरे रस्त्यावरच तडफडत प्राण सोडतात ही अत्यंत वेदनादायक आणि अमानवी स्थिती आहे.

महापालिकेच्या कारवाईवरही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. भटक्या जनावरांच्या प्रश्नावर कारवाई करण्याचे फक्त दिखाऊ प्रयत्न होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. जर खऱ्या अर्थाने कडक आणि सातत्यपूर्ण कारवाई झाली असती, तर अशा घटना पुन्हा पुन्हा घडल्या नसत्या. घोड्यांचे मालक उघडपणे नियमांचे उल्लंघन करत असून, प्रशासनालाच आव्हान देत असल्याचे चित्र आहे.

> ॲनिमल राहत ने जखमी घोड्यावरती प्राथमिक उपचार केले आहेत पण घोड्याचा पुढील डावा पाय कायमचा निकामी झाला असल्याचा अंदाज ॲनिमल राहत चे कौस्तुभ पोळ यांनी वर्तविला आहे. मालकांची वाट बघत बसलो आहे, पण मालक कोणी यायला तयार नाही. महापालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी मीटिंगमध्ये असल्याने येऊ शकत नसल्याचे सांगत आहेत, असे पोळ म्हणाले.

या सर्व पार्श्वभूमीवर काही तातडीच्या उपाययोजना आवश्यक आहेत. प्रथम, रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या जनावरांवर तात्काळ नियंत्रण आणणे आणि त्यांच्या मालकांवर कठोर दंडात्मक कारवाई करणे गरजेचे आहे.दुसरे म्हणजे, जनावरांच्या नोंदणीची सक्ती करून त्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तिसरे, अपघातात जखमी झालेल्या जनावरांसाठी तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी ठरवली पाहिजे.तसेच, बेकायदेशीर शर्यती आणि अशा कार्यक्रमांवर कडक बंदी घालून त्याचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

आजची परिस्थिती पाहता, हा प्रश्न केवळ वाहतूक किंवा प्रशासनाचा नाही, तर मानवी संवेदनांचा आणि सार्वजनिक सुरक्षिततेचाही आहे. वेळेत ठोस पावले उचलली नाहीत, तर भविष्यात अशा घटना अधिक गंभीर स्वरूप धारण करू शकतात.त्यामुळे प्रशासनाने तातडीने जागे होऊन कठोर आणि परिणामकारक उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

## लठ्ठे एज्युकेशन सोसायटीतर्फे खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

सांगली,ता.८(प्रतिनिधी)-

..............................

**लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सोसायटीने खुल्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धा २०२६ चे आयोजन केलेले आहे.ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा असून यामध्ये देशभरातील विविध राज्यातील सुमारे ५०० खेळाडू सहभागी होत असून यामध्ये १४७ मानांकित खेळाडू आहेत.**

ही स्पर्धा ऑल इंडिया चेस फेडरेशन,महाराष्ट्र चेस असोसिएशन आणि सांगली जिल्हा बुद्धिबळ संघटना यांच्या मान्यतेने होत असल्याची माहिती संस्थेचे मानद सचिव सुहास पाटील, संचालक आर्किटेक्ट प्रमोद चौगुले, लठ्ठे पॉलिटेक्निकचे प्राचार्य अण्णासाहेब गाजी यांनी पत्रकारांना दिली. कुपवाड औद्योगिक वसाहती मधील लठ्ठे पॉलिटेक्निकच्या परिसरात दिनांक १९ एप्रिल रोजी ही स्पर्धा होत आहे. यशस्वी स्पर्धकांना एकूण एक लाख रुपयांची रोख बक्षीसे दिली जाणार आहेत.सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र व मेडल देण्यात येणार आहे. जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे.यावेळी सोसायटीचे अध्यक्ष शांतिनाथ कांते, संचालक उदय पाटील यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# अतिक्रमण निर्मुलनाचे नूतन आयुक्तांसमोर आव्हान

## शहर अतिक्रमणमुक्त व्हावे; कोल्हापूरकरांची अपेक्षा

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**ऐतिहासिक कोल्हापूर शहराची ओळख असलेल्या रंकाळा तलावाच्या चौपाटीच्या कमानीजवळ नव्याने लावलेल्या हातगाड्या महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे कर्मचारी यांच्याकडून हटवण्यात आले. ही कारवाई करत असताना रंकाळा चौपाटीसह कोल्हापूर शहरात फोफावलेल्या अतिक्रमणावरही महापालिका प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी, या कामी नूतन आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड यांनी लक्ष द्यावे, अशी अपेक्षा शहरवासियांची आहे.**



कोल्हापूर : रस्त्याच्याकडेला लावलेल्या हातगाड्या व दुचाकीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

रंकाळा चौपाटीच्या कमानीजवळील अतिक्रमण काढू देणार नसल्याची भूमिका तेथील फेरीवाल्यांनी घेतली, त्यामुळे काहीकाळ तणाव निर्माण झाला होता, इतर ठिकाणच्या अतिक्रमणाचे सर्व्हेक्षण करून लवकरच कारवाई करण्याचे आश्वासन उप-शहर अभियंता महादेव फुलारी यांनी दिले. त्यानंतर अतिक्रमण हटवले गेले. यातून शहरातील इतर ठिकाणच्या अतिक्रमणावर कारवाई झाली पाहिजे या मागणीकडे फेरीवाल्यांकडून बोट ठेवण्यात आले. या घटनेतून शहरातील अतिक्रमणाच्या समस्येची दाहकता वाढलेली दिसते. शहरातील इतर ठिकाणीही अतिक्रमण फोफावले आहे, त्यावर तुम्ही काय कारवाई करणार असा प्रश्न ज्यांची अतिक्रमणे महापालिकेकडून काढली ते फेरीवाले विचारत आहेत.

कोल्हापूर शहर अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्धार महापौर रूपाराणी निकम यांनी केला आहे. शहरामध्ये यापुढे अतिक्रमण चालणार नाही, चुकीच्या पध्दतीने अतिक्रमणामध्ये कोल्हापुरातील प्रतिनिधी आड येणार नसल्याचेही त्यांनी सांगितले. अतिक्रमणा विरोधी महापालिका म्हणून चांगले निर्णय व विशेष मोहिमा राबवल्या जातील, शहरवासीयांनाही ज्यांचे घर, हातगाड्या अतिक्रमणामध्ये असतील तर त्यांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घ्यावीत अन्यथा येणाऱ्या पंधरा दिवसानंतर अतिक्रमण मोहीम तीव्र केली जाईल. असेही महापौर यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे शहरातील अतिक्रमण विरोधी धडक कारवाई वाढल्याचे चित्रही दिसले. महापालिकेकडून शहरातील अनधिकृत स्टॉल्सवरही कारवाई करणे नियमित चालू असले तरी नुकतीच कोल्हापूरच्या महापालिकेच्या आयुक्तपदी डॉ. राजेंद्र भारूड यांची नियुक्ती झाली आहे,त्यांच्याकडून शहरातील प्रलंबित प्रश्न आणि अतिक्रमण निर्मूलनासाठी कडक पावले उचलली जावीत ही अपेक्षा शहरवासीयांची आहे.

**शहरात दिवसेंदिवस अतिक्रमणाची समस्या अधिक गंभीर होत असून शहराच्या विविध भागांत रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर झालेल्या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण झाले आहेत. शहरातील महाद्वार रोड, रंकाळा चौपाटी, सर्किट बेंच ते जयंती नाला आणि बाजारगेट, शहरातील गार्डन, सरकारी कार्यालये या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढली आहेत. वाढत्या अतिक्रमणांमुळे नागरिक, पर्यटकांना त्रास होत आहे. शहराची वाहतूक समस्या या अतिक्रमणामुळे अधिक गंभीर होऊ लागली आहे. त्यामुळे भविष्यात कोल्हापूरच्या पर्यटन व्यवसायावरही त्याचे गंभीर परिणाम होण्याची दाट शक्यता आहे.**

रंकाळा चौपाटीसह शहरातील अनेक ठिकाणी राजकीय वरदहस्ताने अतिक्रमण झाली आहेत. याव्दारे काहीजण हप्ते घेत असल्याची शंका शहरातील नागरिक उपस्थित करत आहेत. हातगाडी, टपरी याव्दारे तरूणांना रोजगार मिळेल हा उद्देश ठिक असला तरी हातागाड्याच्या माध्यमातून काही जण पैसा, हप्ता मिळवण्याचा महाप्रताप करत असतील तर बेरोजगार युवक यांनी सुध्दा कोणाच्या नादी लागून, चुकीच्या मार्गाने आपण व्यवसायाचे स्वप्न पाहावे याचा सुध्दा विचार करण्याची वेळ आली आहे. प्रशासनाने सुध्दा कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाला न घाबरता इतर ठिकाणच्या अतिक्रमाणावर त्वरित कडक कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे. सर्व्हे करून इतर अतिक्रमणावर कारवाईचे प्रशासनाकडून आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्षात कारवाई होणे गरजेचे झाले आहे.

महापालिकेनेही त्वरित कारवाई करून ज्या हातगाडी धारक व फेरीवाले यांच्यावर कारवाई झाली त्यांना न्याय द्यावा तसेच शहरभर फोफावलेली अतिक्रमणावर महापालिकेने हातोडा चालवून शहर अतिक्रमण मुक्त करावे,अशी मागणी शहरवासियांकडून होत आहे.



धुळेश्वरनगर दोन नंबर गल्लीमध्ये साठलेले गटारीचे पाणी.

## धुळेश्वरनगरमध्ये गटारीच्या पाण्यामुळे नागरिक त्रस्त

कबनूर,ता.८(वार्ताहर)–

**येथील धुळेश्वरनगरमधील गल्ली नंबर दोनमध्ये गटारीचे बांधकाम पूर्ण नसल्याने तुंबलेल्या गटारीच्या पाण्याने दलदल होऊन दुर्गंधी पसरली आहे. येथील नागरिक पुन्हा डेंग्यू, हिवताप यासारखे आजार होतील या भीतीने तसेच डास व दुर्गंधीने त्रस्त आहेत.**

धुळेश्वरनगर गजानन महाराज मंदिर गल्लीमध्ये गटारीच्या पाण्याच्या निचरा होत नाही. निम्म्या भागांमध्ये गटारी नाहीत. त्यामुळे गटारीतून आलेले पाणी रिकाम्या प्लॉटमध्ये व ओपन जिमच्या शेजारी साठत आहे. या भागात दलदल होऊन दलदलीतील अनेक वनस्पती वाढलेले आहेत त्यामुळे सरपटणारे प्राणी व डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.यापूर्वी डेंग्यू,मलेरिया यासारख्या आजारांना या भागातील नागरिकांना तोंड द्यावे लागले होते. ओपन जिम व मैदानाच्या जवळच पाणी साठत आहे. या ठिकाणीच नागरिक कचरा टाकत आहेत. दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव येथे खेळणाऱ्या लहान मुलांना तसेच संध्याकाळी फिरायला येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना होत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीकडे वारंवार याबाबत तक्रार दाखल केली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटारी बांधून पाण्याचा निचरा करून द्यावा अन्यथा नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.



भुदरगड तालुक्यातील मडिलगे बुद्रुक ते गारगोटी खिंड रस्त्याची झालेली दुरावस्था.

## सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत कोल्हापूर अव्वल

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत कोल्हापूर जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. सन २०२५-२६ या वर्षात जिल्ह्याला देण्यात आलेल्या ४१५ लक्षांकाच्या तुलनेत तब्बल ४३२ उद्योगांना मंजुरी मिळवत १०४ टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य करण्यात आली आहे.**

जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून कोल्हापूरने राज्यातील इतर जिल्ह्यांना मागे टाकत अव्वल स्थान मिळवले आहे. अमरावती जिल्हा दुसऱ्या, जालना तिसऱ्या,अहिल्यानगर चौथ्या तर पुणे पाचव्या क्रमांकावर आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या सूक्ष्म उद्योगांना बळकटी देणे, तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या, स्वयंसहाय्यता गट, महिला



गट, नवउद्योजक आणि बेरोजगार युवकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे हा आहे. विद्यमान उद्योगांना औपचारिक रचनेत आणून त्यांचा विस्तार, ब्रँडिंग आणि विपणन साखळीशी जोडण्यावरही भर देण्यात येत आहे.

या वर्षात सुमारे दोन हजार लोकांना रोजगार उपलब्ध झाला असून ४७० लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. वैयक्तीक लाभार्थ्यांसाठी ४३२ उद्योग मंजूर झाले आहेत. सामाईक पायाभूत सुविधा अंतर्गत ६ प्रकल्प आणि गट लाभार्थी अंतर्गत २ प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे.मंजूर

### १०४ टक्के उद्दिष्टपूर्ती

उद्योगांमध्ये काजू प्रक्रिया, फळे व भाजीपाला प्रक्रिया,बेकरी, दुधजन्य पदार्थ, गुळ निर्मिती, मिरची प्रक्रिया, अन्नधान्य प्रक्रिया, मसाला उद्योग तसेच पशुखाद्य निर्मिती अशा विविध प्रकल्पांचा समावेश आहे.

या योजनेअंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल

> 'या उपक्रमाच्या यशात सर्व सहकारी, बँका, उद्योजक शेतकरी आणि जिल्हा संसाधन व्यक्ती यांचे योगदान आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचेही सहकार्य लाभले. त्यातूनच कोल्हापूर जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळवला,'
> **–जालिंदर पांगरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी.**

### ४३२ उद्योगांना मंजुरी

१० लाख रुपये, सामाईक पायाभूत सुविधांसाठी कमाल ३ कोटी रुपये, मार्केटिंग व ब्रँडींगसाठी खर्चाच्या ५० टक्के, बिज भांडवलासाठी प्रति सदस्य ४० हजार रुपये (कमाल ४ लाख) तसेच प्रशिक्षण व हाताळणी साहित्यासाठी १०० टक्के अनुदान दिले जाते. प्रगतशील शेतकरी, नवउद्योजक, बेरोजगार युवक, महिला, एफपीओ, स्वयंसहायता गट, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था आणि खाजगी कंपन्या या योजनेचा लाभ घेऊ शकतात. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, नोडल अधिकारी नामदेव परीट, संबंधित बँका, कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी, जिल्हा संसाधन व्यक्ती आणि उद्योजक यांच्या समन्वयातून ही यशस्वी कामगिरी साध्य झाली आहे.

## मडिलगे बुद्रुक-गारगोटी खिंड रस्त्याची दुरावस्था

### नागरिकांतून संतप्त प्रतिक्रिया
### दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा

गारगोटी,ता.८(प्रतिनिधी)–

**भुदरगड तालुक्यातील मडिलगे बुद्रुक ते गारगोटी खिंड रस्त्याची पूर्णपणे वाताहात झाली असून वाहन धारकांना आपला जीव मुठीत घेऊन वाहन चालवावे लागत आहे. त्यामुळे संतप्त भावना व्यक्त होत आहेत.**

भुदरगड तालुक्यातील जास्त लोकसंख्या असणारे मडिलगे बुद्रुक हे गाव आहे. अनेक सोयी सुविधा या गावाला मिळतात. परंतु खिंड मार्गे गारगोटीस जाणारा हा रस्ता नियोजन शून्य कारभार आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष यामुळे गेल्या कित्येक दिवसापासून खराब आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे हा रस्ता कायम प्रवाशांच्या चर्चेचा विषय होत आहे. या रस्त्यावरून जाताना रस्ता कुठे आणि खड्डा कुठे आहे हेच कळत नाही. त्यामुळे वाहनधारकांची पुरती पंचाईत होत असून प्रसंगी लहान मोठे अपघात होत आहेत. या रस्त्यावरून दौलत विद्या मंदिर या माध्यमिक शाळेला जाणारे शेकडो विद्यार्थी, नोकरी धंद्यासाठी गारगोटीकडे जाणारे व्यापारी तसेच गारगोटी, मुरगूड बाजारासाठी जाणारी वाहने कोल्हापूर ते गारगोटी या राज्य महामार्गावर जाणेसाठी दररोज ये-जा करतात. तसेच या रस्त्यावरून अंगणवाडीसाठी जाणारी लहान मुले सुद्धा अक्षरशः जीव मुठीत घेऊन जातात. या रस्त्यावर वाहनांची सतत वर्दळ असल्यामुळे अपघात होण्याची भीती पालक आणि शिक्षक वर्गाला सतावते आहे. त्यामुळे हा रस्ता लवकर पूर्णपणे दुरुस्त करावा. यासाठी ग्रामपंचायत प्रशासन, बांधकाम विभाग आणि लोक प्रतिनिधी यांनी गंभीरपणे याकडे लक्ष द्यावे, असा सूर प्रवाशी आणि ग्रामस्थांमधून आळवला जात आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन विभागाने हा रस्ता लवकरात लवकर करावा, अशी मागणी जनतेतून जोर धरीत आहे.

दरम्यान, या रस्त्याबाबत वाहनधारक, प्रवाशी वर्गातून प्रचंड नाराजी व्यक्त होत असून महिनाभरात हा रस्ता न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांतून दिला जात आहे.

## बालवैज्ञानिक स्पर्धेत शतायू पुजारीला रौप्यपदक

इचलकरंजी,ता.८–

**श्री ना.बा.एज्युकेशन सोसायटी संचलित गोविंदराव हायस्कूल, इचलकरंजीचा विद्यार्थी शतायू मनिष पुजारी (इ.सहावी) याला राज्यस्तरीय डॉ.होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त झाले. यासाठी त्याची मुंबई येथे झालेल्या प्रकल्प व मुलाखत फेरीसाठी निवड झाली होती.**

मुंबई येथे झालेल्या प्रकल्प (ॲक्शन रिसर्च प्रोजेक्ट) व मुलाखत यामध्ये त्याने चुणूक दाखवत रौप्यपदकाला गवसणी घातली. या यशाबद्दल श्री.ना.बा.एज्युकेशन सोसायटीचे प्रेसिडेंट श्रीनिवास बोहरा, चेअरमन कृष्णा बोहरा, व्हा.चेअरमन उदय लोखंडे, ट्रेझरर महेश बांदवलकर, मानद सचिव



शतायू पुजारी याचा सत्कार करताना श्रीनिवास बोहरा, कृष्णा बोहरा, शेजारी इतर मान्यवर व पालकवर्ग.

बाबासो वडिंगे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त यांनी अभिनंदन केले. प्रशालेचे मुख्या. एस.व्ही.पाटील, पर्यवेक्षक ए.बी.कांबळे, ए.एम.जामदार, सौ.व्ही.एस. खोत, पी.टी.पाटील यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. शतायूचे आजी आजोबा श्री व सौ.मीरा मोहन पुजारी आणि आई-वडिल श्री व सौ.मंजिरी मनीष पुजारी यांचे त्याला प्रोत्साहन लाभत असते. मुंबई सायन्स टीचर्स असोसिएशन यांच्यातर्फे भारतीय अणु संशोधनाचे जनक डॉ.होमीभाभा यांच्या नावाने घेतली जाणारी ही परीक्षा राज्यभरात प्रतिष्ठेची समजली जाते.

## अमृत परिवार सर्वेक्षण अभियान ३६ जिल्ह्यांत सुरु

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था किंवा महामंडळांमार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा घटकांच्या उन्नतीसाठी कार्यरत आहे.**

अमृतच्या लक्षित गटामध्ये सध्या २५ जातींचा समावेश आहे. सर्वेक्षणानंतर या गटात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. संस्थेमार्फत व्यक्तीमत्व विकास, औद्योगिक व उन्नत कौशल्य विकास, रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण, उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाहाय्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन तसेच उद्योग-व्यवसाय वृद्धीसाठी वैयक्तिक व्याज परतावा योजना अशा विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. लक्षित गटातील कुटुंबांची संख्या निश्चित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे, स्थानिक संसाधने, उपलब्ध कौशल्ये आणि आवडीनुसार नवीन योजना तयार करण्यासाठी अमृत परिवार सर्वेक्षण अभियान शनिवार ता.२५ एप्रिलपर्यंत महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. आवश्यकता भासल्यास हा कालावधी वाढविण्यात येणार असल्याचे अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी सांगितले.

## जनता दरबारातील तक्रारीची महापौरांकडून दखल

### संबंधित जागेवर जाऊन पाहणी; ७१ नागरिकांनी मांडल्या समस्या

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या जनता दरबारात ७१ नागरिकांनी आपल्या विविध समस्या मांडत अर्ज दाखल केले. या जनता दरबारात महापौर सौ. रुपाराणी निकम यांनी नागरिकांच्या तक्रारी व मागण्या प्रत्यक्ष ऐकून घेतल्या. तसेच प्राप्त झालेल्या तक्रारी तातडीने निकाली काढण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.**

यावेळी उपमहापौर अक्षय जरग, विरोधी पक्षनेता मुरलीधर जाधव, स्थायी समिती सभापती विशाल शिराळे, अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, शिल्पा दरेकर, उप-आयुक्त परितोष कंकाळ, किरणकुमार धनवाडे, सहा.आयुक्त स्वाती दुधाणे, नगरसचिव सुनील बिद्री, जल अभियंता हर्षजीत घाटगे, करनिर्धारक संग्राहक सुधाकर चल्लावाड, उपशहर अभियंता सरेश पाटील,



महानगरपालिकेच्या जनता दरबारातील तक्रारीची दखल घेत स्थळ पाहणी करताना महापौर रुपाराणी निकम, सोबत अन्य मान्यवर.

महादेव फुलारी, अरुण गुजर, निवास पोवार, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, मुख्य अग्निशमन अधिकारी मनीष रणभिसे, नगरसेवक व नगरसेविका, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**महापौर रुपाराणी निकम यांची सुर्वेनगर परिसरात पाहणी**

दरम्यान, जनता दरबारमधील अर्जाच्या अनुषंगाने महापौर सौ. रुपाराणी निकम यांनी सुर्वेनगर, विद्या-वसंत पार्क (रि.स.नं.८५३, प्लॉट नं.डी-५) येथे प्रत्यक्ष पाहणी केली.युवराज पांडुरंग पाटील यांनी त्यांच्या घराच्या परिसरात अनाधिकृतरित्या सोडण्यात येणाऱ्या गटारी व शौचालयाच्या सांडपाण्याबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता. या तक्रारीची दखल घेत महापौरांनी संबंधित जागेवर भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी स्थानिक नगरसेवक अभिजित खतकर, वैभव कुंभार, नगरसेविका सौ.नेहा तेंडुलकर तसेच जल अभियंता हर्षजीत घाटगे, उपशहर रचनाकार एन. एस. पाटील, उपशहर अभियंता महादेव फुलारी व कनिष्ठ अभियंता प्रमोद बराले उपस्थित होते.

पाहणीदरम्यान महापौरांनी परिसरातील ड्रेनेज लाईन, रस्ते, गटर्स व पाणीपुरवठा व्यवस्थेची पाहणी करून अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच अमृत योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या व ड्रेनेज लाईनची कामे नवीन रस्ता करण्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी जल अभियंत्यांना दिल्या.

## मार्केट यार्ड परिसरातील रस्त्याची दुरावस्था

कराड,ता.८(प्रतिनिधी)–

**कराडच्या मार्केटयार्ड रोडवर बैलबाजार परिसरात खड्ड्यांनी रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली आहे. या दुरावस्थेमुळे वाहनधारकांचा जीव टांगणीला लागत आहे.**

गेल्या महिन्यात या परिसरातील खड्डे मुजवण्याचे काम प्रशासनाने हाती घेतल्याचे दिसून आले. मात्र एक दोन खड्डे मुजवून कामगार दिसेनासे झाले. साहजिकच आजही मार्केटयार्ड रोडवर बैलबाजार जागेसमोर खड्ड्यांची साखळी वाहनधारकांचा मनस्ताप वाढवत आहे. या ठिकाणी एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे प्रशासनाने डोळे उघडून पाहण्याची गरज आहे.सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत.या दिवसातच हे काम करणे अपेक्षित आहे. अन्यथा पावसाळ्यात या मार्गावरून वाट काढणे वाहनधारकांसाठी प्रचंड गैरसोयीचे होणार आहे. पावसाळ्यात या रस्त्याची अवस्था आणखी दयनीय होण्याची शक्यता आहे.

## प्राथमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान मिळावे

### शिक्षक महासंघाची निवेदनाद्वारे मागणी

हेरले,ता.८(प्रतिनिधी)–

**राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान आदा करण्याचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत, अशी मागणी राज्याचे शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्याकडे खाजगी प्राथमिक शिक्षक महासंघाचे राज्य सचिव राजेंद्र कोरे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.**



प्राथमिक शिक्षण विभागाच्या अधीक्षक भारती पाटील यांना निवेदन देताना विद्या बारामते, रंजना शिंदे, राजेंद्र कोरे आदी.

राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक,माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांना चार टक्के वेतनेत्तर व एक टक्के इमारत भाडे व देखभाल यासाठी पाच टक्के या प्रमाणे वेचनेतर अनुदान दिले जाते. मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांचे गतवर्षीचे मार्च २०२५ व यावर्षीचे मार्च २०२६ चे वेतनेतर अनुदान राज्यातील शाळांना वितरित झालेले नाही. वेतनेत्तर अनुदान अदा करण्याबाबत २७ मार्च २०२६ रोजीच्या शासनआदेशानुसार २.६६ कोटी रुपयांचे अनुदान वितरीत करण्याचे आदेश देण्यात आले. या शासनआदेशामध्ये मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु प्रत्यक्ष अनुदान देत असताना सदरचे अनुदान माध्यमिक शाळांच्या लेखाशीर्षखाली वितरित करण्यात आले आहे.

या शासन निर्णयात मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांचा उल्लेख असून सदर शाळांच्या लेखाशीर्षासह हे अनुदान वितरित होणे आवश्यक होते. परंतु सदर लेखाशीर्षाचा उल्लेख शासन आदेशात नसल्यामुळे राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित शाळांना गतवर्षी व या वर्षीचे वेतनेत्तर अनुदान प्राप्त झालेले नाही. तरी राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान अदा करण्याचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या अधीक्षक भारती पाटील यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी विद्या बारामते, रंजना शिंदे, पिराजी बामणे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रवादीच्या अल्पसंख्यांक बूथ कमिट्या सक्षम करा

**ॲड. नाझीर काझी**

नांदणी,ता.८

कोल्हापूर, ता.८ (प्रतिनिधी)

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांतर्गत अल्पसंख्यांक विभागाच्या बूथ कमिट्या सक्षम करून पक्ष संघटना मजबूत करा, असे आवाहन राष्ट्रवादी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. नाझीर काझी यांनी केले. जिल्हा पातळीसह विधानसभा मतदारसंघनिहाय, शहरनिहाय, तालुकानिहाय कार्यकारिणी तयार करा. मतदार याद्यांच्या पानापानांची जबाबदारी स्वतंत्ररीत्या विभागून घ्या, असेही ते म्हणाले.**



कोल्हापुरात झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ॲड. श्री. काझी बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील- आसुर्लेकर होते. मार्केट यार्डातील कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात हा मेळावा झाला.

यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील- आसुर्लेकर, कोल्हापूर शहराध्यक्ष व नगरसेवक आदिल फरास यांचीही मनोगते झाली.यावेळी जि.प.च्या अध्यक्षा सौ. शिल्पा खोत, महीला बाल कल्याण समिती सभापती सौ. विद्याताई विलास पाटील, जि.प. सदस्य राजु सुर्यवंशी, नगरसेवक नियाजखान पटेल, नगरसेवक आदिल फरास, गोकुळचे संचालक किसनराव चौगुले, केडीसीसी बँकेचे संचालक संतोष पाटील, इचलकरंजी शहराध्यक्ष सुहास जांभळे, बाळासाहेब देशमुख, महादेव पाटील- साळशीकर, भिकाजीराव एक्कल, राजेंद्र पाटील, फिरोजखान पाटील, फत्तेसिंह पाटीलआदी प्रमुख उपस्थित होते.

# श्री बसवेश्वर पत संस्थेला १४.२६ लाखाचा नफा

इचलकरंजी,ता.८



**चेअरमन प्रकाश दत्तवाडे**

**येथील सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या श्री बसवेश्वर नागरी सहकारी पत संस्थेस नुकत्याच संपलेल्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात १४ लाख २६ हजार रुपये इतका निव्वळ नफा झाला असल्याची माहिती चेअरमन प्रकाश दत्तवाडे यांनी दिली. सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांच्या विश्वास आणि आशिर्वादाच्या बळावर संस्थेची यशस्वी घोडदौड सुरु असल्याचे श्री. दत्तवाडे यांनी सांगितले.**

ते म्हणाले, संस्थेचे खेळते भांडवल २१ कोटी ११ लाख असून वसुल भाग भांडवल ६४ लाख ८ हजार रुपये असून राखीव व इतर निधी ३ कोटी ७० लाख इतका आहे. संस्थेच्या एकूण ठेवी १४ कोटी ७ लाख इतक्या असून येणे कर्ज १२ कोटी २७ लाख आहे.

संस्थेने एकूण गुंतवणूक ७ कोटी १७ लाख इतकी केलेली आहे. सर्व तरतूदी वजा जाता संस्थेस १४ लाख २६ हजार इतका निव्वळ नफा झालेला आहे. संस्थेचा एनपीए शून्य टक्के असून संस्थेला सातत्याने ऑडीट वर्ग अ मिळत आला आहे. संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु झाले असून गत ४९ वर्षे संस्था इचलकरंजी व परिसरातील लहान-मोठ्या उद्योग व्यापारांना आर्थिक पुरवठा करीत आहे.

यावेळी व्हा. चेअरमन दत्तात्रय कुंभोजे, संचालक निवृत्ती गलगले, अशोक चनविरे, मलगोंडा पाटील, चंद्रकांत माळी, ॲड. वैभव हावळे, संदीप तोडकर, हर्षल माने, महेश वाली, सौ. सुरेखा दत्तवाडे, श्रीमती सरस्वती माळी, सुशांत देवनाळ आदींसह चिटणीस बंडू माळी,कर्मचारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# अनियमित पाणी पुरवठ्याबाबत अधिकारी धारेवर

## नगरसेवकांच्या तक्रारीचा पाढा; महापौर यांच्या उपस्थितीत बैठक

इचलकरंजी,ता.८-

**शहरातील विस्कळीत आणि अनियमित पाणी पुरवठ्यामुळे शहरवासियांमध्ये असंतोष निर्माण होत चालला आहे. याच पार्श्वभूमीवर महापौर उदय धातुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रभाग समित अ आणि ब मधील नगरसेवकांच्या बैठकीत जलअभियंता बाजी कांबळे आणि मक्तेदार मौला बागवान यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती करत धारेवर धरण्यात आले. अखेर सभागृह नेते विठ्ठल चोपडे यांनी पाणी पुरवठा सभापती असताना राबवलेल्या दिवसाआड पाणीपुरवठा नियोजनाचा अवलंब करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

इचलकरंजी शहरातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा विस्कळीत झाला असून अनियमित व अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांतून असंतोष व्यक्त होत आहे. या अनुषंगाने बुधवारी महानगरपालिकेत प्रभाग समिती अ आणि प्रभाग समिती ब मधील नगरसेवकांची बैठक झाली. यावेळी सर्वच लोकप्रतिनिधींनी जलअभियंता कांबळे व मक्तेदार बागवान यांच्यावर प्रश्नांचा भडीमार करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. पाणीपुरवठा विभागाच्या कारभारावर नाराजी व्यक्त करताना



**अनियमित पाणी पुरवठ्याबाबत महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या, सभागृह नेते विठ्ठल चोपडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत बैठकीप्रसंगी घेतलेले छायाचित्र. (छाया : छोटूसिंग)**

नवीन जलकुंभांचे रखडलेले काम, क्रॉसपाईप टाकण्यास केला जाणारा विलंब आणि अनियमित व कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा आदी मुद्यांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये दोन दिवसाआड स्वच्छ आणि मुबलक पाणी द्या, दोन महिन्यांत सुधारीत वेळापत्रक सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. शिवाय बेकायदेशीर नळजोडण्या बंद करणे, एका भागात एकच पाईपलाईन ठेवणे आणि पाण्याची होणारी नासाडी रोखणे आदी मुद्यांवर भर देण्यात आला. त्याचबरोबर सभागृह नेते विठ्ठल चोपडे यांनी पाणी पुरवठा सभापती असताना राबवलेल्या दिवसाआड पाणीपुरवठा नियोजनाचा अवलंब करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीस उपमहापौर अनिल डाळया, स्थायी समिती सभापती सतीश मुळीक, सभागृह नेते विठ्ठल चोपडे, रवि रजपूते, सुशांत कलागते, राजू पुजारी, अरुणा बचाटे, रुपाली सातपुते, पुनम माळी, रुबेन आवळे, बाळसाहेब कलागते, अमृता भोसले, सचिन माळी,राजू आलासे, यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# सामाजिक समता सप्ताहास उत्साहात प्रारंभ

कोल्हापूर, ता. ८ (प्रतिनिधी)

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ८ ते १४ एप्रिलदरम्यान 'सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी ज्येष्ठ नागरिक जनजागृती मेळावा, आरोग्य तपासणी शिबिर, महिला मेळावा व संविधान विषयक व्याख्यान, सायंकाळी शाहू स्मारक भवन येथे 'सत्यशोधक मूकनायकांचा विचार : काल, आज आणि उद्या' या विषयावर व्याख्यान. शनिवारी (दि. ११) महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादन व व्याख्यान सोमवारी समाज रक्तदान शिबिर तसेच औद्योगिक मार्गदर्शन कार्यशाळा पार पडणार आहे.दि. १४ रोजी बिंदू चौक येथे पथनाट्य, अभिवादन कार्यक्रम होणार आहे.

# हुपरीतील उपोषण लेखी आश्वासनानंतर मागे

हुपरी, ता.८(वार्ताहर)-

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत हुपरी शहरासाठी मंजूर असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामातील दिरंगाईच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेले आमरण उपोषण बुधवारी नगरपरिषदेच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.**

या आंदोलनामुळे सकाळपासून कडकडीत बंद असलेली शहरातील बाजारपेठ आणि सर्व व्यवहार उपोषणकर्त्यांनी आंदोलन मागे घेताच दुपारपासून पुन्हा सुरळीत झाले.

शहराच्या पाणीपुरवठा योजनेचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याच्या निषेधार्थ अखिल भारत हिंदू महासभेचे उपजिल्हाप्रमुख रमेश भोरे,शहर प्रमुख संजय पाटील, सचिन सादळे, उमेश लोंढे हे उपोषणास बसले होते. याविषयी तोडगा न निघाल्याने हिंदू महासभेने आजपासून हुपरी शहर बेमुदत बंद ची हाक दिली होती, त्यामुळे शहरात सकाळपासून सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले होते.

दरम्यान, बुधवारी नगरपरिषद प्रशासन आणि उपोषणकर्ते यांच्यात चर्चा पार पडली. या चर्चेअंती मुख्याधिकारी अजय नरळे आणि नगराध्यक्ष मंगलराव माळगे यांच्या संयुक्त स्वाक्षरीने आंदोलकांना ठेकेदारावर कारवाई करण्याचे लेखी पत्र देण्यात आले. या आश्वासनानंतर प्रशासनाच्या आवाहनाला साद देत आंदोलकांनी उपोषण मागे घेतले.

नगरपरिषदेच्या या सकारात्मक निर्णयानंतर उपोषणकर्त्यांनी आपले उपोषण सोडले. यावेळी पोलीस निरीक्षक सत्यवान हाके,नगरसेवक अमेय जाधव, आण्णासाहेब शेंडुरे, गणेश वाईंगडे, अमर माने, रूपाली उगळे, किरण कांबळे, दिनकर ससे, धनंजय धायगुडे,शिवाजी शेटके, योगेश कळंत्रे, राजेंद्र वाईंगडे,निळकंठ माने,राजेंद्र उगळे, सूर्यकांत रावण, भरत मेथे, नितीन काकडे, विक्रम सावंत, सागर शिंदे, संतोष परीट, बबलू मुधाळे, सुहास माने, दादासो कमते, भरत देसाई, संदीप भंडारे, यांच्यासह अनेक नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रागाने बघण्यावरून युवकावर कोयत्याने हल्ला

सांगली,ता.८(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर रोडवरील दुर्गाप्रसाद पान शॉपजवळ रागाने बघण्यावरून वाद होऊन साहिल सलीम मुलाणी (वय २७, रा. पद्माळे, ता. मिरज) याच्यावर दोघांनी कोयत्याने हल्ला केला. हा प्रकार मंगळवारी रात्री घडला असून या प्रकरणाचा तपास सांगली शहर पोलिसांनी तातडीने करत संशयित वरद राजू जावळे (वय २२, रा. बसस्थानकाजवळ, सांगली) आणि एका अल्पवयीन युवकास ताब्यात घेतले.**

साहिल मुलाणी हा मंगळवारी रात्री साडे नऊच्या सुमारास कोल्हापूर रोडवरील दुर्गाप्रसाद पान शॉपजवळ थांबला होता. तेव्हा त्याला अंधारात कोणीतरी बोलवले, असा समज झाला. त्यामुळे त्याने आवाजाच्या दिशेने पाहिले. तेव्हा संशयित दोघेजण तेथे दिसले. तेव्हा त्यांच्यात एकमेकांकडे बघण्यावरून शाब्दीक वाद झाला. तेव्हा वरद जावळे याने हातातील कोयत्याने साहिलच्या खांद्यावर वार केला. तर त्याच्या अल्पवयीन साथीदाराने चाकूची भीती दाखवत धमकी दिली.

कोयत्याने हल्ला झाल्याची माहिती मिळताच शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक अरूण सुगावकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पथकाला संशयित दोघेजण कोल्हापूर रस्त्यावरील भारतनगर येथे थांबल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने तेथे जाऊन वरद जावळे व अल्पवयीन साथीदारास ताब्यात घेतले.

**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## पाचवी मुदतवाढ ई-निविदा सूचना

म.रा.वि.वि.कं.मर्या., कोल्हापूर ग्रामीण-२, विभागीय कार्यालयाअंतर्गत हुपरी उपविभाग करिता (बोलेरो, टाटा सुमो तत्सम) ई निविदा क्रं. T-२४/२०२५-२६ (रक्कम रुपये ११.४८४ लाख) महावितरणाच्या http://works.mahadiscom.in/e/Tender/etender या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा भरणेचा कालावधी दिनांक १३.०४.२०२६ रोजी दुपारी ०४.०० वा. पर्यंत वाढविणेत येत आहे. तरी संबधितांनी नोंद घ्यावी. (संपर्क क्रमांक ७८७५७६९२०१)

पीआरओ-PRO/KOPZ/०६/२०२६-२७

कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग -२, कोल्हापुर.

# सैनिक टाकळीचा गावतलाव कात टाकणार

## सत्संग फाऊंडेशनकडून संवर्धनाचा श्रीगणेशा

सै.टाकळी,ता.८ (प्रतिनिधी)

**शूरवीरांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सैनिक टाकळी (ता. शिरोळ) येथे आता पर्यावरणाचे रक्षण आणि जलसंधारणाचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. 'सत्संग फाऊंडेशन' च्या वतीने गाव तलावाच्या संवर्धन कामाचा नुकताच शुभारंभ करण्यात आला.**

गावचा तलाव हा केवळ पाण्याचा साठा नसून तो गावाची जीवनवाहिनी असतो. मात्र, काळाच्या ओघात आणि गाळ साचल्यामुळे या तलावाची दुरवस्था



झाली होती. ही बाब ओळखून सत्संग फाऊंडेशनने सामाजिक बांधिलकीतून या तलावाचा कायापालट करण्याचा विडा उचलला आहे. तलावातील साचलेला गाळ काढून साठवण क्षमता वाढवणे. तलावाच्या कडा सुरक्षित आणि भक्कम करणे.या कामाचा समावेश करण्यात येणार आहे. निसर्गाचे ऋण फेडणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. तलाव पुनरुज्जीवनामुळे केवळ पाणीपातळी वाढणार नाही, तर गावाच्या सौंदर्यातही भर पडेल.अशा भावना सत्संग फाऊंडेशन प्रतिनिधीनी व्यक्त केल्या.या कामाच्या शुभारंभावेळी सैनिक टाकळीचे ग्रामपंचायत सदस्य, माजी सैनिक आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सत्संग फाऊंडेशनच्या या पुढाकाराचे कौतुक होत असून, स्वच्छ गाव, सुंदर गाव या संकल्पनेला यामुळे मोठे बळ मिळाले आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील विहिरींच्या पाणी पातळीत वाढ होईल आणि पक्ष्यांचा वावरही वाढेल, असा विश्वास पर्यावरण प्रेमींनी व्यक्त केला आहे.

✻ शिराळा,ता.८ (प्रतिनिधी )

शिराळा तालुक्यातील भटवाडी गावच्या हद्दीत एम आय डी सी मध्ये होत असलेली अवैध दारू विक्री वर कारवाई करून बंद करावी अन्यथा दारू अंगावर ओतून घेऊन आत्मदहन करू असा इशारा सामाजिक कार्यकर्ते ॲड. स्वप्नील पाटील यांनी पोलिसांना दिला.

काही दिवसांपूर्वी समाज माध्यमांवर शिराळा तालुक्यातील भटवाडी गावच्या हद्दीत एम आय डीसी कंपनीच्या समोर टपरीत महिलांच्याकडून दारू विक्री होत असलेचा व्हिडिओ व्हायरल झालेने खळबळ उडाली होती.

**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा प्रथम मुदतवाढ सूचना

म.रा.वि.वि.कं.मर्या., कोल्हापूर ग्रामीण विभाग -२, कोल्हापूर अंतर्गत कागल उपविभागातील औद्योगिक ग्राहकांचे दर महिन्याला व शेतीपंप ग्राहकांचे दर तीन महिन्याला मीटर रिडींग घेणे व डाटा पंचीग, बिल प्रिंटींग व बिल वितरण इ. साठी ई निविदा टी -३०/२०२५-२६ महावितरणच्या http://works.mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा भरणेचा कालावधी दिनांक १३.०४.२०२६ दुपारी ०४:०० वा. पर्यंत वाढविणेत येत आहे. तरी संबंधितांनी नोंद घ्यावी. (संपर्क क्रमांक ७८७५७६९२०१)

| अ. क्र. | उपविभाग | ई-निविदा रक्कम (रु. लाखामध्ये) | निविदा क्र. | निविदा व जीएसटी (१८%) शुल्क रु. (फक्त ऑनलाईन पध्दतीद्वारे) | इसारा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कागल उपविभाग | ३०.०० | EE/KPR-II/KGL/MRDG/T-30/2025-26 | २९५० | ३०००० |

पीआरओ-PRO/KOPZ/०५/२०२६-२७ — कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग-२, कोल्हापूर

# उरमोडी धरणाला 'छत्रपती अभयसिंहराजे भोसले जलाशय' नाव

## राज्य शासनाचा निर्णय;लोकभावनेचा सन्मान

सातारा,ता.८(प्रतिनिधी)

**जिल्ह्यातील सातारा, खटाव व माण तालुक्यातील सिंचन व्यवस्थेला उरमोडी धरणाने भक्कम आधार दिला आहे. जिल्ह्यातील मोठा प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उरमोडी धरण जलाशयाचे 'छत्रपती अभयसिंहराजे भोसले जलाशय' असे नामकरण करण्याचा निर्णय राज्य शासनाने बुधवारी घेतला. विशेष बाब म्हणून जलसंपदा विभागाचा हा शासन निर्णय इतिहास, परंपरा आणि लोकभावनेचा सन्मान करणारा ठरला आहे.**

उरमोडी धरणामुळे जिल्ह्याच्या कृषी क्षेत्राला मोठा फायदा झाला आहे. विशेषत: पावसावर अवलंबून असलेल्या माण, खटाव तालुक्यातील शेतकऱ्यांना या धरणामुळे दिलासा मिळाला आहे. या धरणाच्या जलाशयाला ऐतिहासिक व स्थानिक महत्त्व असलेल्या व्यक्तिमत्त्वाचे नावे देण्याची मागणी बऱ्याच वर्षांपासून शासनाकडे होत होती.

उरमोडी धरण जलाशयाला 'छत्रपती अभयसिंहराजे भोसले जलाशय' असे नाव दिल्याने स्थानिक पातळीवर ऐतिहासिक परंपरेचा गौरव होणार असल्याची भावना जनतेतून व्यक्त होत आहे. शिवाय, सातारा जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक ओळखीला नवे कोंदण मिळाल्याची भावना जनमाणसात निर्माण झाली आहे.

उरमोडी धरणाच्या उभारणीत स्व. अभयसिंहराजे भोसले यांचा मोलाचा वाटा आहे. सातारा, खटाव व माण तालुक्यातील कोरडवाहू शेतीला भक्कम आधार मिळाला आहे. या धरणामुळे वर्षभर पाणी उपलब्ध झाल्याने पिकांची उत्पादकता आणि पीकपद्धतीत मोठे बदल झाले आहेत. दुष्काळी परिस्थितीतही शेतकऱ्यांना स्थैर्य देणारा जलस्रोत म्हणून उरमोडी धरण महत्त्वाचे ठरले आहे. स्व. छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांचाच वारसा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले हे चालवताना दिसत आहेत. त्यांच्या माध्यमातून उरमोडी धरण प्रकल्पच्या दोन्ही कालव्यांचे काम मार्गी लागले आहे. या जलाशयाला स्व. अभयसिंहराजे भोसले यांचे नाव दिल्याने जनतेतून समाधान व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र शासन

## शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,कोल्हापूर

ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३

मुद्रणालय क्र. : (०२३१) २६५०३९५

E-mail : gp.kolhapur@maharashtra.gov.in

ले.सा.भांडार क्र. : २६५०४०२

क्रमांक/भांडार/ 'ड' वर्ग रद्दी विक्री/२७

दिनांक-६/४/२०२६

### निवीदा सूचना

शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर या कार्यालयाकडील दिनांक - ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ या वित्तीय वर्षाकरीता 'ड' वर्ग रद्दी विक्रीच्या कंत्राटासाठी स्पर्धात्मक दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या कंत्राटा संबंधीच्या शर्ती-अटी शासकीय सुट्टी खेरीज या कार्यालयाच्या कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. तरी ज्यांना दरपत्रके सादर करावयाची असतील त्यांनी ती दिनांक १६/४/२६ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत रुपये - २,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) चे अनामत रक्कम भरलेले चलन व दरपत्रक हे सिलबंद लखोट्यातून पोष्टाने अथवा हस्तपोच आणून द्याव्यात. त्यावर 'ड' वर्ग रद्दी विक्रीच्या कंत्राटाची निवीदा सन २०२६-२०२७ असे नमूद करुन या कार्यालयाकडे पाठवावे. निविदा नाममुद्रित पत्रावर असणे आवश्यक आहे अथवा संबंधीत कंपनीच्या नावाचा रबरी शिक्का असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या अगर रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) अनामत रक्कम भरलेले चलन नसलेल्या दरपत्रांच्या विचार केला जाणार नाही.

कोणत्याही निविदा मंजूर अगर नामंजूर वा प्राप्त झालेल्या सर्व निविदा रद्द करुन नवीन निवीदा मागविण्याचे अधिकार व्यवस्थापकांनी राखून ठेवले आहेत. मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा दिनांक - १६/०४/२०२६ तारखेला दुपारी ०२.०० वाजता कार्यालयात उघडण्यात येतील. त्यावेळी निविदा देणाऱ्याने समक्ष हजर रहावे. अगर आपला प्रतिनिधी प्राधिकारासह नियुक्त करावा.आधिक माहितीसाठी या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
कोल्हापूर.

विमाका/कोल्हापूर/८/२०२६-२०२७

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मध्ये रोप-वे प्रकल्पाचे अनुषंगाने विनियम क्र. १५.६ येथे नवीन तरतुदीचा समावेश करणे व विनियम क्र.५.५.२ भाग-२ मध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने म.प्रा.नि. व न.र. अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१कक) (क) व कलम २०(३) अन्वये सूचना.

## सूचना

### महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२,दिनांक : १०.०२.२०२६

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

क्र. टिपीएस-१८२५/१५०/प्र.क्र.११०/२०२५/नवि-१३:- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व अन्य काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख 'उक्त नियमावली' असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिनियम' असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदींनुसार, शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वि.यो. व प्रायो./कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यात अनेक रोपवे प्रकल्प सांस्कृतिक, धार्मिक व पर्यटन उपक्रमांतर्गत नियोजित असून अशा प्रकल्पांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी उक्त नियमावलीत सुधारणा करणे अत्यावश्यक असल्याबाबत शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत:

आणि ज्याअर्थी, उक्त निवेदनांना अनुसरून तसेच सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून उक्त नियमावलीतील प्रकरण क्र.१५ REGULATIONS FOR SPECIAL ACTIVITIES/PLANS मध्ये विनियम क्र.१५.६ मध्ये सोबतच्या 'परिशिष्ट अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे नवीन तरतुदीचा समावेश करणे आवश्यक असून त्यासह सोबतच्या 'परिशिष्ट ब' मध्ये नमूद केल्याप्रमाणे उक्त नियमावलीमधील विनियम क्र. ५.५.२ भाग-२ मधील उपविनियम h. ii) मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त फेरबदल' असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (क) व कलम २० (३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तींचा वापर करुन,उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

ही सूचना,कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. विभागीय आयुक्त कोकण/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/छत्रपती संभाजीनगर विभाग...
३. सर्व जिल्हाधिकारी.
४. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका.(बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर क्षेत्र विकास प्राधिकरण.
७. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे. (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण वगळता)
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ.
९. विभागीय सहसंचालक, नगर रचना कोकण/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/छत्रपती संभाजीनगर विभाग.
१०. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायत.

ही सूचना व परिशिष्ट शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,**

(प्रणव कर्पे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विमाका/कोल्हापूर/९/२०२६-२०२७



# सुनील गावस्करांची अनफिट क्रिकेटपटूंवर टीका



**नवी दिल्ली,ता.८–**

**भारताचे महान फलंदाज सुनील गावस्कर यांनी पुन्हा एकदा आयपीएलच्या सुरुवातीपासून दुखापतीमुळे अनुपलब्ध असलेल्या परदेशी क्रिकेटपटूंना लक्ष्य केले आहे. त्यांच्या मते, आयपीएलमुळे केवळ परदेशी क्रिकेटपटूंनाच नव्हे, तर त्यांच्या बोर्डांनाही मोठा महसूल मिळतो. सुनील गावस्कर यांच्या मते, एक कडक संदेश देण्यासाठी, पहिल्या आयपीएल सामन्यापासून आपल्या संघांसाठी अनुपलब्ध असलेल्या परदेशी क्रिकेटपटूंवरही बंदीसारखी कारवाई झाली पाहिजे.**

आयपीएल २०२६ दरम्यान, अनेक परदेशी क्रिकेटपटू दुखापतींमुळे अद्याप त्यांच्या संघात सामील होऊ शकलेले नाहीत. मिचेल स्टार्क (दिल्ली कॅपिटल्स), विल जॅक्स (इंग्लंड) आणि जोश हेझलवूड (रॉयल चॅलेंजर्स बंगलोर) यांसारखे खेळाडू दुखापत, उपचार आणि इतर कारणांमुळे अद्याप त्यांच्या आयपीएल संघात सामील झालेले नाहीत.

गावस्कर यांनी स्पष्ट केले आहे की, गेल्या दोन हंगामात प्रत्येक देशाच्या क्रिकेट मंडळाला आयपीएलमधून किती पैसे मिळाले. त्यांनी लिहिले, गेल्या दोन हंगामांचा विचार केल्यास, विविध फ्रँचायझींनी १२१.६५ कोटी रुपये खर्च करून १६ ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू विकत घेतले. इंग्लंडचे १२ क्रिकेटपटू ६८ कोटी रुपयांना, न्यूझीलंडचे १२ क्रिकेटपटू ३३ कोटी रुपयांना आणि दक्षिण आफ्रिकेचे १७ क्रिकेटपटू ७१ कोटी रुपयांना विकत घेण्यात आले. वेस्ट इंडिजचे आठ क्रिकेटपटू ५९ कोटी रुपयांना आयपीएलमध्ये सामील झाले. प्रत्येक क्रिकेट मंडळाने या काळात आपल्या क्रिकेटपटूंना आयपीएलमध्ये खेळण्यासाठी एनओसी सादर करून मोठी रक्कम कमावली आहे.

गावस्कर म्हणाले की, एवढे पैसे देऊनही परदेशी क्रिकेटपटू वेळेवर हजर न झाल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. ते म्हणाले, ''भारतात आम्हाला क्रिकेट आवडते आणि क्रिकेटपटू तर त्याहूनही जास्त आवडतात. आणि हो, क्रिकेटपटूंचा विमा उतरवलेला असतो. त्यामुळे, कदाचित एखादा क्रिकेटपटू सर्व सामने खेळला नाही तरी फ्रँचायझीचे काही आर्थिक नुकसान होत नाही. पण फ्रँचायझींनी क्रिकेटपटूंना दिल्या जाणाऱ्या पैशांबाबत कठोर होण्याची हीच वेळ आहे. लिलावानंतर उपलब्ध नसलेल्या क्रिकेटपटूंवर दोन वर्षांची बंदी घालून जसे केले होते, बीसीसीआयने हस्तक्षेप करायला हवा.

# गुजरातचा दिल्लीवर अखेरच्या चेंडूवर थरारक विजय



**नवी दिल्ली,ता.९–**

**दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यातील अटीतटीच्या सामन्यात गुजरातने अखेरच्या चेंडूवर बाजी मारली आहे. गुजरातने दिल्लीचा घरच्या मैदानावर फक्त एका धावेने पराभव केला. दिल्लीकडून केएल राहुलने ९२ धावांची खेळी केली, तर डेव्हिड मिलरने २० चेंडूत ४१ धावा केल्या, पण संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत. तर गुजरातकडून रशीद खानच्या ३ विकेट्स महत्त्वपूर्ण ठरल्या. यासह गुजरात टायटन्सने यंदाच्या हंगामातील पहिला विजय नोंदवला आहे.**

दिल्लीला अखेरच्या षटकांमध्ये १२ चेंडूत ३६ धावांची गरज होती. १९ वे षटक टाकण्यासाठी मोहम्मद सिराज आला. या षटकात मिलरने किलर फलंदाजी करत सामना अटीतटीचा केला. मिलरने या षटकात दोन षटकार व एक चौकार लगावला. तर विप्रज निगमने एक चौकार लगावला आणि या षटकात २३ धावा कुटल्या. यासह दिल्ली कॅपिटल्सला विजयासाठी अखेरच्या षटकांत १३ धावांची गरज होती. विप्रज निगम स्ट्राईकवर होता, तर प्रसिध कृष्णा गोलंदाजी करत होता आणि त्याने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला. पाचव्या चेंडूवर मोठा फटका खेळताना विप्रज झेलबाद झाला आणि नंतर आलेल्या कुलदीपने लगेचच एक धाव घेत मिलरला स्ट्राईक दिली.

आता दिल्लीला विजयासाठी ३ चेंडूत ८ धावांची गरज होती. यानंतर तिसऱ्या चेंडूवर मिलरने दणदणीत षटकार लगावला. त्यानंतर २ चेंडूत २ धावांची गरज असताना पाचव्या चेंडूवर मिलर व कुलदीपने एकही धाव घेतली नाही, ज्यामुळे दिल्लीवरचा दबाव वाढला आणि अखेरचा चेंडू निर्णायक ठरला. अखेरच्या चेंडूवर दिल्ली फक्त एक धाव घेण्यात यशस्वी ठरली. यासह गुजरातने एका धावेने सामना जिंकला. डेव्हिड मिलरने पाचव्या चेंडूवर २ धावांची गरज असताना एक धाव घेण्यास नकार दिल्याची चूक दिल्लीला महागात पडली आणि परिणामी संघाने एका धावेने सामना गमावला.

गुजरात टायटन्सने दिलेल्या २११ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरूवात चांगली झाली. पथुम निसांका व के.एल राहुल यांनी पहिल्या विकेटसाठी ७६ धावांची भागीदारी रचली. पथुम निसांका २४ चेंडूत ६ चौकार व एका षटकारासह ४१ धावा करत बाद झाला. यानंतर नितीश राणा ५ धावा, समीर रिझवी गोल्डन डक तर कर्णधार अक्षर पटेल २ धावांवर बाद झाले. तर डेव्हिड मिलर १२ धावांवर रिटायर्ड हर्ट झाला. फिल्डिंग करताना मिलरच्या हाताला दुखापत झाली होती. के.एल राहुल मात्र २९ धावांवर अर्धशतक करत खेळत होता. पण मोहम्मद सिराजच्या १७ व्या षटकात फटका मारण्याच्या प्रयत्नात के.एल. राहुल झेलबाद झाला. राहुलने ५२ चेंडूत ११ चौकार व ४ षटकारांसह ९२ धावांची उत्कृष्ट खेळी केली. डेव्हिड मिलरने २० चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ४१ धावा केल्या. गुजरात टायटन्सकडून रशीद खानने ३ विकेट्स तर प्रसिध कृष्णाने १ विकेट घेतली.

दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकत प्रथम गुजरात टायटन्सला फलंदाजीसाठी पाचारण केले. गुजरातच्या टॉप-५ फलंदाजांनी मिळून २१० धावांचा डोंगर उभारला. साई सुदर्शन १२ धावा करत लवकर बाद झाला. यानंतर आलेल्या जोस बटलरने संघाचा डाव सावरत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. बटलर २७ चेंडूत ३ चौकार व ५ षटकारांसह ५२ धावा करत बाद झाला. यानंतर कर्णधार शुबमन गिल व वॉशिंग्टन सुंदर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ६० चेंडूत १०४ धावांची भागीदारी रचली. शुबमन गिलने मोठ्या प्रतिक्षेनंतर टी-२० मध्ये अर्धशतक झळकावले.

शुबमन गिलने या सामन्यात ४५ चेंडूत ४ चौकार व ५ षटकारांसह ७० धावा केल्या. तर वॉशिंग्टनने पहिले आयपीएल अर्धशतक झळकावले. वॉशिंग्टनने ३२ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांसह नाबाद ५५ धावांची खेळी केली. तर ग्लेन फिलिप्सने १४ धावा केल्या. दिल्लीकडून मुकेश कुमारने २ विकेट्स तर लुंगी एनगिडी व कुलदीप यादवने १-१ विकेट्स घेतल्या.



# अर्जेंटिना दौऱ्यासाठी भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा

**नवी दिल्ली,ता.८–**

**भारतीय महिला हॉकी संघाच्या अर्जेंटिना दौऱ्यासाठी हॉकी इंडियाने २४ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. हा दौरा १३ ते १७ एप्रिल २०२६ दरम्यान भारतीय संघाचा हा दौरा असणार आहे. या दौऱ्यात भारत यजमानांविरुद्ध चार सामन्यांची मालिका खेळणार आहे. एफ. आय. एच. हॉकी विश्वचषक २०२६ आणि आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी हा दौरा महत्त्वपूर्ण असणार आहे.**



संघाकडे अनुभवी आणि युवा हॉकपटूंचा चांगला समतोल आहे. आपल्या शांत स्वभावासाठी आणि उत्कृष्ट खेळासाठी ओळखल्या जाणाऱ्या मिडफिल्डर सलीमा टेटे यांनी पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व केले आहे.

या दौऱ्यासाठी दुखापतीतून सावरल्यानंतर दीपिका संघात परतली आहे. तिच्या पुनरागमनामुळे पेनल्टी कॉर्नरवर संघ मजबूत होईल. तिच्या अनुपस्थितीत, नवनीत कौर, मनीषा चौहान, उदिता आणि अन्नू यांसारख्या हॉकीपटूंनी उत्कृष्ट कामगिरी केली होती.

अनुभवी सविताचे पुनरागमन हा संघासाठी दिलासा आहे. अलीकडील पात्रता स्पर्धेत तिच्या अनुपस्थितीत बिचू देवीने उत्कृष्ट कामगिरी करून तिची योग्यता सिद्ध केली होती. ज्योती आणि मुमताज खान यांचे बचावात पुनरागमन देखील संघाला आणखी मजबूती देणार आहे. त्याचबरोबर बलजित कौर, वैष्णवी फाळके, ऋतुजा पिसाल, इशिका आणि साक्षी राणा यांसारख्या युवा हॉकीपटूंवरही सर्वांचे लक्ष असेल.

संघ निवडीबाबत मुख्य प्रशिक्षक शोर्ड मारिन म्हणाले की, हॉकीपटूंना आंतरराष्ट्रीय अनुभव देण्यासाठी आणि संघ संयोजन मजबूत करण्यासाठी हा दौरा एक उत्तम संधी आहे. भारत आणि अर्जेंटिना यांच्यातील चार सामने १३,१४,१६ आणि १७ एप्रिल रोजी खेळले जाणार आहेत.

**बॅडमिंटन आशिया चॅम्पियनशिप**

# आयुष शेट्टीची जागतिक क्रमवारीतील सातव्या क्रमांकाच्या फेंगवर मात

**बीजिंग, ता.८–**

**भारतीय युवा बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने चीनच्या जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या ली शी फेंगला सरळ गेममध्ये पराभूत करून बॅडमिंटन आशिया चॅम्पियनशिपमध्ये शानदार सुरुवात केली. निंगबो येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात आयुषने २१-१३, २१-१६ अशा सरळ गेममध्ये विजय मिळवला. ५१ मिनिटे चाललेल्या या सामन्यावर भारतीय बॅडमिंटनपटूने पूर्णपणे वर्चस्व गाजवले.**

आयुष आणि ली शी फेंग यांच्यातील ही पहिलीच लढत होती. पण अनुभवाची कमतरता असूनही, या भारतीय बॅडमिंटनपटू आयुषवर कोणताही दबाव दिसला नाही. २०२३ च्या ऑल इंग्लंड ओपन चॅम्पियन फेंगविरुद्धच्या या विजयाने आयुषला एक मोठा स्टार म्हणून स्थापित केले आहे. या विजयासह, आयुष शेट्टी आता पुढील फेरीत चायनीज तैपेईच्या ची यू जेनचा सामना करेल. हा सामना त्याचे उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित करेल.




आयुषने एखाद्या मोठ्या बॅडमिंटनपटूला पराभूत करण्याची ही पहिली वेळ नाही. यापूर्वी, त्याने यूएस ओपनमध्ये जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या चाऊ टिएन-चेनला पराभूत करून आणि नंतर विजेतेपद पटकावून सर्वांना चकित केले होते.

आयुष शेट्टीचा विजय हा भारतीय बॅडमिंटनसाठी एक मोठा संकेत आहे की एक नवीन पिढी मोठ्या स्तरावर स्वतःला सिद्ध करू लागली आहे. जर ही लय कायम राहिली, तर भारत या स्पर्धेत आणखी अनेक मोठ्या धक्कादायक निकालाची नोंद करु शकतो.

# कोलकाता नाइट रायडर्ससाठी गुड न्यूज

**कोलकाता,ता.८–**

**आयपीएलच्या १९ व्या पर्वाला सुरुवात झाली आहे. तीनवेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावणाऱ्या केकेआरची सुरुवात खराब झाली आहे. उद्या आयपीएलमध्ये कोलकाता नाइट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंटस आमने सामने येणार आहेत. या मॅचपूर्वी केकेआरला दिलासा देणारी अपडेट समोर आली आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोडाने कॅमेरुन ग्रीनला आयपीएलमध्ये गोलंदाजी करण्यास परवानगी दिली आहे. यामुळे केकेआरला मोठा दिलासा मिळाला आहे.**



केकेआरने २५ कोटी रुपये मोजून कॅमेरुन ग्रीनला संघात घेतले होते मात्र, दोन डावात कॅमेरुन ग्रीन चांगली फलंदाजी करु शकला नाही. तर, क्रिकेट ऑस्ट्रेलियाची परवानगी नसल्यानें कॅमेरुन ग्रीनला परवानगी देण्यात आली नव्हती, त्यामुळे तो गोलंदाजी करु शकत नव्हता. याबाबत केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणे याने स्पष्टपणे भूमिका मांडली होती. कॅमेरुन ग्रीनने दोन डावात २४ धावा केल्या आहेत. यामुळे केकेआरचा सर्वात महागडा खेळाडू कॅमेरुन ग्रीन टिकाकारांच्या निशाण्यावर आला होता.

केकेआरला आयपीएलच्या १९ व्या हंगामात एकाही सामन्यात विजय मिळवता आलेला नाही. केकेआरसाठी चांगली बातमी म्हणजेच कॅमेरुन ग्रीनला गोलंदाजी करण्यास क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडून मंजुरी मिळाली आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियानं कॅमेरुन ग्रीनला फिटनेस क्लिअरन्स दिला आहे.

# पुणे ग्रँड टूर२०२७ स्पर्धेचे आयोजन

**पुणे,ता.८–**

**पुणे जिल्ह्यात आयोजित करण्यात येणाऱ्या 'पुणे ग्रँड टूर २०२७' (सीझन २) या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकल स्पर्धेचा शुभारंभ प्रजासत्ताक दिनाच्या औचित्याने २६ जानेवारी २०२७ रोजी होणार असून समारोप ३१ जानेवारी रोजी होणार आहे.**

स्पर्धेची सुरुवात आणि समारोप दोन्ही टप्पे सुट्टीच्या दिवशी ठेवण्यात आले असून यामुळे पुणेकरांना कोणतीही गैरसोय होणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.या स्पर्धेमुळे पुणे जिल्ह्याच्या ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक वैभवाची झलक एकाच व्यासपीठावर अनुभवायला मिळणार आहे.

# मणेरे शैक्षणिक संकुलाचा विद्यार्थी श्लोक बन्ननावरला बालवैज्ञानिक परिक्षेत ब्रॉन्झ मेडल

**इचलकरंजी,ता.८–**

**श्री.डी.ए.मणेरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित सौ. कुसुमताई प्राथमिक विद्यामंदिर, इचलकरंजी येथील विद्यार्थी चि.श्लोक शिवानंद बन्ननावर याने बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ मार्फत घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत ब्रॉन्झ मेडल मिळवून नेत्रदिपक यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल शाळेने इचलकरंजी व कबनूर परिसरात झांज पथक व लेझीमसह श्लोक व त्याच्या पालकांची भव्य मिरवणूक काढून सत्कार केला.**



**चि.श्लोक बन्ननावर यांचा सत्कार करताना शितलकुमार मणेरे,अनिलकुमार मणेरे,सुभाष केटकाळे सौ पुष्पा ऐनापुरे, वैशाली मंगसुळे व इतर मान्यवर**

संस्थेचे अध्यक्ष शितलकुमार मणेरे यांनी श्लोकचे कौतुक करत अशा यशस्वी विद्यार्थ्यांमुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावत असल्याचे म्हटले. तर संस्थेचे सेक्रेटरी अनिलकुमार मणेरे यांनी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत ब्राँझ मेडल मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला, असे उद्गार काढले. संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष केटकाळे यांनी श्लोकच्या पुढील शैक्षणिक व वैज्ञानिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे समन्वयक अशोक वसगडे, विज्ञान शिक्षक श्री. खोत, श्लोकच्या आईने मनोगत व्यक्त केले.

यावेळी सौ. कुसुमताई प्राथमिक विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. पुष्पा ऐनापूरे, मणेरे हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सौ. वैशाली मंगसुळे , कुसुम ऑलिम्पियाड विभागप्रमुख शैलेश कांबळे , सौ. कुसुमताई बालमंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. स्वाती ढेकळे हे सर्व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवास तोडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. वैशाली पाटील यांनी केले.

# प्रक्टीस वर मात करीत पाटाकडील उपांत्य फेरीत

**कोल्हापूर ता.८(प्रतिनिधी)–**

**पिछाडीवरून आघाडी घेत पाटाकडील तालीम मंडळने प्रॅक्टीस फुटबॉल क्लबवर २ विरूध्द १ गोलने मात करून स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. पाटाकडीलच्या यशराज कांबळेला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.**

पाटाकडील तालीम मंडळ व डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने आणि कै. पांडबा जाधव व कै. रावसाहेब सरनाईक यांचे स्मरणार्थ सतेज चषक २०२६ फुटबॉल स्पर्धा सुरू आहे. छत्रपती शाहू स्टेडियमवर बुधवारी, पाटाकडील आणि प्रॅक्टीस क्लब यांच्यातील सामना चुरशीचा झाला. सागर चिलेची पहिलीच चढाई अयशस्वी ठरली. त्यानंतरच्या चढाईत अजिंक्य नलवडेने दिलेल्या पासवर मोठ्या डी बाहेरून सागर चिलेने चेंडूला थेट गोलजाळ्याची दिशा दाखवली. ८व्या मिनिटाला १-०ची महत्वपूर्ण आघाडी मिळाली. पण ही आघाडी फारवेळ टिकवता आली नाही. पाटाकडीलकडून झालेल्या चढाईत यशराज कांबळेने टाकलेल्या लॉपवर ऋषिकेश मेथे-पाटीलने हेडव्दारा गोलचा प्रयत्न केला पण पाटाकडीलचा गोलरक्षक अमर गवळीने चेंडू पकडून तो प्रयत्न असफल ठरविला. एका चढाईत



अमीन खझीरने दिलेल्या पासवर मोठ्या डी मधून यशराज कांबळेने जोरदार फटक्यावर चेंडू थेट गोलजाळ्यात धाडला अन् १४व्या मिनिटाला संघाला १-१ अशी बरोबरी साधून दिली. त्यानंतर रोमारिओ, अमीन खझीर, ऋषिकेश मेथे-पाटील, यशराज कांबळे यांनी गोलसाठी प्रयत्न केले पण त्यांना यश मिळाले नाही. तसेच प्रॅक्टीसकडून अजिंक्य नलवडे, सागर चिले, प्रदीप शिंदे, रोहित भोसले यांनी केलेल्या चढाया वाया गेल्या. पूर्वार्धात सामना १-१ बरोबरीत राहिला.

उत्तरार्धात आघाडी घेण्यासाठी दोन्ही संघाकडून वेगवान खेळ झाला. त्यामध्ये पाटाकडीलला यश मिळाले. बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या रोहित पवारच्या पासवर गोलक्षेत्रात ऋषिकेश मेथे-पाटीलने अमीन खझीरकडे हेडव्दारा चेंडू पास केला, त्यावर अमीन खझीरने हेडव्दारा गोल नोंदवून संघाची आघाडी २-१ अशी वाढवली. ४९व्या मिनिटाला मिळालेल्या आघाडीनंतर डी टॉपवरून रोहित मंडलिकने मारलेल्या फटक्यावर चेंडू गोलपोस्टवरून बाहेर गेला. यशराज कांबळे, ऋषिकेश मेथे-पाटील, रोमारिओ, अमीन खझीर यांनी गोलक्षेत्र भेदणाऱ्या चढाया केल्या पण त्यांना यश मिळाले नाही. निर्धारित वेळेतील दोन मिनिटे शिल्लक असताना उत्सव मरळकरला गोलक्षेत्रात अत्यंत सोपी संधी मिळाली पण तो गोल नोंदवू शकला नाही, परिणामी सामना बरोबरीची संधी हुकली. त्यानंतर जादावेळेत उत्सवने मारलेल्या फटक्यावर चेंडू गोलरक्षक अमर गवळीने काढून गोलची संधी परतावून लावली. अखेर उर्वरीत वेळेत २-१ची आघाडी राखत पाटाकडीलने सामना जिंकून स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

# बीसीसीआयकडून खेळाडूंसाठी कडक नियमावली

**मुंबई,ता.८**

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने इंडियन प्रीमियर लीगसाठी एक नवीन नियम जारी केला आहे. या नवीन नियमानुसार, आयपीएल सामन्यादरम्यान बेंचवर बसलेल्या खेळाडूंना मैदानावर फिरण्याची परवानगी दिली जाणार नाही. सामन्यापूर्वी संघ यादीत समाविष्ट असलेल्या केवळ १६ खेळाडूंनाच मैदानावर फिरण्याची परवानगी असेल.**

क्रिकबझच्या वृत्तानुसार, व्यवस्थापनाने संघ यादीत समाविष्ट केलेल्या केवळ १६ खेळाडूंनाच मैदानावर प्रवेश करण्याची परवानगी दिली जाईल. बीसीसीआय आणि आयपीएल व्यवस्थापनाने संघ व्यवस्थापकांना कळवले आहे की, १६ खेळाडूंच्या यादीत नसलेल्या खेळाडूंना ड्रिंक्स ब्रेक दरम्यान मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही. फलंदाजी करायची असली किंवा संदेश द्यायचा असला तरीही, सामन्यादरम्यान बेंचवरील खेळाडूंना मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही.सामन्यांदरम्यान, खेळाडू अनेकदा डगआऊटमध्ये पिवळ्या किंवा हिरव्या रंगाची स्लीव्हलेस जर्सी (बिब) घालतात. बीसीसीआयने म्हटले आहे की, बिब घातलेल्या पाचपेक्षा जास्त खेळाडूंना सीमारेषेजवळ बसण्याची किंवा उभे राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. हे पाच खेळाडू १६ नामांकित खेळाडूंमधून किंवा संपूर्ण संघातून निवडले जाऊ शकतात.मैदानावर पेय आणणाऱ्या कोणत्याही खेळाडूने संघाचा गणवेश परिधान करणे आवश्यक आहे. १६-सदस्यीय संघपत्रिकेत समाविष्ट नसलेल्या खेळाडूंना सीमारेषेजवळ किंवा एलईडी बोर्डजवळ फिरण्याची परवानगी दिली जाणार नाही.